संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक २६० * * अमरावती * सोमवार, दिनांक १७ मार्च २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

।। परमात्मा एक ।।
मानव इंटरप्रायजेस मोबाईल शॉप
टि.व्ही. फ्रिज, वॉशिंग मशीन, मोबाईल रिचार्ज




7020267005 गजानन देशमुख 9284478885 सिद्धांत देशमुख
प्लॉट नं. ११, दुर्गा नगर, भरतवाडा, नागपूर-०४

अग्राग्रलेख

खरीखरी..

## गडकरींचा जाती प्रहार

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे आपल्या स्पष्ट वक्तेपणासाठी परिचित आहेत. अनेक राजकारणी असे असतात की, जे त्यांच्या पोटात असते. ते त्यांच्या ओठावर कधीच येत नाही. मात्र अपवादात्मक परिस्थितीत काही राजकारणी मनातले विचार बोलून दाखवण्यास कमी करत नाहीत. उदाहरणादाखल आपल्या महाराष्ट्रातील नेत्यांचे नाव घ्यायचे झाले. तर नागपूर मधले त्यांच्या कुटुंबातील पहिल्या पिढीचे राजकारणी नितीन गडकरी आणि मुंबईतील तिसऱ्या पिढीचे राजकारणी राज ठाकरे या दोघांचे घ्यायलाच हवे. कारण यांच्या मनात जे जे विचार येतात, ते विचार ही मंडळी बोलून टाकतात. मग त्याचा आपल्या राजकीय जीवनावर विपरीत परिणाम होऊ शकतो अथवा प्रभाव पडू शकतो. हे समजूनही हे लोक बोलत असतात. नितीन गडकरी यांना आम्ही त्यांच्या राजकारण प्रवेशापासून ओळखतो. त्यांच्या कामाचा झपाटा ते महाराष्ट्रामध्ये सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना आपल्या मुंबईसह महाराष्ट्राने बघितलेला आहे. मुंबईचे ५५ उड्डाणपूल त्यांच्या वैचारिक उड्डाणाची साक्ष देत उभे आहेत. अशा विचारसरणीच्या केंद्रीय मंत्री नेते गडकरी यांनी काल नागपूर शहरात जातीपातीबद्दलचे जे वक्तव्य केले, त्याला अतिशय महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे. आजकाल निवडणुकीत तिकीट देतानाही अमुक एका मतदारसंघात तुमच्या जातीचे मतदार आहेत किती आहेत?. याचा विचार सर्वच पक्ष करतात. म्हणजे गेल्या काही वर्षात जातीपातीच्या राजकारणाला मोठेच महत्त्वाचे स्थान राजकारणामध्ये मिळालेले आहे. विशेष म्हणजे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. अशा परिस्थितीमध्ये जातीपेक्षा गुणांना महत्त्व देणे किती महत्त्वाचे आहे. हे गडकरी यांनी आपल्या विचारोत्तेजक भाषणात स्पष्ट केले. गडकरी आणि त्यांचे वक्तृत्व, त्यांचा स्पष्ट वक्तेपणा, त्यांच्या पोटातील आणि ओठातील वाक्याची एकरूपता हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. सर्वांनाच हे साधत नाही पण असे असूनही नितीन गडकरी यांना हे बाधत नाही. कारण, सच्च्या विचारवंताला इतर कशाचाच सहारा लागत नाही. नागपूर शहरात आपल्या जातीचे अत्यंत कमी मतदार असतानाही सतत तीन वेळा निवडून येणे, हे त्यांच्या सर्व समावेशक लोकसंग्रहाचे उदाहरण आहे. 'जात पात पूछे न कोई, हरी को भजे सो हरी का होई' हे पुरेपूर आत्मसात केल्यामुळे गुणवंतांची कदर किती असते आणि ती कशी करावी. हे गडकरी यांना पूर्णपणे माहीत आहे. आजकाल जातीपातीच्या संघटना, जाती जातीतील हेवेदावे, प्रत्येक समाजाच्या संघटनांच्या अभिमानाचे प्रकटीकरण हे आपण नेहमीच पाहतो. आपल्या देशात जी जात नाही. ती जात असते, हे दुर्दैवाने खरे आहे. आपल्या जातीला जातीच्या जात्यात दळून-दळून आजकाल त्याचा मैदा झालेला आहे. हा मैदा जसा आरोग्याला फायदेशीर नाही. अतिशय नुकसानकारक आहे, तरीही तो लोकप्रिय आहे. अगदी तसेच जाती-जातीचे महामेळावे जातीवंत राजकारणी, जातीने उपस्थित राहून पार पाडत असतात. आपणही म्हणजेच सगळी समाज माध्यमे निवडणुकीचे विश्लेषण करताना भारताच्या प्रत्येक राज्यातील पुढाऱ्यांच्या जातीची टक्केवारी मांडण्यासाठी जराही कचरत नाही. महाराष्ट्रात मराठी इतके, कुणबी तितके. माळी एवढे तेली तेवढे, आणि मुसलमान, बौद्ध, शीख इतर जाती वगैरे इत्यादी इतके किंवा तितके आहेत. याच्या नोंदी आवर्जून सांगत असतो. यापेक्षाही भयावह स्थिती उत्तर प्रदेश सारख्या राज्यात आहे. हे अजिबात नाकारता येणार नाही. जातीपातीचा रोग वाताच्या रोगापेक्षा कमी त्रासदायक कधीच नसतो. कोणत्याही धार्मिक पुराणापेक्षा जातीचे पुराण पुरणपोळी पेक्षाही गोड असते, असे अनेकांना वाटते. अशा परिस्थितीमध्ये आपल्या देशाच्या तरुणाई समोर बोलताना नितीन गडकरी यांनी जातीपेक्षा गुणांची पूजा करण्याचे उघडपणे बोलणे. अनेकांना पचेलच असे नाही. खरी गोष्ट पचवणे सोपे नसते. गोड गोड आणि गोलगोल बोलून लांगूचालन करणे हेच आत्ताचे राजकारण आहे. अशा सर्व जाती-जमातीच्या राजकारणात 'जाति न पूछो साधू की पूछ लो तुम ग्यान, मोल करो तरवार का पडा रहेन दो म्यान' अशी एकूण जी मूळ खरीखरी आणि सत्य धारणा आहे. त्या धारणेकडे लक्ष देऊन गडकरी ज्या पद्धतीने कडाडलेले आहेत. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केलेच पाहिजे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## सुनीता विल्यम्स यांना घेण्यासाठी मस्क यांचे स्पेसक्राफ्ट स्पेस स्टेशनवर पोहोचले

### दोन अंतराळवीर ९ महिन्यांपासून अडकलेले, १९ मार्च रोजी पृथ्वीवर परततील

■ वृत्तसंस्था, फ्लोरिडा, दि. १६ :
एलन मस्क यांच्या कंपनी स्पेसएक्सचे अंतराळयान ड्रॅगन सुमारे २८ तासांनंतर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहोचले आहे. आज, १६ मार्च रोजी, ते भारतीय वेळेनुसार सकाळी ९:४० वाजता डॉक झाले आणि हॅच सकाळी ११:०५ वाजता उघडले. हे अंतराळयान ९ महिन्यांपासून अंतराळ स्थानकात अडकलेल्या भारतीय वंशाच्या अमेरिकन अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांना पृथ्वीवर परत आणेल.



चार सदस्यांच्या क्रू-१० टीममध्ये नासाच्या अंतराळवीर ॲनी मॅक्क्लेन आणि निकोल आयर्स, जपानचे ताकुया ओनिशी आणि रशियाचे किरिल पेस्कोव्ह यांचा समावेश आहे. या अंतराळवीरांनी शनिवारी भारतीय वेळेनुसार दुपारी ४:३० वाजता स्पेसएक्सच्या फाल्कन ९ रॉकेटमधून उड्डाण केले. फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटर येथून त्याचे प्रक्षेपण करण्यात आले.

डावीकडून निळ्या रंगाचे कपडे परिधान करून, नासाचे अंतराळवीर निकोल आयर्स, रशियाचे किरिल पेस्कोव्ह, अमेरिकेचे ॲन मॅक्लेन आणि जपानचे ताकुया ओनिशी हे अंतराळ स्थानकावर पोहोचले. क्रू-९ ने त्यांचे अंतराळ स्थानकात स्वागत केले. डावीकडून निळ्या रंगाचे कपडे परिधान करून, नासाचे अंतराळवीर निकोल आयर्स, रशियाचे किरिल पेस्कोव्ह, अमेरिकेचे ॲन मॅक्लेन आणि जपानचे ताकुया ओनिशी हे अंतराळ स्थानकावर पोहोचले. क्रू-९ ने त्यांचे अंतराळ स्थानकात स्वागत केले.

क्रू-१० अंतराळ स्थानकात पोहोचल्यानंतर, आता तेथे उपस्थित असलेले क्रू-९ चे अंतराळवीर, नासाचे निक हेग, सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर आणि रशियन अंतराळ संस्था रोसकॉसमॉसचे अंतराळवीर अलेक्झांडर गोबुनोव्ह ड्रॅगन अंतराळयानातून पृथ्वीवर परततील. हे चार अंतराळवीर १९ मार्चनंतर अंतराळ स्थानकावरून पृथ्वीवर रवाना होतील.

सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांनी बोईंगच्या स्टारलाइनर अंतराळयानातून प्रवास केला. हे अभियान फक्त ८ दिवसांचे होते, परंतु तांत्रिक बिघाडांमुळे ते ९ महिने अवकाशात राहावे लागले. तथापि, स्टारलाइनर अंतराळयान नंतर रिकामे परतले. सुनीता आणि बुच विल्मोर बोईंग आणि नासाच्या संयुक्त 'क्रू फ्लाइट टेस्ट मिशन'वर गेले. यामध्ये, सुनीता या अंतराळयानाच्या पायलट होत्या. त्यांच्यासोबत आलेले बुच विल्मोर हे या मोहिमेचे कमांडर होते.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी ३० मार्चला नागपुरात

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :
येत्या ३० मार्च रोजी अर्थात गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर नागपुरात माधव नेत्रालयाच्या नवीन इमारतीचे हिंगण्यात भूमिपूजन होणार आहे. आद्य सरसंघचालक डॉ.केशव बळीराम हेडगेवार यांची त्याच दिवशी जयंती आहे.



या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरसंघचालक डॉ. मोहन भागवत एका व्यासपीठावर येणार आहेत. अयोध्येतील श्री राम मंदिराच्या लोकार्पणानिमित्त हे दोघेही एकत्रित आले होते. यानंतर उपराजधानीत कॅन्सर इन्स्टिट्यूटसाठी पंतप्रधान मोदी येणार होते. मात्र त्यांचा दौरा रद्द झाला. सार्वजनिक कार्यक्रमात हे दोन्ही नेते एका व्यासपीठावर येणार असल्याने त्यांच्या भाषणाची सर्वांना उत्सुकता आहे. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आचार्य गोविंद गिरी महाराज, अवधेशानंद गिरी महाराज यांची प्रामुख्याने उपस्थिती असणार आहे.

विशेष म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षात गुढीपाडवा अर्थात वर्ष प्रतिपदेच्या निमित्ताने नागपुरात होणारा हा कार्यक्रम लक्षात घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी रेशीमबाग येथील स्मृती मंदिरला भेट देण्याची शक्यता वर्तविली आहे. माधव नेत्रालय नेत्रसंस्था व संशोधन केंद्र ही संघ परिवारातीलच एक भाग असल्याने हे निमंत्रण मोदींनी स्वीकारले. मात्र, इतर दौरा निश्चित झालेला नाही. १८,२३ मार्चला पूर्वतयारी बैठका आहेत गेली अनेक वर्षे या भेटीची उत्सुकता सर्व सामान्यांनाच नव्हे तर संघ स्वयंसेवकांना देखील आहे. या भेटीत माजी सरकार्यवाह भैयाजी जोशी पंतप्रधानांचे स्वागत करणार असल्याची माहिती आहे. अद्याप याविषयीचा कुठलाही दौरा आलेला नसला तरीही मोदींची ही भेट झाल्यास रेशीमबागेतील स्मृती मंदिराला भेट देणारे ते पहिलेच पंतप्रधान ठरणार आहेत. हिंगणा मार्गावर ५.८३ एकर परिसरात ही माधव नेत्रालयाची भव्य इमारत उभारली जाणार आहे. २५० खाटांचे रुग्णालय आहे. पाच लाख चौरस फुटांच्या प्रकल्पाची किंमत ५१७ कोटी रुपये आहे. २७ मार्च २०२८ रोजी या प्रकल्पाचे लोकार्पण केले जाणार असल्याची माहिती डॉ अविनाश अग्निहोत्री यांनी दिली.

## सांगलीमध्ये हिट अन्ड रनचा थरार
## फॉर्च्यूनरने उडवले ७ ते ८ दुचाकींना

■ महासागर प्रतिनिधी, सांगली, दि. १६ :
सांगलीच्या माधवनगर ते खोतवाडी मार्गावर भरधाव कारचालकाने ३ गावांमधील ७ ते ८ दुचाकींना उडवत पळ काढला. आपल्या गावातील व्यक्तीला उडवून पळणाऱ्या कारचा पाठलाग करत गावकऱ्यांनी त्याला खोतवाडी येथे गाठले अन् शेतात चारचाकी अडवून धरली.

दरम्यान शेकडोने असणाऱ्या नागरिकांच्या जमावाला पोलिसांनी तत्काळ पांगवत चालकाला ताब्यात घेतले. आटपाडी तालुक्यातील गोमेवाडी येथील तो चालक असल्याचे समजते. दरम्यान, ४ ते ५ जण जखमी झाले असून, रात्री उशिरा सांगली ग्रामीण पोलिसांत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. नीतेश पाटील असे चालकाचे नाव असून तो आटपाडी तालुक्यातील असल्याचे समजते. चालकासह गाडीतील महिलाही जखमी झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कारचालक नीतेश पाटील आलिशान कार घेऊन माधवनगर ते बुधगाव या मार्गावर रात्री साडे आठ ते नऊ वाजण्याच्या सुमारास निघाला होता. यावेळी वसंतदादा कारखान्यासमोर एका दुचाकीला धडक दिली. तो पळून जात असताना मध्ये येणाऱ्या ६-७ दुचाकींना त्याने उडवल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. बुधगाव येथे एका मोटार सायकलस्वाराला त्याने फरफटत नेले. या अपघातात दुचाकीस्वार जखमी झाला तर दुचाकीचे मोठे नुकसान झाले. नागरिक पाठलाग करत असल्याचे पाहून त्याने भरधाव वेगात गाडी खोतवाडीकडे नेली. यावेळी त्याने खोतवाडी गावाच्या स्वागत कमानीला गाडी धडकवल्याने ती थेट शेतात जाऊन आदळली.



## तरुणाचा बेदम मारहाणीमुळे मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, बीड, दि. १६ :
मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीडमध्ये आणखी एक खुनाची घटना उघडकीस आली आहे. एका ट्रक चालकाला कुटुंबातील लोकांनी दोन दिवस डांबून ठेवत बेदम मारहाण करण्यात आली. या मारहाणीत ट्रक चालकाचा मृत्यू झाला. शनिवारी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली. .

विलास बनसोडे नावाचा २३-२४ वर्षाचा मुलगा हा क्षीरसागर कुटुंबाकडे चार वर्षांपासून ट्रक ड्रायव्हर म्हणून काम करायचा. दोन दिवसांपासून तो बेपत्ता होता. त्याला मारहाण करून त्याचा मृतदेह रुग्णालयात टाकून ती माणसे गायब झाली. त्यानंतर त्याचा मृतदेह रुग्णालयातून घेऊन जाण्यासाठी त्याच्या घरच्यांना कळवण्यात आले.

## बीड जिल्ह्यात काही लोकांनी सत्तेचा गैरवापर केला : शरद पवार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :
आज जी बीडची अवस्था आहे तशी यापूर्वी कधीच नव्हती. दुर्दैवाने काही लोकांनी सत्तेचा गैरवापर केला अशी नाव न घेता माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी टीका केली. पवारांनी शनिवारी पंतप्रधान मोदींना एक पत्र लिहिले. त्यात त्यांनी मोदींचे कौतुक करत दिल्लीतील तालकटोरा स्टेडियममध्ये बाजीराव पेशवे, महादजी शिंदे व मल्हारराव होळकर यांचे घोड्यावरील पूर्णाकृती पुतळे उभारण्याबाबत नवी दिल्ली महापालिकेला योग्य ते निर्देश देण्याचे आवाहन केले.



## विधान परिषदेच्या पोटनिवडणुकीसाठी भाजपकडून उमेदवारांची यादी जाहीर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :
विधानपरिषदेवरील पाच रिक्त जागांसाठी निवडणूक जाहीर झाली आहे. २७ मार्चला मतदान होणार असून त्याच दिवशी निकाल लागणार आहे. यासाठी भाजपच्या वाट्याला तीन व शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या प्रत्येकी एक जागा आली आहे. भाजपने रविवारी या पोटनिवडणुकीसाठी उमेदवारांची यादी जाहीर केली. संदीप जोशी, संजय केनेकर, दादाराव केचे यांना भाजपने संधी दिली आहे. महाराष्ट्रात विधान परिषदेच्या ५ जागांसाठी पोट निवडणूक कार्यक्रम निवडणूक आयोगाच्या वतीने जाहीर करण्यात आला. आमशा पाडवी, राजेश विटेकर, प्रवीण दटके, गोपीचंद पडळकर आणि रमेश कराड हे विधान परिषद सदस्य विधानसभेवर निवडून गेल्याने त्यांच्या जागा रिक्त झाल्या होत्या. त्यांच्या रिक्त जागांसाठी निवडणूक होणार आहे. दरम्यान, या सर्व जागा आमदारांच्या वतीने निवडल्या जाणाऱ्या आहेत. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार या १७ मार्च रोजी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे.

## भरचौकात तरुणाची निर्घृण हत्या

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :
मद्याच्या अमलाखाली झालेल्या वादातून गुंडाने साथीदारांसोबत मिळून मित्रावरच धारदार शस्त्रांनी हल्ला केला. भरचौकात शस्त्रांनी सपासप वार करून त्याची निर्घृण हत्या केली. ही थरारक घटना अंबाझरी पोलिस ठाण्यांतर्गत पांढराबोडी परिसरात रविवारी सकाळी घडली. दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेने परिसरात दहशत पसरली. दीपक उर्फ बबलू गोविंद बसवंते (३५) रा. पांढराबोडी असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी बबलूच्या खुनात प्रशांत उर्फ खाटिक गणेश इंगोले, रोशन गणेश इंगोले, राहुल उर्फ चोर सूर्यवंशी, गजानन सनेश्वर आणि प्रशांतच्या साळ्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृतक आणि आरोपी पांढराबोडी परिसरातच राहतात. मृतक दीपक हा पूर्वी गुन्हेगारीत सक्रीय होता. मात्र गत ५-६ वर्षांपासून तो गुन्हेगारीपासून दूर होता. हार-फुलाची दुकान लावून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत होता.

एकाच परिसरात राहात असल्याने सर्वांची एकमेकांसोबत मैत्री होती. शनिवारी रात्री दीपकने प्रशांत आणि राहुलसोबत बसून मद्यप्राशन केले. दारूच्या नशेत राहुल मोठ-मोठ्या बाता करीत होता. त्यामुळे दीपकने आपल्या जुन्या दिवसांची आठवण करून दिली. राहुलला चिंधीचोर म्हणून शिविगाळ करू लागला. यावरून दोघांमध्ये बाचाबाची झाली. रागात दीपकने राहुलच्या कानशिलात २-३ लगावल्या. वाद चिघळताना पाहून प्रशांत व परिसरातील लोकांनी मध्यस्थी करीत त्यांच्यातील वाद मिटवला. त्यानंतर दीपक घरी गेला. मात्र राहुल आणि प्रशांत तेथेच दारू पित बसून होते. राहुलला भीती होती की, दीपक त्याचा गेम करू शकतो. त्यामुळे त्याने प्रशांत, रोशन आणि गजाननसोबत मिळून त्यालाच यमसदनी पाठवण्याची योजना बनवली.

### गळा, पोट, छातीवर वार

सकाळी ५.३० वाजताच्या सुमारास आरोपींनी दीपकला पुन्हा दारू पिण्यासाठी बोलावले. पाचही जणांनी परिसरातील चांद बिछायत केंद्राजवळ बसून मद्यप्राशन केले. दारूच्या नशेत त्यांच्यातील वाद पुन्हा उफाळला. आरोपी चाकू आणि सत्तूरसह तयारच बसले होते. त्यांनी दीपकचा गळा, पोट आणि छातीवर सपासप वार करून हत्या केली आणि फरार झाले. दिवस निघताच घडलेल्या या घटनेने परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच अंबाझरी पोलिस घटनास्थळी पोहोचले. खुनाचा गुन्हा नोंदवून रोशन, गजानन आणि प्रशांतच्या साळ्याला अटक केली. चौकशीत राहुल काचीपुरा परिसरात लपून असल्याची माहिती मिळाली. मात्र पोलिस पोहोचण्यापूर्वीच तो तेथून फरार झाला.

## मोदी-शहा जाताना देशाचे तुकडे करून जातील : संजय राऊत

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :
शिवरायांचा इतिहास बदलणे, हिंदू-मुसलमानांसाठी स्वतंत्र दुकानांची मागणी हा ठरवून सुरू असलेला मूर्खपणा भारताला हिंदू पाकिस्तानच्या दिशेने ढकलत आहे, असे म्हणत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजप सरकारवर टीका केली आहे.



दरम्यान संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, मोदी-शहांचे राज्य एक दिवस जाणारच आहे, पण जाताना ते देशाचे तुकडे करून जातील. गेल्या दहा वर्षांत भारतात हिंदू आणि मुसलमान अशी दोन राष्ट्रे निर्माण झाली आहेत. हे वातावरण फाळणीसदृश आहे.

संजय राऊत यांनी म्हटलंय की, मोदी काळाचे आता अंतिम पर्व सुरू झाले आहे. मोदी व त्यांचे लोक केव्हा तरी जातील, पण जाताना या देशाचे तुकडे करून जातील हे स्पष्ट दिसते. देशात आज जो जातीय आणि धार्मिक विद्वेष वाढला आहे तो फाळणी आधी याच पद्धतीने दिसत होता. आज येथले काही हिंदू (अर्थात बाटलेले) पुढारी बा. जिनांच्या भूमिकेत शिरले आहेत. देशासाठी ते धोकादायक आहे. भारतात सावरकरांनी द्विराष्ट्र सिद्धांत मांडला होता. भारतीय मुसलमान आणि भारतीय हिंदू ही दोन वेगळी राष्ट्रे आहेत. त्यांचे आपले स्वतंत्र धर्म, परंपरा, रीतिरिवाज आहेत. त्यामुळे सामाजिक आणि नैतिक दृष्टिकोनातून मुसलमानांना हिंदूबहुल भारताबाहेर आपली वेगळी मातृभूमी निर्माण करण्याचा अधिकार असायला हवा, असे त्यांचे म्हणणे होते.

डॉ. आंबेडकर यांनीही एकदा सांगितले होते की, येथे हिंदू आणि मुसलमान अशी दोन स्वतंत्र राष्ट्रे नांदताना दिसत आहेत. मात्र पंडित नेहरू या शहाण्या माणसाने ठोकून जाहीर केले, देशाची घटना धर्मनिरपेक्षच राहील. मी भारताचे हिंदू पाकिस्तान होऊ देणार नाही. धर्माच्या आधारावर निर्माण झालेली अनेक राष्ट्रे कोसळून पडली. त्यात पाकिस्तान आहेच. हिंदू पाकिस्तानच्या दिशेने आपण निघालो आहोत काय?

## न्यू इंडिया को-ऑप. बँकेतील १२२ कोटींचा अपहार
### 30 कोटी रुपये स्वीकारणाऱ्या व्यावसायिकाला अटक

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६ :
न्यू इंडिया को.-ऑप बँकेतील १२२ कोटी रुपयांच्या अपहारातील सुमारे ३० कोटी रुपये स्वीकारणाऱ्या उन्ननाथन अरूणाचलम ऊर्फ अरूण भाई (६२) याला आर्थिक गुन्हे शआखने अटक केली. याप्रकरणी १५ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल झाल्यानंतर अरूण भाई पळून गेला होता. आता याप्रकरणातील अटक आरोपींची संख्या ६ वर पोहोचली आहे.

न्यू इंडिया को ऑपरेटिव्ह बँकेचे महाव्यवस्थापक हितेश मेहता याने इतर आरोपींसोबत कट रचून प्रभादेवी व गोरेगाव शाखेतील तिजोरीमधील १२२ कोटी रुपयांचा अपहार केल्याचा आरोप आहे. त्यातील १५ कोटी रुपये अटक आरोपी अरूणाचलम याने मुलाच्या उपस्थित मेहताकडून स्वीकारले होते. हा व्यवहार २०१९ मध्ये झाला होता. सौरऊर्जा यंत्रणा पुरवणारे व्यवसायिक उन्ननाथन अरूणाचलम ऊर्फ अरूण भाई याला सुमारे ३० कोटी रुपये दिल्याचे चौकशीत हितेशने सांगितले होते. पण याप्रकरणी १५ फेब्रुवारी रोजी दादर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर अरूण भाई व त्याचा मुलगा मनोहर दोघेही पळाले होते. आरोपी मनोहरने अरूण भाईला पळण्यास मदत केली होती. याशिवाय त्याला लपवण्यासाठी विविध व्यक्तींशी संपर्क साधल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. अखेर त्याल अटक करण्यात आली. अरूण भाईने दोन संस्थांमध्ये रक्कम गुंतवण्याचे आश्वासन दिल्याचे मेहताने चौकशीत सांगितले होते. याप्रकरणी अरूणभाईविरोधात आर्थिक गुन्हे शाखेने लुक आऊट सर्कुलर जारी केले होते. गेल्या एक महिन्यांपासून अरूणाचलम पोलिसांचा ससेमिरा चुकवत होता. अखेर त्याला याप्रकरणी अटक करण्यात पोलिसांना यश आले. अरूणचलमला रविवारी न्यायालयासमोर हजर करण्यात आले. त्यावेळी न्यायालयाने त्याला १८ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

याप्रकरणी प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी देवर्षी घोष यांच्या तक्रारीवरून दादर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (५), ६१ (२) अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. त्यात १२२ कोटी रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी बँकेचा महाव्यवस्थापक हितेश मेहता याला आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली. मेहताकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे बांधकाम व्यावसायिक धर्मेश पौन याला पोलिसांनी अटक केली. अपहाराच्या रक्कमेतील ७० कोटी रुपये मेहताने पौनला दिल्याचा संशय आहे. गैरव्यवहार सुरू असतानाही त्याच्याकडे काणाडोळा करणारे बँकेचे माजी सीईओ अभिमन्यू सुरेंदर भोअन यांनाही आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली होती.

# तरुणींमध्ये मूत्राशयाच्या संसर्गाच्या समस्या वाढल्या, कामा रुग्णालयातील डॉक्टरांचा अभ्यास

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई , दि. १६ :** मागील काही वर्षांपासून तरुणीमध्ये लघवी करताना जळजळणे, लघवी तुंबणे किंवा काही कळायच्या आतच लघवी होणे, मूत्राशयामध्ये संसर्ग होणे यांसारख्या मूत्राशयाशी संबंधित समस्या वाढत आहेत. मागील चार वर्षांमध्ये तब्बल३ हजार १४० महिलांमध्ये या समस्या आढळून आल्या असून, त्यातील ७०४ महिलांवर मूत्राशय सिंचन ही प्रक्रिया करण्यात आली. यामध्ये सर्वाधिक प्रमाण हे तरुण महिलांचे असल्याचे आढळून आले आहे.




वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन विभागाच्या अखत्यारितील स्त्री रोग आणि प्रसूतीसाठी प्रख्यात असलेल्या कामा रुग्णालयात २०१४ मध्ये बाह्यरुग्ण विभागात युरोगायनॅक म्हणजेच ओटीपोटाच्या आजारावरील उपचारासाठी स्वतंत्र केंद्र सुरू करण्यात आले.

सरकारी रुग्णालयातील हे पहिलेच केंद्र आहे. या केंद्रामध्ये उपचारासाठी येणाऱ्या महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात ओटीपोटाचे आजार आढळतात. त्यावर स्त्रीरोग तज्ज्ञ किंवा मूत्ररोगतज्ज्ञ उपचार करीत आहेत. मात्र, या दोन्ही विषयांतील तज्ज्ञ या विभागामध्ये रुग्णांवर उपचार करीत आहेत. कामा रुग्णालयातील युरोगायनॅक बाह्यरुग्ण विभागांतर्गत २०१४ ते २०२४या सहा वर्षांत ३ हजार १४० महिलांवर उपचार करण्यात आले.

या महिलांना मूत्राशयासंदर्भात होणाऱ्या आजाराचा व संसर्गाचा कामा रुग्णालयातील डॉक्टरांनी अभ्यास केला. या अभ्यासामध्ये दरवर्षी महिलांमध्ये मूत्राशयाशी संबंधित संसर्ग होण्याचे प्रमाण वाढत असून यामध्ये तरुणींचे प्रमाण अधिक असल्याचे निदर्शनास आले.

**महिलांवर मूत्राशय सिंचन प्रक्रिया**

गेल्या सहा वर्षांत रुग्णालयात आलेल्यांचा करण्यात आलेल्या अभ्यासात महिलांमध्ये निम्म्यापेक्षा जास्त प्रमाण तरुणींचे असल्याचे आढळून आले आहे. मूत्राशयामध्ये संसर्गाचे प्रमाण वाढल्याने रुग्णावर मूत्राशय सिंचन ही प्रक्रिया करावी लागते.

या प्रक्रियेमध्ये रुग्णाचे मूत्राशय स्वच्छ केले जाते. मागील सहा वर्षांमध्ये उपचार करण्यात आलेल्या हजार १४० महिलांपैकी ७०४ महिलांवर मूत्राशय सिंचन ही प्रक्रिया करण्यात आल्याचे कामा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. तुषार पालवे यांनी सांगितले.

**असुरक्षित संभोगामुळे प्रमाण वाढतेय**

तरुण महिलांमध्ये मूत्राशयामध्ये संसर्ग होण्यामागे विविध कारणे आहेत. मात्र त्यामागे असुरक्षित संभोग हे एक महत्त्वाचे कारण आहे. या कारणामुळेच तरुण महिलांमध्ये संसर्ग होण्याचे प्रमाण अधिक दिसून येत आहे. दिवसेंदिवस महिलांमधील या समस्येत वाढ होत आहे. मात्र कामा रुग्णालात ओटीपोटाच्या आजारावरील उपचारासाठी सुरू करण्यात आलेल्या युरोगायनॅक बाह्यरुग्ण विभागात उपचारासाठी येणाऱ्या महिलांना दिलासा मिळत असल्याचेही डॉ. तुषार पालवे यांनी सांगितले.

# एमएमआरमधील मेट्रो प्रकल्पास युकेच्या क्रॉसरेलचे बळ; मेट्रो प्रकल्पातील कार्यप्रणाली, देखभाल, सुरक्षा आदी कामांसाठी क्रॉसरेलची मदत

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई , दि. १७ :** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) मुंबई महानगर प्रदेशातील मेट्रो प्रकल्पांना आता युके सरकारच्या वाहतूक खात्याअंतर्गत येणाऱ्या क्रॉसरेल इंटरनॅशनलचे बळ मिळाले आहे. दावोसमध्ये एमएमआरडीए आणि क्रॉसरेल इंटरनॅशनलमध्ये मेट्रो प्रकल्पातील कार्यप्रणाली, देखभाल सुरक्षा यासह अन्य कामे आणि सेवांकरीता मदतीचा हात देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला होता. त्यानुसार आता क्रॉसरेल आणि एमएमआरडीएने कामास सुरुवात केली आहे. नुकतीच यादृष्टीने एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली असून मेट्रो प्रकल्पातील सेवा-सुविधांना आता बळकटी मिळणार आहे.



एमएमआरडीए एमएमआरमध्ये ३३७ किमी लांबीचे मेट्रोचे जाळे विणत आहे. सध्या ३३७ किमीपैकी मुंबईत अंदाजे ५४ किमी लांबीच्या मेट्रो मार्गिका वाहतूक सेवेत दाखल झाल्या आहेत. यात मेट्रो १ (घाटकोपर अंधेरी वर्सोवा), मेट्रो २ अ (दहिसर अंधेरीप.), मेट्रो ३ (आरे बीकेसी), मेट्रो ७ (दहिसर गुंदवली) या मार्गिकांचा यात समावेश आहे. येत्या एक-दोवर्षात आणखी काही मार्गिका वाहतूक सेवेत दाखल होणार आहेत. मेट्रो सेवा ही वाहतुकीचा कार्यक्षम पर्याय ठरवा यासाठी एमएमआरडीएकडून मेट्रो प्रकल्पातील विविध सुविधांना बळकटी देण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्याचाच भाग म्हणून नुकत्याच झालेल्या दावोसमधील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम २०२५ मध्ये एमएमआरडीए आणि क्रॉसरेलमध्ये एक सामंजस्य करार झाला. या करारानुसार युकेमधील क्रॉसरेल इंटरनॅशनल एमएमआरमधील मेट्रो प्रकल्पांमधील विविध सेवांसाठी आवश्यक ती मदत करणार आहे. विविध सेवांना बळकटी देण्याच्यादृष्टीने क्रॉसरेल एमएमआरडीएला सहकार्य करणार आहे. मेट्रो प्रकल्पातील कार्यप्रणाली, देखभाल, सुरक्षा, डिजिटल परिवर्तन या सेवा आणखी मजबूत करून मेट्रो वाहतूक कार्यक्षम करण्यासाठी आता क्रॉसरेलची मदत होणार आहे.

क्रॉसरेलकडून आता प्रत्यक्ष कामास सुरुवात झाल्याची माहिती महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी दिली. डॉ. मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक बैठक पार पडली असून यात युकेचा वाहतूक विभाग आणि क्रॉसरेल इंटरनॅशनलमधील तज्ज्ञांचा समावेश होता. यावेळी मेट्रो प्रकल्पातील विविध सेवांना बळकटी देण्याच्यादृष्टीने अनेक विषयांवर चर्चा झाल्याचेही डॉ. मुखर्जी यांनी स्पष्ट केले. आता प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाल्याने येत्या काळात एमएमआरमधील मेट्रोची वाहतूक नक्कीच एक कार्यक्षम, मजबूत वाहतूक पर्याय म्हणून ओखळला जाईल, असा विश्वासही यानिमित्ताने व्यक्त केला आहे.

क्रॉसरेलकडून आता प्रत्यक्ष कामास सुरुवात झाल्याची माहिती महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी दिली. डॉ. मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक बैठक पार पडली असून यात युकेचा वाहतूक विभाग आणि क्रॉसरेल इंटरनॅशनलमधील तज्ज्ञांचा समावेश होता. यावेळी मेट्रो प्रकल्पातील विविध सेवांना बळकटी देण्याच्यादृष्टीने अनेक विषयांवर चर्चा झाल्याचेही डॉ. मुखर्जी यांनी स्पष्ट केले. आता प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाल्याने येत्या काळात एमएमआरमधील मेट्रोची वाहतूक नक्कीच एक कार्यक्षम, मजबूत वाहतूक पर्याय म्हणून ओखळला जाईल, असा विश्वासही यानिमित्ताने व्यक्त केला आहे.



# फ्लॉवर, कोबी, ढोबळी मिरची, शेवग्याच्या दरात घट

**पुणे :** आवक वाढल्याने फ्लॉवर, कोबी, ढोबळी मिरची, शेवग्याच्या दरात घट झाली. हिरवी मिरची, मटारच्या दरात वाढ झाली असून अन्य फळभाज्यांचे स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.



श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून मिळून १०० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून ७ ते ८ टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून ४ ते ५ टेम्पो कोबी, कर्नाटक आणि गुजरातमधून मिळून प्रत्येकी२ ते ३ टेम्पो घेवडा, आंध्र प्रदेश, तमिळनाडूतून मिळून ५ ते६ टेम्पो शेवगा, राजस्थानातून ५ ते ६ टेम्पो गाजर, राजस्थानातून ट्रक मटार, कर्नाटकातून३ ते ४ टेम्पो पावटा, ३ टेम्पो भुईमूग शेंग, तामिळनाडू, कर्नाटकातून ते ४ टेम्पो तोतापुरी कैरी, गुजरात आणि मध्य प्रदेशातून १० ते १२ टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

पुणे विभागातून सातारी आले ५०० ते ६०० गोणी, भेंडी ८ ते १० टेम्पो, गवार ५ ते ६ टेम्पो, टोमॅटो ८ ते १० हजार पेटी, हिरवी मिरची ३ ते४ टेम्पो, ढोबळी मिरची १० ते १२ टेम्पो, काकडी १० ते १२ टेम्पो, कोबी ८ ते १० टेम्पो, फ्लॉवर १० ते १२टेम्पो, तांबडा भोपळा १०ते १२ टेम्पो, कांदा ४० ते १०० ट्रक, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून ४० टेम्पो बटाट्याची आवक झाली.

**कोथिंबिर, मेथी, शेपू, कांदापात, राजगिऱ्याच्या दरात घट**

कोथिंबिर, मेथी, शेपू, राजगिरा या पालेभाज्यांच्या दरात घट झाली. चाकवत, पुदिना, अंबाडी, मुळे, चुका, चवळई, पालक या पालेभाज्यांचे दर स्थिर आहेत. तरकारी विभागात कोथिंबीर एक लाख जुडी, मेथीच्या ६० हजार जुडींची आवक झाली., अशी माहिती तरकारी विभागातील व्यापाऱ्यांनी दिली. घाऊक बाजारात पालेभाज्यांचे शेकड्याचे दर पुढीलप्रमाणे कोथिंबीर-ते १०००, मेथी ६०० ते ८००, शेपू ५०० ते ८००, कांदापात-८०ते १०००, चाकवत ३०० ते ६००, करडई-३०० ते ५००, पुदिना ३०० ते ५००, अंबाडी ३०० ते ६००, मुळे ८०० ते १२००, राजगिरा-४०० ते ६००, चुका ५०० ते ८००, चवळई-३००-६००-,पालक -८००-१२००-

**डाळिंब, स्ट्रॉबेरी, पपईच्या दरात घट**

डाळिंब, स्ट्रॉबेरी, पपईच्या दरात घट झाली. खरबूज, पेरूच्या दरात घट झाली आहे. अननस, कलिंगड, मोसंबी, कलिंगड, चिकूचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. फळबाजारात रविवारी मोसंबी ते टन, संत्री ६० ते ६५ टन, डाळिंब ३० ते ३५ टन, पपई १० ते १२ टेम्पो, लिंबे १५०० ते १६०० गोणी, कलिंगड ६० ते ७० टेम्पो, खरबूज १५ ते २० टेम्पो, चिकू दोन हजार खोकी, पेरू ३०० ते४०० प्लास्टिक जाळी (क्रेट), अननस ६ ट्रक अशी आवक झाली.

# महाराष्ट्र दिनी पाळणार मागणी दिन! राज्यभरात बँक मित्रांची आंदोलनाची घोषणा

■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुणे, दि. १६ :** बँकांनी मध्यस्थ कंपन्यांना दूर सारून थेट बँक मित्रांशी करार करावेत आणि त्यांच्या कमिशनमध्ये वाढ करावी, अशी मागणी महाराष्ट्र स्टेट बँक मित्र असोसिएशनने रविवारी केली. तसेच, १ मे रोजी महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाचे औचित्य साधून राज्यभरातून मागणी दिन पाळण्याची घोषणा संघटनेने केली आहे.




महाराष्ट स्टेट बँक मित्र असोसिएशनच्या जिल्हा प्रतिनिधींची सभा रविवारी पुण्यात झाली. या सभेस राज्यभरातून २३ जिल्ह्यांतील १०२ प्रतिनिधी उपस्थित होते. या सभेत बँक मित्रांच्या विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. बँक मित्रांना अल्पशा कमिशनवर काम करावे लागते. त्यांच्या सेवेत सुरक्षितता नाही. वैद्यकीयसह इतर रजा आणि कोणत्याही सेवा, सवलती त्यांना मिळत नाहीत. सरकारी योजनांच्या अंमलबजावणीची अवास्तव उद्दिष्टे बँकांकडून बँक मित्रांवर लादली जातात. उद्दिष्ट पूर्ण न झाल्यास बँक मित्रांचे काम बंद करण्याची धमकी दिली जाते. यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असून, याकडे सभेत लक्ष वेधण्यात आले. राज्यभरात सार्वजनिक क्षेत्रात२० हजारांहून अधिक बँक मित्र कार्यरत आहेत. त्यांचे उत्पन्न वाढण्याऐवजी दिवसेंदिवस घटत आहे. बँकांकडून बँक मित्रांशी थेट करार करून कंत्राटी पद्धतीने त्यांची नेमणूक होत होती आता बँकांकडून मध्यस्थ संस्थेमार्फत बँक मित्रांशी करार केले जातात. बँकांनी अशा मध्यस्थ कंपनीला दूर सारून थेट बँक मित्रांशी करार करावेत आणि त्यांच्या कमिशनच्या दरात वाढ करावी, ही मागणी या सभेत करण्यात आली. बँक मित्रांच्या मागण्या बँकांसह सरकारपर्यंत पोहोचविण्यासाठी आंदोलन करण्याची घोषणाही या वेळी करण्यात आली. १ मे रोजी महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाचे औचित्य साधून बँक मित्र राज्यभरात मागणी दिन पाळणार आहेत. तसेच, संघटनेतर्फे सर्व लोकप्रतिनिधींना भेटून त्यांच्या मागण्यांचे निवेदन देण्यात येणार आहे. या सभेस संघटनेचे अध्यक्ष देविदास तुळजापूरकर, एआयबीइएच्या सहसचिव ललिता जोशी, स्टेट फेडरेशनचे पदाधिकारी सुमित नंबियार, शिरीष राणे, शैलेश टिळेकर आदी उपस्थित होते.

बँकिंग सेवा सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यात बँक मित्र महत्वाची भूमिका बजावतात. सरकारच्या आर्थिक सर्वसमावेशकतेच्या धोरणाची अंमलबजावणी त्यांच्यामुळे होत आहे. हे लक्षात घेऊन सरकारने त्यांना स्थैर्य आणि सुरक्षितता मिळवून द्यायला हवी. तरच जनधनसह इतर सरकारी योजना यशस्वी होतील. -देविदास तुळजापूरकर, अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट बँक मित्र असोसिएशन

# पुणे प्रादेशिक मनोरुग्णालयातील आर्थिक घोटाळा कारवाईच्या फेर्यात!




**मुंबई :** पुण्याच्या येरवडा येथील प्रादेशिक मनोरुग्णालयात मनोरुग्णांच्या अंतर्वस्त्रापासून अंघोळीच्या पाण्यापर्यंत झालेला भ्रष्टाचार चौकशीत उघड झाला असून या प्रकरणी मनोरुग्णालयाच्या अधीक्षकांपासून चौघाजणांवर सोमवारी कारवाई केली जाणार असल्याचे आरोग्य विभागाच्या सूत्रांनी सांगितले. रुग्णालयातील विविध खरेदीत सुमारे सव्वा कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचा ठपका याप्रकरणी नियुक्त केलेल्या चौकशी समितीने ठेवला आहे.

येरवड्यातील प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांवर सव्वाकोटी रुपयांच्या अनियमिततेचा ठपका आरोग्य विभागाच्या चौकशी समितीने ठेवला आहे. रुग्णालयाची देयके फुगविण्यासह सरकारी निधीच्या गैरवापराचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे. अधीक्षकांसह तत्कालीन सरकारी कर्मचाऱ्यांकडून ही रक्कम वसूल करावी, अशी शिफारसही समितीने केली असून याबाबतचा अहवाल आरोग्य आयुक्तांच्या माध्यमातून आरोग्य सचिव निपुण विनायक यांच्याकडे अंतिम कारवाईसाठी गेला आहे. सध्या विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असल्याने येत्या एकदोन दिवसात संबंधित अधिकारी व कर्मचार्यांची निलंबित करून विभागीय चौकशीचे आदेश जारी केले जातील असे आरोग्य विभागातील सूत्रांचे म्हणणे आहे.

# देहूनगरीमध्ये तुकोबांच्या नामाचा गजर; बीजसोहळ्याला भाविकांची अलोट गर्दी



■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुणे, दि. १६ :पिंपरी :** जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या नामगजराने रविवारी देहूनगरी दुमदुमली. भजनी दिंड्यांनी रात्रभर केलेला जागर, काकडा आरती, महापूजा, हरिपाठ अन वीणा, टाळ, मृदंग, चिपळ्यांची साथ अशा भक्तिमय वातावरणात रविवारी वा बीज सोहळा झाला. दुपारी बारा वाजता नांदुरकीच्या वृक्षावर फुलांची उधळण करून आणि मनोभावे हात जोडत भाविकांनी इंद्रायणीच्या काठी भक्तिचैतन्य फुलविले.

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे फाल्गुन कृष्ण द्वितीयेचाय दिवशी सदेह वैकुंठगमन झाले. त्यामुळे हा दिवस तुकाराम बीज म्हणून ओळखला जातो. यंदाचा तुकाराम महाराजांचा त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी वैकुंठगमन सोहळा लाखो भाविकांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा झाला. देहूनगरीत या दिव्य सोहळ्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी दाखल झाले होते.

पहाटे चार वाजता मुख्य देऊळवाड्यात काकडारती झाली. साडेपाच वाजता देऊळवाड्यातील विठ्ठल-रुक्मिणीपूजा, संत तुकाराम महाराज शिळा मंदिरातील महापूजा आणि वैकुंठगमन स्थान येथील पूजा संस्थानाचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे आणि विश्वस्त यांच्या हस्ते झाल्या. प्रांत अधिकारी यशवंत माने, तहसिलदार जयराज देशमुख, वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोर यादव, विश्वस्त माणिक महाराज मोरे, संजय महाराज मोरे, भानुदास महाराज मोरे, संतोष महाराज मोरे, अजित महाराज मोरे, विशाल महाराज मोरे या वेळी उपस्थित होते.

सकाळी दहा वाजता हरीनामच्या गजरात पालखीचे वैकुंठस्थान मंदिराकडे प्रस्थान झाले. त्यानंतर वैकुंठगमन सोहळ्यात बापूसाहेब देहूकर महाराजांचे वैकुंठगमन प्रसंगावर कीर्तन झाले. घोटविन लाळ ब्रम्हज्ञान्या हाती । मुक्ता आत्मस्थिती सोडविन या अभंगावर आधारित कीर्तन झाले. फडकरी, वारकरी, मानकरी यांचा सत्कार झाला.

साडेअकरा वाजता पालखीची वैकुंठगमन मंदिराला प्रदक्षिणा झाली. दुपारी बारापर्यंत तुकोबारायांच्या आणि विठ्ठलाच्या नामाचा गजर झाला. बारा वाजता नांदुरकीच्या वृक्षावर फुलांची उधळण करून, मनोभावे हात जोडत भाविकांनी इंद्रायणीच्या काठी भक्तिचैतन्य फुलविले. दुपारी साडेबारा वाजता वैकुंठस्थान येथून पालखीचे मुख्य देऊळवाड्यातील मंदिराकडे आगमन झाले. हा सोहळा पाहण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी झाली होती. अडीच लाखांहून अधिक भाविक बीज सोहळ्याला उपस्थित होते.

# पुरंदरला विमानतळ होणार, सात गावातील २८३२ हेक्टर जमीन झाली राखीव

■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुणे, दि. १६ :** पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित विमानतळासाठी३३०० सर्वे क्रमांकातील सुमारे २८३२ हेक्टर जमीन राखीव करण्यात आली आहे. या जमिनीसह रस्ते ,पानंद, ओढा, यासाठी त्याच्या सर्वे क्रमांकासह वेगळी माहिती देण्यात आली आहे. अधिसूचना काढून जागा राखीव करण्यात आली असून लवकरच मोबदला कशा पद्धतीने द्यायचा याबाबतची अंतिम अधिसूचना पुढील काळात जारी होण्याची शक्यता आहे. पुरंदर तालुक्यातील वनपुरी, पारगाव मेमाणे, कुंभार वळण, इखतपूर, उदाची वाडी, मुंजवडी ,खानवडी या गावातील जमिनीचे सर्वे क्रमांक त्याच्या क्षेत्रफळासह औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आले आहेत . महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिनियमानुसार हे क्षेत्र निश्चित करण्यात आले आहे. उद्योग विभागाचे सहसचिव डॉ. श्री. ल. पुलकुंडवार यांनी आज ही अधिसूचना जारी केली, यानुसार विमानतळासाठी अधिनिश्चित केलेल्या गावांना आता औद्योगिक क्षेत्राचा दर्जा देण्यात आला असून त्यामध्ये रस्ते पानंद ओढा यासाठी काही जागा संपादित केली जाणार आहे .या सर्व सात गावाच्या गावाच्या चतु:सीमा निश्चित करण्यात आल्या आहेत .त्या लाल रंगाच्या रेषेने दाखवण्यात आल्याचे अधिसूचनेत म्हणले आहे. आता सात गावातील त्या जमिनीवर एमआयडीसीचे शेरे मारण्यात येतील याबाबत पुरंदर तालुक्यातील सात गावातील महसूल अधिकारी, एमआयडीसी चे अधिकारी यांची लवकरच बैठक होऊन भूमिका निश्चित होईल ,त्यानंतर या प्रकल्पामध्ये ज्यांच्या जमिनी जात आहेत त्या जागांची वृत्तपत्रात जाहिरात देऊन हरकती व सूचना मागवल्या जातील. महिन्याभरानंतर सात गावांमधील सर्वे नंबरच्या जमिनीवर एमआयडीसी शेरे मारण्यात येईल . जमिनीची मोजणी होऊन त्याच्या भूसंपादनाची प्रक्रिया सुरू केली जाईल असे सांगण्यात आले.पुरंदर हवेलीचे आमदार विजय शिवतरे यांनी विधानसभेमध्ये नुकतेच अर्थसंकल्पावरील भाषण करताना पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी तरतूद करा अशी आग्रही मागणी केली होती. पुरंदरचे विमानतळ हे आंतरराष्ट्रीय विमानतळ होणार असून पुण्यासह पश्चिम महाराष्ट्राचे ग्रोथ इंजिन म्हणून नावारूपाला येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनतेला सांगितले आहे, मात्र अर्थसंकल्पात त्यावर काहीच तरतूद दिसत नाही असे आमदार विजय शिवतारे यांनी निदर्शनास आणून दिले होते. अर्थसंकल्पामध्ये पुरंदरला काहीच आर्थिक तरतूद नसल्याने सर्वत्र नाराजीचे वातावरण होते. परंतु आता विमानतळाच्या बाबतीत वेगाने हालचाली झाल्यामुळे पुरंदरला विमानतळ होणार हे नक्की झाले आहे.अर्थसंकल्प सादर करण्याच्या दिवशीच पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनासाठी अधिसूचना काढण्यात आल्याने सरकारने विमानतळाची तयारी पूर्ण केल्याचे दिसत आहे .लवकरच या सात गावातील जमिनीच्या खरेदी विक्रीवर निर्बंध येण्याची शक्यता आहे. .एमआयडीसी ने या जमिनीच्या सातबारावर शिक्के मारल्यानंतर एमआयडीसीच्या परवानगीशिवाय कोणालाही जमिनी बाबत व्यवहार करता येणार नाही असे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.





# एमआयडीसीतील राम इंडस्ट्रिजच्या गोदामाला आग

## रात्री उशिरापर्यंत आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न

**महासागर प्रतिनिधी**

**बडनेरा (दि. 16)** - राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एमआयडीसी परिसरात असणार्या राम इंडस्ट्रीजच्या गोदामाला रविवारी सायंकाळी भीषण आग लागली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या पाच ते सहा पाण्याच्या गाड्या आग विझविण्यासाठी घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अथक प्रयत्न सुरू केले. परंतू रात्री उशिरापर्यंत आग आटोक्यात आली नव्हती. त्यामुळे रात्री उशिरापर्यंत आगीची भिषणता कायम होती. एमआयडीसीतील राम इंडस्ट्रीजच्या सरकिचा गोदामाला भीषण आग लागल्याची माहिती अग्निशमन विभागाला मीळाली होती. या माहितीवरून तत्काळ अग्निशमनच्या पाच ते सहा गाड्या घटनास्थळी रवाना झाल्या. अग्निशमन दलाने तत्काळ आगीवर पाण्याचा मारा सुरु केला. परंतू आगीचे रौद्ररुप पाहता आग नियंत्रणात येत नव्हती. अशातच आग आजुबाजुला पसरली. त्यामुळे चार फॅक्टर्यांना आगीची झळ बसली होती. रात्री उशिरापर्यंत आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरु होते. या घटनेमुळे एमआयडीसीतील उद्योगपतींमध्ये खळबळ उडाली होती. या घटनेच्या माहितीवरून पोलिस यंत्रणा सुध्दा घटनास्थळी पोहोचली. पोलिसांनी सुरक्षेच्या अनुषंगाने खबरदारी घेतली.

# रिमोटद्वारे इलेक्ट्रॉनिक्स वजन काट्यातील मोजमापात घोळ

## शिरखेड पोलीसांनी केली सहा जणांना अटक



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.16)** - रिमोटद्वारे इलेक्ट्रॉनिक्स वजन काट्यातील मोजमापात घोळ करून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या सहा जणांना शिरखेड पोलिसांनी 15 मार्च रोजी अटक केली. तनविर अहमद मोहम्मद जमीर, राजीक खान नुर खान (40), जाफर बेग जमीर बेग (30, रा. नायगांव), मोहम्मद तजक्कीर मोहम्मद जमीर, मनोहर श्रीराम भवाने (56. सर्व रा. बार्शीटाकळी, जि. अकोला) व योगेश वाठोडकर (रा. सालोरा खुर्द, जि. अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत. आरोपींच्या ताब्यातुन ईलेक्ट्रानिक्स वजन काटा, टाटा 407 वाहन, 1208 किलो, ग्रॅम कापुस, 6 मोबाईल व 2 लाख 50 हजाराची रोख असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

शिरखेड हद्दीतील निर्भी येथे 15 मार्च रोजी कापुस विक्री करणारे शेतकरी व कापुस खरेदी करणारे व्यापारी यांच्यात कापुस मोजमाप करण्याचे कारणावरून वाद सुरू असल्याची माहीती शिरखेड पोलिसांना प्राप्त झाली होती.

या माहितीवरून शिरखेडचे ठाणेदार सचिन लुले व पोलीस अमंलदार हे त्वरीत घटनास्थळी रवाना झाले. पोलिसांनी सर्व घटनाक्रम जाणुन घेतला असता माहीती मिळाली की, शेतकर्यांकडुन कापुस खरेदी करण्याकरिता 8-10 व्यापारी हे एजंट योगश वाठोडकर ( रा. सालोरा खुर्द, जि. अमरावती) यांचे मार्फतीने निभी येथे आले होते. कापुस खरेदी-विक्रीचा व्यवहार सुरू असतांना कापुस ईलेक्ट्रानिक्स वजन काट्यावर मोजमाप करून देण्यात येत होते. त्यावेळी काही शेतकर्यांना वजन काटयाबाबत शंका निर्माण झाली आणि त्यांच्यात वाद सुरू असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पोलीसांनी घटनास्थळावरच शेतकर्यांनी विकलेल्या कापसाचा आकडा व प्रत्यक्ष व्यापारी यांच्या टाटा 407 वाहनात असलेल्या कापसाची तपासणी केली असता त्यात तफावत दिसुन आली. त्यामुळे शेतकर्यांची कापुस मोजमाप करताना फसवणुक होत असल्याचे लक्षात आले. याप्रकरणात पोलीस पथकाने उपस्थित व्यापारी तनविर अहमद मो. जमीर, राजीक खान नुर खान, जाफर बेग जमीर बेग, मो. तजक्कीर मो. जमीर, मनोहर श्रीराम भवाने, योगश वाठोडकर यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांचे इतर साथीदार हे गर्दीचा फायदा घेवुन पळुन गेल्याचे सांगितले.

त्यांच्या जवळील सदर ईलेक्ट्रॉनिक वजनकाटयाचे रिमोट असुन त्याव्दारे ते शेतकर्याची कापुस खरेदी दरम्यान फसवणुक करित असल्याचे सांगीतले. पोलिसांनी आरोपींना न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने आरोपींना 19 मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिस आरोपींच्या इतर फरार साथीदारांचा शोध घेत आहे. सदर घटनेचे अनुषंगाने तक्रारदार शुभम नंदकुमार साबळे (30, रा. निर्भी) यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषगांने शिरखेड पोलिस ठाण्यात आरोपीविरूध्द भारतीय न्याय संहिता कलम 318 (4), 3(5) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून ईलेक्ट्रानिक्स वजन काटा, टाटा 407 वाहन, 1208 कि.ग्र.कापुस, 6 मोबाईल व 2 लाख 50 हजाराची रोख जप्त करण्यात आले आहे. पुढील तपास शिरखेड पोलीस करित आहेत.

### या पथकाची कामगिरी

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, , मोर्शीचे उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार सचिन लुले यांच्या नेतृत्वात सहायक पोलिस निरीक्षक राहुल गवई, पोलिस उपनिरीक्षक संजय ठाकरे, पोलीस अमंलदार सचिन भाकरे, कळसकर, मेटकर, वैभव घोगरे, मयुर कापडे, संतोष झाडे, स्वप्नील डहाके यांनी केली आहे.

# घाटलाडकी शिवारातील त्या बिबट्याचे शिकारसत्र सुरुच

## ओलित करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुरबाजार (दि. 16)** - घाटलाडकी शेतशिवारात मागील वीस दिवसापासून बिबट्याने हौदोस घातला आहे. मात्र वन अधिकारी अद्याप पर्यंत आपली जबाबदारी स्वीकारायला तयार नसल्याचे चित्र सध्या आहे. परिसरात 6 मार्च रोजी एका गाईची शिकार केल्यावर 13 मार्च रोजी पुन्हा दोन गाईची शिकार बिबट्याने केली होती. आता पुन्हा याच बिबट्याने 15 मार्च रोजी दोन वराहासह एका हरिणीची शिकार केली आहे. असे असतानाही वन अधिकारी या प्रकाराला गांभीर्याने घ्यायला तयार नसल्याची ओरड स्थानिक नागरिकात आहे. या परिसरात कुठलाही अधिकारी गस्तीची जबाबदारी स्वीकारत नाही, गस्तीच्या नावाखाली रोजंदारी करणाऱ्या मजुरांना जंगलात पाठविले जात आहे. अधिकाऱ्यांची टोलवा टोलवी सुरुच आहे. मात्र मजुरांच्या जिवाची जबाबदारी कोण घेणार, असाही प्रश्न दबक्या आवाजात उपस्थित होत आहे. या रोजच्या होणाऱ्या घटनेमुळे शेतकऱ्यांच्या मनात भीतीचे वातावरण तयार झाले आहे. शेतात जनावरे बांधावी कि नाही अशी चिंता शेतकऱ्यांसमोर निर्माण झाली आहे. भीतीच्या वातावरणामुळे रात्रीचे ओलीत करायला मजूर मिळत नसल्याने शेतकऱ्यांसमोर मोठी अडचण निर्माण होत आहे. वन विभागाचे अधिकारी शेतकऱ्यांच्या या समस्येवर तोडगा काढताना दिसत नाहीत. गेल्या महिन्या भरापासून पाच ते सात किलोमीटर परिसरातील शेतशिवारात शिकार होत असतांना वन अधिकाऱ्याकडून या बिबट्याचा शोध घेतला गेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांकडून वन विभागाविषयी नाराजीचा सुरु आहे.

# दुचाकी अपघातात युवक गंभीर जखमी

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,(दि.16)** - मध्यप्रदेशातील आपल्या स्वत:च्या गावातून होळी साजरी करून आलेल्या एका 35 वर्षीय युवकाचा मोटर सायकल स्लिप होऊन गंभीर अपघात झाल्याची घटना आज दि.16 मार्च रोजी दु.11 वाजता पाळा-मोर्शी रोडवर असलेल्या बियाणी बागजवळ घडली.

सावरखेड येथे वास्तव्यास असणाऱ्या सीताराम उईके वय (35 वर्ष) हा मध्यप्रदेश येथील त्यांच्या गावाला नवीन हिरोहोंडा शाईन मोटर सायकलने होळीचा सण साजरा करण्यासाठी गेला होते. आपल्या गावात होळीचा आणि धूळमातीचा आनंद लुटून ते आज दि.16 मार्च रोजी सावरखेड येथे परत येत असतांना पाळा ते मोर्शी मार्गावर असलेल्या बियाणी बागेजवळ दुचाकी गाडीचे संतुलन बिघडून गाडीची धडक एका बोर्डवर बसली व सिताराम हे रोडवर फेकल्या गेले. या गंभीर अपघातात त्यांचा पाय मोडला व मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. जवळपास एक तासापासून रस्त्यावर रक्ताच्या थारोळ्यात पडून असलेल्या अपघातग्रस्ताची माहिती तानाजी युवा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष राहुल पंडागरे यांना मिळताच त्यांनी तात्काळ आपली मित्रमंडळी घेऊन घटनास्थळी धाव घेतली व अपघातग्रस्त युवकाला त्यांनी मोर्शी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी अपघातग्रस्त इसमावर प्रथमोपचार करून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारांसाठी जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती येथे हलविण्यात आले. याप्रकरणी मोर्शीचे ठाणेदार नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पंकज साबळे यांनी पंचनामा आटोपला. सामाजिक क्षेत्रात नेहमीच अग्रेसर असणाऱ्या तानाजी बहुउद्देशीय मंडळाचे अध्यक्ष राहुल पंडागरे, रवी परतेती, यश पांडे, हर्षल गलपट, कांतीलाल सिरसाम, तेजस नागले यांनी वेळीच मदत करून रुग्णाला जीवनदान दिल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# तक्रारी सोडविण्यासाठी डीसीपी, एसीपींचा लोकदरबार

## प्रत्येक पोलीस ठाण्याला भेट देणार ■ नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 16)** - पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपायुक्त आणि सहायक पोलिस आयुक्त नागरिकांच्या तक्रारींचा तातडीने निपटारा करण्याच्या उद्देशाने प्रत्येक पोलिस ठाण्याला भेट देणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी आपल्या तक्रारी घेऊन संबंधित पोलिस ठाण्यात येण्याचे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

पोलिस उपायुक्त सागर पाटील, गणेश शिंदे, सहायक पोलिस आयुक्त हे प्रत्येक पोलिस ठाण्यात नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा करणार आहे. यामध्ये पोलिस उपायुक्त परिमंडळ एक हे 18 मार्च रोजी बडनेरा पोलिस ठाण्यात तर 8 एप्रिल रोजी नांदगाव पेठ ठाण्यातील तक्रारींचा निपटारा करणार आहे. त्याचप्रमाणे नांदगांवपेठ ठाण्यात 20 मार्च व 10 एप्रिल, गाडगेनगर ठाण्यात 25 मार्च व 15 एप्रिल, वलगांव ठाण्यात 27 मार्च व 17 एप्रिल, फ्रेजरपुरा ठाण्यात 1 एप्रिल व 22 एप्रिल, नागपुरीगेट ठाण्यात 3 एप्रिल व 24 एप्रिल रोजी भेट देणार आहे. तसेच परिमंडळ 2 चे पोलिस उपायुक्त राजापेठ पोलिस ठाण्यात 18 मार्च, 1 एप्रिल व 15 एप्रिल रोजी भेट देणार आहे. त्याचप्रमाणे खोलापुरीगेट ठाण्यात 20 मार्च, 3 एप्रिल व 17 एप्रिल, कोतवाली ठाण्यात 25 मार्च, 8 एप्रिल व 22 एप्रिल, भातकुली ठाण्यात 27 मार्च, 10 एप्रिल व 24 एप्रिल ला भेट देऊन तक्रारींचा निपटारा

### एसीपीही करणार तक्रारींचा निपटारा

फ्रेजरपुरा विभागाचे सहायक पोलिस आयुक्त कैलास पुंडकर हे बडनेरा ठाण्यात 17, 20, 25 व 28 मार्च रोजी तक्रारीचा निपटारा करणार आहे. तसेच फ्रेजरपुरा ठाण्यात 18, 21 व 26 मार्च, नांदगांवपेठमध्ये 19, 24 व 27 मार्चला भेट देणार आहे. त्याचप्रमाणे गाडगेनगर विभागाचे सहायक पोलिस आयुक्त अरुण पाटिल हे गाडगेनगर ठाण्यात 17, 20, 25 व 28 मार्च रोजी तक्रारीचा निपटारा करणार आहे. तसेच नागपुरीगेट ठाण्यात 18, 21, 26 मार्च, वलगांव ठाण्यात 19, 24, 27 मार्च रोजी भेटी देऊन तक्रारीचा निपटारा करणार आहे. तर राजापेठ विभागाचे सहायक पोलिस आयुक्त जयदत्त भवर हे 17, 21 व 27 मार्च रोजी राजापेठ ठाण्यातील तक्रारीचा निपटारा करणार आहे. तसेच कोतवाली ठाण्यात 18, 24 व 28 मार्च, खोलापुरीगेट ठाण्यात 19 व 25 मार्च आणि भातकुली ठाण्यात 20 व 26 मार्च रोजी भेंट देऊन तक्रारींचा निपटारा करणार आहे. या तक्रारींच्या निपटारा करण्यासाठी डीसीपी व एसीपी सकाळी 10 ते दुपारी 2 वाजेपर्यंत पोलिस ठाण्यात असणार आहे.

# कर्जमाफीचा विसर पडलेल्या शासनवर आंदोलनातून ओढले ताशेरे






■ बच्चू कडूंचे शासन विरोधी रंगपंचमी आंदोलन ■

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.16)** - प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष व माजी आमदार बच्चू कडू यांनी नेहमीप्रमाणे शेतकरी, दिव्यांग आणि गरजूंवरील अन्यायाविरोधात आपला आवाज उठवत आगळ्यावेगळ्या आंदोलनाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधले. राज्यभरातील राजकीय नेते आपल्या कुटुंबीयांसह रंगपंचमीचा सण साजरा करत असताना बच्चू कडू आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मुद्द्यावर सरकारला जाब विचारण्यासाठी शुक्रवार दि. 14 मार्च रोजी रस्ते रंगवत शासन नितीच्या फसव्या आश्वासनावर अनोखे आंदोलनातून रंगाचे पोतिरे ओढत शेतकरी विरोधी नितीवर संतप्त भावना व्यक्त केल्या.

महायुती सरकारने आपल्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांची कर्जमाफी जाहीर केली होती, परंतु अद्याप ती पूर्ण न झाल्याने बच्चू कडू यांनी शासनाविरोधात संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. शेतकऱ्यांची कर्जमाफी केव्हा करणार? की भगवा, हिरवा, निळा या रंगातच राजकारण करणार? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. या आंदोलनात हजारो प्रहार कार्यकर्ते सहभागी झाले होते आणि त्यांनी संत गाडगेबाबा अभ्यासीकेचा परिसर रंगवून वेगळा सामाजिक संदेश दिला. चांदुरबाजार तालुक्यातील कुरळपूर्णा येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आश्वासनाच्या फसवेगिरीवर टीका करणारे पोस्टर्स लावण्यात आले. लाडक्या भावाला लुटले आणि बहिणीला दिले, कापूस, हिरवा, भगवा, निळा, पांढरा झाला, अन सगळ्या झेंड्याचा कपडा शेता मधून आला. या पोस्टरमधून शेतकऱ्यांच्या परिस्थितीवर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. बच्चू कडू म्हणाले, शेतकरी आणि शेतमजूर यांना फसवून सत्ताधारी पक्षांनी सत्तेचा गैरवापर केला आहे.

आश्वासनांची फसवणूक करत सत्ता भोगण्याचा डाव रचला जात आहे. मतदारांशी केलेली ही फसवणूक लोकशाहीसाठी घातक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलेली कर्जमाफी तत्काळ पूर्ण करण्यात यावी.

दरवर्षी बच्चू कडू रंगपंचमीच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जोपासत शाळा आणि रुग्णालयांना रंगवण्याचे कार्य करतात. यावर्षी देखील त्यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणावर प्रहार पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला आणि आंदोलनाच्या माध्यमातून शासनाच्या आश्वासनांची आठवण करून दिली.

# आरटीई : आतापर्यंत 1651 बालकाचे प्रवेश




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 16)** -आरटीई प्रवेश प्रक्रियेत आजवर 1 हजार 651 विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले, तर अद्यापही संदेश प्राप्त झालेल्या 745 पाल्यांचे प्रवेश बाकी आहेत. त्यामुळे प्रतीक्षा यादीतील बालकांना प्रवेशाची संधी मिळणार आहे. ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश अद्याप झाले नाहीत, अशा विद्यार्थ्यांनी तत्काळ प्रवेश घेण्याचे आवाहन शिक्षण विभागाने पालकांना केले आहे.

2025-26 या शैक्षणिक वर्षाकरिता आरटीई प्रवेशाला 14 फेब्रुवारीपासून सुरुवात झाली. 28 फेब्रुवारीपर्यंत सदरचे प्रवेश स्वीकारले जाणार होते. मात्र, याला 10 मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. यापूर्वी तालुकास्तरीय समितीकडून कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे. त्यांच्या शिफारशीनंतरच संबंधित शाळेत पाल्यांचे प्रवेश निश्चित होत आहेत. जिल्ह्यात 225 शाळांमध्ये 2430 जागांकरिता आरटीईअंतर्गत प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. जिल्ह्यात 8149 प्रवेशासाठी अर्ज प्राप्त झाले होते. या अर्जावर सोडत काढण्यात आली. पहिल्या टप्प्यात 2396 विद्यार्थ्यांची यादी घोषित केल्यानंतर या पालकांना त्यांच्या मोबाइलवर प्रवेश निश्चितीबाबत संदेशही प्राप्त झाले. त्यानंतर पडताळणी समितीकडे कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे. या कालावधीत 2396 पैकी केवळ 1651 पाल्यांचेच प्रवेश निश्चित झालेत. बहुतांश अर्ज पडताळणी समितीकडे प्रलंबित असून, अन्य पालकांनी मात्र अद्यापही समितीकडे कागदपत्रांची पडताळणी सुरू केली नाही. त्यामुळे संबंधित पालकांनी त्वरित समितीकडून पाल्यांचा प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले. अन्यथा प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी देण्यात येणार आहे.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# प्लास्टिक पिशव्यांवर बंदी काळाची गरज!

काही दिवसांवर येणाऱ्या होळी आणि धुलिवंदनची धूम बच्चे कंपनीमध्ये आतापासूनच सुरु झाली आहे. होळीनिमित्त पाण्याने भरायचे फुगे आता दुर्मिळ झाल्याने गेल्या काही वर्षांपासून मुलांकडून जाडीने अत्यंत पातळ असणाऱ्या पिशव्यांचा फुग्यांप्रमाणे वापर केला जात आहे. दरवर्षी होळीच्या अनुषंगाने अशा पातळ पिशव्यांचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. या पिशव्या फुटल्यावर त्यांचे तुकडे आहे तिथेच पडून राहतात. होळी आणि धुलिवंदनाच्या दिवशी रस्त्यांवर या पिशव्यांचा अक्षरशः खच पडलेला पाहायला मिळतो. याच पिशव्या हवेमुळे जवळच्या गटारांत आणि नाल्यांत जातात आणि पुढे जे व्हायचे तेच होते. दरवर्षी एवढ्या मोठ्या प्रमाणात या पिशव्या येतात कुठून हा प्रश्न त्यावेळी सर्वांनाच पडतो. प्लास्टिक पिशव्यांविरुद्धच्या मोहिमेअंतर्गत सरकारी कर्मचारी विक्रेत्यांवर कारवाई करतात; मात्र या कमी जाडीच्या पिशव्या ज्या ठिकाणी तयार केल्या जातात त्या कारखान्यांवर किंवा त्यांच्या घाऊक व्यापाऱ्यांवर सरकारी अधिकाऱ्यांकडून कारवाई केली गेल्याचे आजतागायत ऐकिवात नाही. त्यामुळे प्लास्टिक पिशव्यांविरुद्ध सरकारची अधूनमधून उघडली जाणारी मोहीम ही पर्यावरणाच्या रक्षणासाठी असते की केवळ दंडवसुलीतून महसूल मिळवण्यासाठी असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडल्यावाचून राहत नाही. २६ जुलै २००५ या दिवशी झालेल्या मुसळधार पावसाने साऱ्या मुंबईची तुंबई करून टाकली. मुंबई नगरीत आलेल्या या महापुराने शेकडो निष्पाप नागरिकांचा बळी घेतला. अनेकांच्या घरात पाणी शिरून कोट्यवधी रुपयांची वित्तीय हानी झाली. या महापुरामागील कारणमीमांसा तपासताना अतिक्रमणामुळे मिठी नदीचे अरुंद होत चाललेले पात्र, नाल्यांच्या साफसफाईतील अनियमितता, स्थानिक लोकप्रतिनिधींचा हलगर्जीपणा यासारख्या अनेक गोष्टींवर चर्चा झाली. नाल्यांचा साफसफाईतील मोठा अडसर असतो तो प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा. या प्लास्टिक पिशव्या गटाराच्या जाळ्या निकामी करतात. ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पातळ पिशव्यांचा पुनर्वापर शक्य होत नाही. गटारांच्या जाळ्यांना असे पातळ प्लास्टिक चिकटल्यास पाण्याचा निचरा होत नाही. परिणामी पाणी बराच काळ बाहेर तुंबून राहते. जमिनीच्या तळाशी प्लास्टिक चिकटून राहिल्यास पाण्याचे नैसर्गिक स्रोत बंद होतात. कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून अन्न शोधताना बऱ्याचदा प्लास्टिकच्या पिशव्या जनावरांच्या पोटात जातात ज्यामुळे त्यांचा जीवही जातो. पातळ प्लॅस्टिक पिशव्यांच्या संदर्भात नैसर्गिकरित्या कुजण्याची किंवा नष्ट होण्याची प्रक्रिया होत नसल्याने वर्षानुवर्षे या पिशव्या तग धरून राहतात त्यामुळे अशा पातळ पिशव्यांवर बंदी घालणेच इष्ट असल्याचे लक्षात घेऊन राज्यात ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्यांवर कायद्याने बंदी घालण्यात आली. बंदी येताच सरकारच्या वतीने भरारी पथकांची नेमणूक करून प्लास्टिक पिशव्यांचे स्रोत असलेल्या किराणा मालाच्या, फळांच्या, भाज्यांच्या दुकानांवर धाडी टाकून ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्या मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आल्या आणि त्या देणाऱ्या विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली ज्यामधून सरकार दरबारी लाखोंचा महसूल गोळा झाला.

सरकारच्या अन्य मोहिमांप्रमाणे ही मोहीमही काही दिवसांनी थंड पडली, पातळ पिशव्या पुन्हा बाजारात भाजी, फळे, मासे विक्रेत्यांकडे दिसू लागल्या. कालांतराने कोणीतरी न्यायालयात याचिका दाखल करून, सरकार दरबारी निवेदने देऊन किंवा विरोधी पक्षाच्या निदर्शनास आणून देऊन राज्यात प्लास्टिक पिशव्यांवरील बंदीचे कसे तीनतेरा वाजले आहेत ही बाब निदर्शनास आणून देते आणि पुन्हा एकदा सरकार खडबडून जागे होते. पुन्हा नव्याने कारवाईला सुरुवात होते. २००५ सालापासून आजतागायत प्लास्टिक पिशव्यांसह समस्त प्लास्टिक वस्तूंवर ६-७ वेळा बंदीची मोहीम उघडण्यात आली असून सहाही वेळा ही मोहीम काही कालावधी चालल्यानंतर पुन्हा बंद पडली आहे. १ जुलै २०२२ पासून राज्यात प्लास्टिक(काही अपवाद वगळता) आणि थर्माकोल यांवर कायमस्वरूपी बंदी आणण्यात आली आहे. काही वर्षांपूर्वी प्लास्टीकचा 'प' सुद्धा माहित नसणाऱ्या जगाला आज प्लास्टिकशिवाय जगणेही कठीण वाटू लागले आहे, त्यामुळे प्लास्टिकवरील बंदी यशस्वी होईल का याविषयी त्यावेळीच लोकांच्या मनात संभ्रम होता. सरकारच्या वतीने प्लॅस्टिकच्या सर्व वस्तूंना पर्यायही सुचवण्यात आले होते. त्या दरम्यान कापडी पिशव्यांना भलतेच महत्व प्राप्त झाले होते. पानाच्या टपऱ्यांपासून, वर्तमान पत्र विक्रेत्यांपासून ते हार्डवेअरच्या दुकानांनांपर्यंत सर्वत्र कापडी पिशव्या विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे चित्र त्यावेळी पाहायला मिळत होते. ही मोहीमसुद्धा अपेक्षेप्रमाणे काही कालानंतर थंडावली. आजमितीला किराणा मालाचे दुकान, भाजीविक्रेता, फळ विक्रेता, मांस मटण विक्रेता, कापड विक्रेता, भांडी विक्रेता आदी सर्वांकडे प्लॅस्टिकच्या पातळ पिशव्या ग्राहकांना न मागताही मिळू लागल्या आहेत. ट्रेन आणि एसटीमध्ये येणारे खाद्यपदार्थ आणि भाजी-फळ विक्रेतेही १०-१५ रुपयांच्या खरेदीवर या पातळ पिशव्या सहजपणे लोकांना बहाल करू लागले आहेत.

प्लास्टिक पिशव्यांविरुद्धची मोहीम यशस्वी करण्यासाठी विक्रेते आणि ग्राहक यांचे सहकार्य अत्यंत मोलाचे आहे. ग्राहक सोबत कापडी पिशव्या बाळगत नसल्याने लहान सहान वस्तूंच्या खरेदीनंतरही विक्रेत्यांकडून पिशवीची मागणी करतात. ग्राहक नाराज होऊन अन्य दुकानांत खरेदीसाठी जाऊ नये म्हणून विक्रेतेही ग्राहकांना देण्यास परवडतील अशा हलक्या दर्जाच्या आणि कमी जाडीच्या पिशव्या दुकानांत ठेवतात. ग्राहकांची मागणी आणि विक्रेत्यांचा नाईलाज यामुळे प्लास्टिक पिशव्यांना सध्यातरी बाजारात मरण नाही. गरज आणि पुरवठा या समांतर चालणाऱ्या बाबी असून गरज घटली किंवा नष्ट झाली कि पुरवठाही आपसूकच थांबतो या न्यायाने प्लॅस्टिकच्या पिशव्यांची जनमानसांत निर्माण झालेली गरज आज थांबवली गेली पाहिजे. पर्यावरणाच्या समतोल ढासळण्यास कारणीभूत असणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळण्याच्या दृष्टीने व्यापक जनप्रबोधन काळाची गरज असून त्यासाठी संबंधित सरकारी खात्यांसह सेवाभावी, सामाजिक आणि निसर्गप्रेमी संस्थांनी पुढाकार घेण्याची आज नितांत आवश्यकता आहे अन्यथा येणाऱ्या काळात २६ जुलैपेक्षा मोठा प्रलय पाहावा लागेल.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.क्र. ९६६४५५९७८०

# पहिली महिला अंतराळवीर कल्पना चावला



आज १७ मार्च, भारतीय वंशाची अमेरिकन अंतराळवीर कल्पना चावला यांची जयंती. २१ वर्षापूर्वी त्यांच्या कोलंबिया या यानाला पृथ्वीवर परत येत असताना अपघात होऊन त्यात त्यांचा दुर्दवी मृत्यू झाला. त्यांच्या सोबत सहा अंतराळवीरांचा चमू देखील होता त्यांचा देखील या अपघातात दुर्दैवी अंत झाला. कल्पना या अंतराळात जाणाऱ्या भारतीय वंशाच्या पहिल्या महिला अंतराळवीर होत्या . त्यांचा जन्म १७ मार्च १९६२ रोजी हरयाणातील कर्नाल येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बनारसीलाल चावला तर आईचे नाव संयोगीता असे होते. त्यांच्या वडिलांचा औद्योगिक वस्तू निर्मितीचा व्यवसाय होता आणि आई गृहिणी होती. कल्पना चावला यांचे शालेय शिक्षण टागोर बाल निकेतन या विद्यालयात झाले. अभ्यासात हुशार असणाऱ्या कल्पना चावला यांनी १९८२ साली पंजाब विद्यापीठातून एरोनिटीकल अभियांत्रिकी पदवी मिळवली. त्यांनी १९८४साली अमेरिकेच्या टेक्सास विद्यापीठातून एरोनिटीकल उच्च अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून कोलोरॅडो विद्यापीठातून एरोस्पेस अभियांत्रिकी विभागातून १९८८ साली डॉक्टरेट पदवी प्राप्त केली. त्यांचे अंतराळवीर होण्याचे स्वप्न होते. ते पूर्ण करण्यासाठी त्या नासा या अमेरिकेतील अंतराळ संशोधन संस्थेत भरती झाल्या. १९८८ मध्ये त्यांनी नासातील एम्स रिसर्च सेंटर ओव्हरसेट मेथडसच्या उपाध्यक्षा म्हणून काम पाहिले. तिथे त्यांनी कॉम्प्युटीशनल फ्ल्यूईड डायनॅमिकमध्ये जागेवरच उभे उड्डाण आणि जमिनीवर उतरणे या विषयांवर संशोधन केले. त्यानंतर त्यांना ग्लायडर्स, सीलपेन्स तसेच एक किंवा अनेक इंजिन असलेली विमाने याच्या व्यावसायिक वैमानिकांना प्रशिक्षण देण्याचा परवाना मिळाला. १९९१ साली त्यांना अमेरिकेचे नागरिकत्व मिळाले. नागरिकत्व मिळाल्यावर त्यांनी १९९५ साली नासामध्ये अस्ट्रोनोट कॉर्प्स होण्यासाठी अर्ज केला. त्यांना त्यासाठी नासाने त्यांना प्रवेशही दिला. त्यांची मार्च १९९६ मध्ये पहिल्या उड्डाणासाठी निवड झाली. त्यांची पहिली अंतराळ मोहीम १९ नोव्हेंबर १९९७ रोजी चालू झाली. त्यांनी अंतराळात १०.६७ दशलक्ष किमी प्रवास केला. हे अंतर २५२ वेळा पृथ्वीला प्रदक्षिणा घालण्याऐवढे होते. कल्पना चावला यांना २००० साली त्यांच्या दुसऱ्या उड्डाणासाठी एसटीएस १०७ साठी देखील निवड झाली परंतु ही मोहीम तांत्रिक अडचणीमुळे लांबली जात होती. त्या १६ जानेवारी २००३ रोजी एसटीएस १०७ मोहिमेसाठी जाण्यासाठी कोलंबिया अंतराळ मोहिमेवर आल्या. या मोहिमेत कल्पना चावला यांना सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात प्रयोग करणे ज्यामध्ये ते आणि त्यांच्या चमुला ८० प्रयोग करावयाचे होते त्यात पृथ्वी आणि अंतराळ विज्ञान, अद्ययावत तंत्रज्ञान निर्मिती अंतरळवीरांचे आरोग्य आणि सुरक्षा या विषयांचा समावेश होता. आपली मोहीम फत्ते करून १ फेब्रुवारी २००३ रोजी हे अंतराळ यान कोलंबियाच्या टेक्सास येथे पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताना आणि जमिनीवर उतरताना दुर्दवी अपघात झाला. या दुर्दवी अपघातात कल्पना चावला आणि त्यांच्या चमुचा दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या मृत्यूनंतर जगभर हळहळ व्यक्त करण्यात आली. त्यांना मरणोत्तर काँग्रेशनल स्पेस सेवा पदक, नासा स्पेस फ्लाईट तसेच नासा विशेष सेवा पदकाने गौरविण्यात आले. जगभरातील विविध विद्यापीठांनी त्यांच्या नावे विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्या जाहीर केल्या. ५ फेब्रुवारी २००३ साली भारताच्या पंतप्रधानांनी हवामान विषयीच्या उपग्रहाला कल्पना १ हे नाव दिले. त्यानंतर सोडण्यात आलेल्या उपग्रहालाही कल्पना २ हे नाव देण्यात आले. हरियाणा सरकारने कल्पना चावला यांच्या नावाने ज्योतिसार, कुरुक्षेत्र येथे प्लेनेटेरियम सुरू केले. नासाने सुपर कॉम्प्युटरला कल्पना चावला यांचे नाव दिले. कल्पना चावला यांनी आपल्या धैर्य, चिकाटी, जिद्द आणि बलिदानाने देशाचे नाव उज्ज्वल केले. कल्पना चावला या आज आपल्यात नसल्या तरी त्यांच्या स्मृती आजही आपल्या मनात कायम आहे. कल्पना चावला यांचे कार्य आजच्याच नाही तर येणाऱ्या पिढीसाठीही प्रेरणादायी आहे. पहिल्या महिला अंतराळवीर कल्पना चावला यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# केवळ कागदी कपाचा विचार करून चालेल काय?

आजकाल कागदी कपावर खुप विचार मंथन होत असल्याचे दिसून येत आहे. हा प्रश्न केवळ कागदी कप एवढाच आहे काय? मनात काहूर उठवून जातो. त्या सारखेच ग्लास, वाट्या, प्लेट, ताटे, द्रोण इत्यादी वस्तू तश्याच तयार केल्या आहेत. त्यात ही आपण गरम आणि थंड पदार्थ खातच असतो की, त्यात भाज्या, पोळी, वरण, भात, चटणी आदी गरम पदार्थ टाकतो आपण. त्याला पण प्लास्टिकची पातळ परत लागलेली असतेच. त्यांचा पण दुष्परिणाम शरीरावर होतो. तेव्हा केवळ कपाबद्दल न बोलत संपूर्ण डिस्पोजेबल सामुग्री बद्दल विचार करणे अपरिहार्य आहे.

आजकाल नोकरी निमित्त अनेक तरुण मोठ्या शहरात स्थलांतरित झाली आहे. लहान जागेत रहावे लागते त्यांना. एखाद्या वेळी गावाकडील पाहूणे गेली तर आजची आधुनिक शहरी सुनबाई भांडे घासण्याचा त्रास वाचवण्यासाठी पतीला डिस्पोजेबल साहित्य मागविते. त्यात जेवण किंवा पेय पिल्यानंतर त्याचे परिणाम स्वतः वर आणि पाहुणे मंडळीवर काय होतात? त्याबाबत ती पण पूर्णतः अनिभिज्ञ असते. त्यात तिचा दोष बिलकुल नाही. कारण आज हे संशोधनात सिध्द झाले आहे. यापुढे ती भांडे घासण्याचा त्रास घेईल अशी आशा बाळगू या. पाहूणे जर तीन, चार दिवस राहत असेल तर तेच स्वतः म्हणतात' अग कशाला त्रास घेते बाजारात जाऊन डिस्पोजेबल वस्तू आणायला सांग की त्यांना'. त्यात बी.पी.ए, बिस्फेनॉल नामक एक सिंथेटिक रसायने असते. ते प्लास्टिक बनविण्यासाठी वापरतात. प्लास्टिक डब्बे, बॉटल, थर्मल पेपर बनविले जातात. तो एक रंगहीन ठोस पदार्थ आहे. जो अधिकांश सामान्य कार्बनिक विलयन मध्ये मिसळून जातात. मायक्रोप्लास्टिक्स शरीरात साचल्याने हार्मोनल असंतुलनाचा त्रास होऊ लागतो. थायरॉईड आणि प्रजनन क्षमतेवर परीणाम होतो. असे तज्ञ व्यक्ती बोलत आहेत. तेव्हा आपण वेळीच सावध होणे आवश्यक आहे.

ह्या कपात किंवा इतर वस्तूत जास्त वेळ गरम पदार्थ ठेवल्यास आतील रसायन विरघळून खाद्यपदार्थात मिसळून शरीराची जास्त हानी होते. तेव्हा काचेचा ग्लास, चिनी मातीचा ग्लास, किंवा स्टिल ग्लास वापरावे असा सल्ला तज्ञ देत आहे. शेवटी 'जुने ते सोने' ह्याच न्यायाने जीवन पध्दती बदलली तर जीवन सुरक्षित होईल. कोरोना काळापूर्वी सर्वत चहा देण्यासाठी काचेचे ग्लास वापरले जात होते. पण कोरोना शिरकाव झाल्यापासून कागदी कपाचा वापर सर्वत्र सुरु झाला आहे. काचेचे ग्लास हे मोठे होते तेव्हा चहा जास्त मिळत होता. आजचे हे कागदी ग्लास दिवसेंदिवस लहान होत आहे. त्यामुळे भाव वाढला असला तरी चहाची मात्रा कमी झाली आहे. हे येथे विषेशतः सांगावे वाटते. आता हे नवीन संकट सदर कपाने चर्चेत आल आहे. कागदी पत्राळी, द्रोण, वाट्या ह्या सार्वजनिक कार्यक्रमात सर्रास वापरले जातात. त्यानंतर त्या फेकल्या जातात. त्याला लागले अन्न खाण्यासाठी मोकाट जनावरे सदैव तयार असतात. ते कागदासहीत अन्न खातात. त्यामुळे त्यांच्या पोटात पण तेच प्लास्टिक जात असते. त्यांची पण पचनक्रिया बिघडून अकाली मृत्यू चे कारण बनले आहे. गाई, ढोरे आजारी पडतात. ह्या सर्व गोष्टीचा विचार केला तर सरकारने त्वरित बंदी घातली पाहिजे. त्यासाठी उत्पादनावर प्रतिबंध केला पाहिजे. कारण हा सार्वजनिक प्रश्न आहे. असे उत्पादन करणारे, विक्री करणारे लोक विरोध करतील. आमच्या रोजगाराचे काय? तेव्हा मध्यम मार्ग काढून केवळ कागदाच्या वस्तू कराव्यात. नाही तर चिनी मातीच्या कपबश्या, स्टिल ग्लास, काचेचे ग्लास वापरावे. त्याचे प्रमाणे ताटे, वाट्या, द्रोण वापरले तर आरोग्यमय जीवन सर्वांना मिळेल. त्यासाठी कॅटर्स व्यवसायिकांनी आजच पासून सावधानी घ्यावी. सदर वस्तू विकत घेण्यास थोडा खर्च येईल पण सार्वजनिक प्रश्न लक्षात घेऊन कार्य करावे.


डिस्पोजेबल वस्तूंची मोठी बाजारपेठ भारतात आहे. करोडो रुपयाचा व्यापार ह्यातून होत असतो. तेव्हा बुलढाणा जिल्हाधिकारी यांनी एक पाऊल समोर टाकून सदर वस्तूंवर बंदी घातली. नगर परिषदांना आदेश दिले. सामाजिक संघटनांनी केलेल्या आंदोलनास यश पण आले. कौतुकास्पद बाब येथे सांगावी वाटते. अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालूका स्थित टाकळीभान ग्रामातील ग्रामपंचायतीने कागदी कपावर बंदी घातली. त्यांनी चहा व्यवसायिकांची बैठक घेऊन चर्चा केली. ठराव घेऊन कागदी कप वापरले तर ५०० रू दंड होईल असे जाहीर केले. तसेच शासकीय कार्यालये, शाळा, बँका, पतसंस्था इत्यादी ठिकाणी काचेच्या ग्लासात चहा द्यावा असे प्रतिपादन केले. ह्या सामाजिक कामासाठी सरपंच आणि त्यांचे मंडळ सरसावले आहे. लोकांनी पण मदत करावी असे आवाहन केले आहे. अश्या सामाजिक क्रांत्या गावागावातून व्हायला हव्यात. कारण त्या आपल्या स्वास्थासाठीच आहेत. एक प्रकारची समाज जागृती यातून व्हावी हिच अपेक्षा आहे.

व्यवसायिक चहा कंपन्या आणि त्यांचे वितरक हे कंपनीचे कप आणि बशी वापरतात. त्यावर कंपनीचा लोगो असतो. शिवाय त्यातून त्यांची जाहिरात होत असते. त्यांनी कागदी कप वापरले नाही हे खुप चांगले काम केले. ते अभिनंदनास पात्र आहेत. भोजन समारोह असेल तिथे विषेशतः काळजी घेणे आवश्यक आहे. कागदी कपाचा इतिहास पाहिला तर इ.स.पू. दुसऱ्या शतकात चीनमध्ये कागदी कपाचा शोध लागला. त्या काळात शाही चीनमध्ये कागदी कपाचे दस्तऐवजीकरण करण्यात आले कागदी कपांना 'चिह पोई' म्हणत असत. ते वेगवेगळ्या आकाराचे आणि रंगाचे बनविले जात होते. विसाव्या शतकात सार्वजनिक ठिकाणी ग्लास लावले जात होते. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात येईल ह्या भितीने ती हटविण्यात आलीत. त्या ठिकाणी ग्लास हे साखळीने बांधले असायचे. हे आपण अनुभवले आहे. आरोग्याचा प्रश्न म्हणून हे कप आले. हिच बाब ताट, वाटी, ग्लासला लागू होते. इतरांचे साहित्य का वापरावे? हे सर्वच ठरवू लागले. आज कागदी भोजन साहित्य आले. गरम पदार्थ टाकल्याने ती फाटून जाऊ नये ह्या कारणाने त्याला सदर रसायन लावले गेले. आता ही नवीन समस्या निर्माण झाली आहे. पॉलीथिन थैलीमुळे अनेक समस्या आल्या त्यावर अनेकदा मंथन झाले. पण पॉलीथिन थैली बंद झाली का? ती आजही चालूच आहे. कागदी थैली किंवा कापड थैली कोण बाजारात नेतो. त्यांची संख्या आजही अल्पच आहे. पॉलीथिन बंदी कागदोपत्रीच राहिली. तसाच प्रकार कपाबाबत होते काय ? हे पुढील काळात पाहावे लागेल.

मृगजळासारखी ही समस्या नवनवीन पिढीला भासणार नाही म्हणजे झाले. कडक कायदे आणि अमंलबजावणी झाली तर सर्वच शक्य आहे.

**सुहास भालचंद्र लुतडे,**
वरोरा, जि. चंद्रपूर
९९७५१०५३२६

# जींवनात प्राथमिकता कशी द्याल?



संत राजिन्दर सिंह जी महाराज

आपण भले व्यवसाय क्षेत्रात असाल किंवा शैक्षणिक किंवा चिकित्सा किंवा माहिती आणि तंत्रज्ञान या क्षेत्रात असाल आणि आपल्या परिवारा चा सांभाळ करीत असाल आपल्याला वेळोवेळी आपल्या ध्येयाकडे लक्ष दिले पाहिजे. तसेच हे देखील लक्षात घेतले पाहिजे की आपण ते प्राप्त करण्यात सफल होत आहोत की नाही.

आपण स्वतःलाच विचारला पाहिजे की आपलं लक्ष कुठे आहे? आपल्या प्राथमिकता काय आहेत? अशी ही शक्यता असते की आपण आपल्या करिअर आणि जीवनातील आर्थिक बाबींकडे अधिक लक्ष तसंच वेळ ही देतो, ज्यामुळे आपण आपला परिवार तसेच आपला व्यक्तिगत विकास आणि आपली अध्यात्मिक प्रगती या सर्वांकडे आपलं दुर्लक्ष होतं.

या संदर्भात एका तरुणाची एक रोचक गोष्ट आहे, ज्याला रस्त्यावर चालताना एक रुपयाचे पडलेले नाणे मिळाले. त्याला हे माहीत नव्हते की ते नाणे कोणाचे आहे, म्हणून त्याने ते ठेवून घेतले. ते नाणे मिळाल्यानंतर तो मुलगा खुश झाला. आणि नंतर तो जेंव्हा रस्त्यावर चालायचा तो नेहमी खाली पाहत जायचा की एखाद्या नाणे पडलेलं मिळेल. जसं जसं त्याचं वय वाढत गेलं तसं तसं त्याची रस्त्यावर चालताना ही सवय तुटली नाही. वृद्धावस्था आल्यावर एके दिवशी त्याने ही सर्व नाणी काढलीत जी त्याला आयुष्य भरात रस्त्यात पडलेली मिळालीत. ती सर्व रक्कम पन्नास रुपयाच्या आसपास होती. जेंव्हा त्याने ही गोष्ट आपल्या मुलांना सांगितली तेंव्हा त्याची मुलगी त्याला म्हणाली आपण आयुष्यभर खाली पाहून चालण्यात घालविले आणि केवळ पन्नास रुपये कमावलेत. परंतु, या कालावधीत आपण हजारो सुंदर असे सूर्योदय-सूर्यास्त, शेकडो आकर्षक इंद्रधनुष्य, मनमोहक वृक्षवेली, सुंदरसं निळे आकाश तसंच बाजूनी जाणाऱ्या हजारो लोकांचे स्मितहास्य न पहाता वाया घालवलेत. खरोखरच आपण आपल्या जीवनात या सर्व सुंदर गोष्टींचा अनुभव घेतला नाही.

आपल्यापैकी असे किती लोक आहेत की जे या या स्थितीत असतात? शक्यता आहे की आपण रस्त्यावर असे पडलेले पैसे शोधत नसू परंतु आपण धनार्जन करण्यात, संपत्ती जमवण्यात इतके अधिक व्यस्त झालो असू की त्यामुळे आपल्या जीवनातील अन्य बाबींकडे आपलं दुर्लक्ष झाले असेल?

या मुळे केवळ निसर्गाची सुंदरता आणि दुसऱ्यांशी गोड नाती जपण्यात आपण वंचित राहतो, एवढंच नाही आपल्याला मिळालेली सर्वात मोठी संपत्ती जी आध्यात्मिक संपत्ती आहे ती सुद्धा आपण हरवून बसलो.

आजीविकेसाठी कमावणे काही चुकीचे नाही. परंतु पैसा कमवताना आपण त्याला एवढं महत्त्व देतो की आपले स्वास्थ्य, आपला परिवार, आपली आध्यात्मिक प्रगती या सर्वांकडे आपल्या दुर्लक्ष होतं. त्यामुळे आपलं जीवन असंतुलित होत जाते.

आपण सांसारिक जबाबदाऱ्या सांभाळताना, त्याबरोबरच आपली आध्यात्मिक प्रगती कडे सुद्धा लक्ष दिले पाहिजे. आपण असे समजतो की अध्यात्मिक मार्ग अवलंबताना सर्व वेळ ध्यान अभ्यास करण्यासाठीच द्यावा लागतो. परंतु सत्य स्थिती अशी आहे की आपण त्या क्षेत्रात मागे राहता कामा नये.

जीवनात प्राधान्य निवडतांना आपण रोज थोडा वेळ अध्यात्मिक साधनेसाठी, थोडावेळ निष्काम सेवेसाठी, थोडावेळ परिवारासाठी, थोडा वेळ नोकरी अथवा व्यवसायासाठी दिला पाहिजे. असे केल्याने आपल्याला जाणवेल की आपण सर्व क्षेत्रांमध्ये उत्तम प्रगती केलेली आहे तसेच एक समाधानी जीवन जगून सर्व ध्येय प्राप्त केलेले असतील.

# मनातील कंगोरे...!


आपण नेहमी असं म्हणत असतो की, घराला घरपण स्त्रीमुळेच येत असलं, तरी पण त्यांच्या सौंदर्यात भर पाडण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो तो आमचा हॉल, असं म्हटल्यास काही वावगं ठरणार नाही. माणूस स्वतःच्या आवडी-निवडीचा सखोल विचार करूनच घराला घरपण देण्याचा प्रयत्न सतत करीत असतो. त्यादृष्टीनेच तो त्याचप्रमाणे प्रत्येक गोष्टीचा विचार आवश्यक असतो असेच म्हणावे लागेल. घरी येणाऱ्याचे पहिलं लक्ष जाते ते भितींवरील मोकळ्या जागेवर, कारण भिंतीवर काहीही नसलं तरी, तिथं काहीतरी असल्याचा भास त्या भितींकडे बघताच जाणवतो.

किंबहुना हॉलच्या दक्षिणेस बघितले की, सुंदर शोकेस निर्दशनास येते. त्यातील प्रत्येक वस्तु अलगदपणे सुंदररीत्या रचलेल्या आपणाला दिसून येतात. त्या अगदी ऐतिहासीक संदर्भांनी परिपूर्ण आहेत. त्यातील भाव, लोभस, जुन्या आठवणी घेऊन विसावलेली चहाची किटली, बाजुलाच तांब्याचे गडवे, लोखंडी अडकित्ते, नवीन तेज असल्याचा भास होणारी जुनी घड्याळं, पिसारा फुलवलेला मोर, स्वतःच्याच तोर्यात मिरविणारी कट्यार तर अगदीपणे संयमीतपणे स्वतःला सावरून कडेला बसली असल्याचाच भास होतो. अशा अनेक वस्तुंनी भरलेला हॉल घरी येणाऱ्या प्रत्येकाच्याच मनात घर करून जातोच, सोबतच अनेक वेळा आनंद देणाराही वाटतो. शोकेसमध्ये अजुनही बिगुलचा आवाज अखंडपणे सुरू असल्याचा आम्हाला भास होतो. अधून-मधून त्याच्या नादाला साद घातली की, त्यातून निघणारा मधूर आवाज कानाला मंत्रमुग्ध करतो, शंख, इंजेक्शनच्या सुईसोबत त्याचे कव्हरही लक्ष वेधून घेतो. शोकेसमधील केस विचरण्यांची फणी, जुना दिवा, पंक्तीत वरण वाढण्यासाठीचा जुना डबला, इत्यादी वस्तु क्रमाक्रमाने दिमाखात मिरवत असल्याचे दिसून येते. शोकेसमध्ये या वस्तूंची एकप्रकारे शाळाच भरलेली असल्याचा भास होतो. अशा अनेक शोभिवंत वस्तु मनात घर करून जातात. या वस्तुंमुळे वातावरणात जणू निरामय शांतताच दिसून येते.

हॉलमध्ये इंग्रजी एल शेपमध्ये सोफा ठेवलेला आहे. त्यावरील गाद्या भारतीय बैठकीला शोभतील अशाच बनवून घेतल्या आहेत. उशांची रंगसंगतीही लाइट निळा आणि ऑफवाइट येलो अशी डोळ्यांना सुखावणारी आहे. तसेच पडदे निळया व पांढर्या वेलबुटीचे, नक्षीदार आहेत. अगदी शेजारीच लाकडाचे टी-टेबल असून ते अगदी कमीतकमी खर्चात सुबकतेचे प्रतीक असल्याचा भास होतो. त्यावरील सोफा-सुपारीचा जुना पाणपुडा अगदी कर्तव्यनिष्ठपणे सेवा देत तिथं कायम विराजमान असतो. कोपायामध्ये शोभिवंत जुन्या वस्तु ठेवण्यात आल्या आहेत. त्यात समई आणि बैलगाडी दिमाखात उभ्या असल्याचे सतत जाणवते कि जणु काही स्वतःचे कर्तव्य बजावत आहे असा भास होतो.

चप्पल ठेवण्यासाठी बंद आलमारी आहे. त्यावर चाब्या लटकविण्यासाठी लोखंडी वारली पेटिंग केल्यासारखी त्याची रचना केलेली आहे. त्यामुळे चाबी काढण्यासाठी कसलाही त्रास जाणवत नाही. कोपर्यामध्ये एक लाकडी टेबल व त्यावरील काचेच्या बाटलीतील रंगबिरंगी फुले मनाला मोहीत करीत असतात. कमीत कमी जागेत विविध वस्तू व मातीच्या लहान-लहान भांड्यांची रचना मनाला मोहीत करीत असते. ठेवलेल्या वस्तुंमध्ये एक प्रकारचा जीवंतपणा असल्याचाच भास होत असतो. हॉलमधील या जीवंतपणामुळे मनाला फारच प्रसन्न, मोकळे, शांत, समाधानी वाटत असतं, हॉल म्हणजे आमच्या घरातील सर्वांसाठीच एखाद्या चित्रकारानं रेखाटलेल्या जीवंत चित्रकलेसारखंच वाटत असतं. त्यातील कलात्मकता, सजावट अगदी साधेपणाची. पण, तितकीच मनाला मोहीत व भावणारी आहे. सोफ्याच्या अगदी समोर टिव्ही ठेवलेला असून त्यावरील श्रीकृष्णाची मेटल मूर्ती लोभस, जीवनातील सुख दुःखाच्या घटनांची आठवण करून देते. कौटुंबीक जिव्हाळ्याची अनुभूतीच त्या मूर्तीकडे बघताना दिसून येते. त्याच्या बाजुलाच कुंडीत एक छोटेसे रोपटे लावलेले आहे. त्यामुळे मनुष्याच्या घडणघडणीची जरतारी वीणच हॉलमध्ये आकार घेत असल्याचे आम्हाला जाणवते.

हॉलमध्ये ठेवलेल्या वस्तुंची कल्पकता, त्यातील आशय जुनाच असल्यामुळे त्यातील भावार्थ अगदीच पौराणीकतेचा भास निर्माण करतो. हॉलमधील या जुन्या वस्तुंमुळे जुन्या आठवणी अगदी ताज्या होत असतात. त्यामुळे सुखी संसाराचं रूपच जणू त्यात दडलेलं असल्याचा भास होत असतो. अनेकदा मनाच्या रीत्यातील कंगोरे त्या कोपायात कित्येक वस्तुंचा जणु किलबिलाट होत असल्याने आम्हाला सतत आनंद भासतो. याखेरीज दारावर रंगबिरंगे फुलांचे तोरण आमचं नेहमी स्वागत करण्यात मग्न असल्याचे आम्हाला नेहमीच आनंद होत असतो. त्यामुळे आमच्या घरातील शोभा व्दिगुणीत होवुन नेहमी सुख समृध्दीचे आणि जिवन भरभराटीचे जात असते. यातच आमचं जीवनातील सुख अवलंबुन असते.



**विजय सरस्वती सिताराम सोनारघरे,**
लेखक/वृत्तपत्र समिक्षक
स्नेहविजय २४, उदयनगर, गल्ली नं. ४, नागपूर-

# नोकरीच्या मुलाखतीवेळी या चुका टाळा

नोकरीसाठी परीक्षा पास झाल्यावर शेवटी मुलाखत होते. तुम्ही प्रेफशर असाल तर इंटरव्यूसाठी जाण्याआधी काही गोष्टी लक्षात ठेवा...

लूक : इंटरव्यूला जाताना आधी आपला लूक ठिक करा. केसरचना, दुर्गंधयुक्त शरीर, कैजुअल सवयी या गोष्टी जॉब इंटरव्यूमध्ये अडसर ठरू शकतात. दाढी करा, आपले डोक्यावरील केस आणि नखे कापा, फॉर्मल ड्रेस परिधान करा.आपल्या बुटांना पॉलिश करा आणि आपले दस्तावेज एका फोल्डरमध्ये ठेवा.

वेळेचे भान ठेवा : इंटरव्यूच्या वेळेच्या १५ मिनिट आधी ठिकाणावर पोचा. त्यामुळे फ्रेश होण्यास वेळ मिळतो. वेळेवर ऑफिसला पोचा. त्यासाठी ट्रैफिक जाम, पाऊस आणि गाड्यांना होणारा उशिर लक्षात घेता घरातून बाहेर पडण्याची वेळ निश्चित करा. तुम्हाला लोकेशन माहित न सेल तर एक दिवस आधी जाऊन माहिती घ्या. तुम्हाला तरीही उशिर झाला तर एचआरला फोन करा आणि त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करा.

बॉडी लैंग्वेज : बॉडी लैंग्वेजचा तुमच्या इंटरव्यूवर मोठा परिणाम पडतो. इंटरव्यू रूमपर्यंत जाताना स्मितहास्य करीत जाणे आणि आत्मविश्वासाने हात मिळवण्याआधी प्रौक्टिस करा. आपले दोन्ही पाय फरशीवर टेकवून सरळ बसा.

ऐकण्याची शैली : मॉक इंटरव्यूमध्ये तुमच्या ऐकण्याच्या कौशल्याचा सराव करा. काहीसे पुढे झुका, जी व्यक्ति तुमच्याशी बोलतेय त्याच्याकडे बघा. इंटरव्यू घेणाऱ्याला बाधा आणू नका. प्रश्न कळला नसेल तर पुन्हा विचारा. उत्तर देण्याआधी आपल्या विचारांची जुळणी करण्यासाठी एक मिनिट थांबा.

बोलण्याची शैली : स्मित करीत स्पष्ट आवाजात बोला. वय, धर्म, राजकारण किंवा लिंगाबाबत अपशब्द किंवा अपमानजनक संदर्भाचा आधार घेऊ नका. प्रश्नाचे फिरवून उत्तर द्या. चुकीचे सांगण्याऐवजी आपल्याला माहित नाही असे सांगा.

## अशोकायन...

### जागो ग्राहक जागो

ग्राहकाच्या अज्ञानाचा
विक्रेता घेती फायदा
ग्राहकांनी जाणून घ्यावा
ग्राहक संरक्षण कायदा ..
ग्राहकाला म्हणती
बाजारपेठेचा राजा
सारेजण वाजवती
त्याचाच बँडबाजा
वस्तु खरेदी करतांना
आपणही रहावे चौकस
नाहीतर पदरी पडेल माल
निम्न प्रतिचा नकली बोगस ..!



प्रा. अशोक सारडा, मेहकर.
(९४२२३९४३३९)

# नितीन गडकरी यांनी नागपुरात बुटीबोरी आणि हिंगणा सेवा आणि पुरवठा केंद्रांचे उद्घाटन केले



## जीएमएमसीओ इंडियाने त्यांच्या संपूर्ण सेवा आणि पुरवठा सुविधेचा विस्तार केला

**नागपूर, १६ मार्च :** सीके बिर्ला ग्रुपची कंपनी असलेल्या जीएमएमसीओ इंडियाने आज नागपूरमध्ये त्यांच्या बुटीबोरी आणि हिंगणा सेवा आणि पुरवठा केंद्रांचे उद्घाटन जाहीर केले. सर्व सेवा आणि साहित्य येथे उपलब्ध असेल. या एकात्मिक केंद्रांमध्ये दुरुस्ती, पुनर्बांधणी आणि सुटे भाग वितरणासाठी जागतिक दर्जाच्या सुविधा देखील असतील. ते संपूर्ण भारतातील, प्रामुख्याने महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात आणि गोवा येथील ग्राहकांना आधार आणि सेवा प्रदान करतील. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी या केंद्रांचे उद्घाटन केले.

बुटीबोरी आणि हिंगणा केंद्रे १४ एकरवर पसरलेली आहेत. त्यात सेवा पायाभूत सुविधा, पूर्ण घटक आणि मशीन पुनर्बांधणी क्षमता आणि पूर्णपणे कार्यरत भागांचे गोदाम आहे. अशा प्रकारे ग्राहकांच्या सर्व गरजा एकाच ठिकाणी पूर्ण होतील. बुटीबोरी सेंटरच्या लाँच प्रसंगी बोलताना, जीएमएमसीओ इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. चंद्रशेखर व्ही म्हणाले, हा आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. गेल्या दशकात आम्ही सातत्याने प्रगती केली आहे आणि या केंद्रासह, आम्ही ग्राहकांच्या हितांना अग्रभागी ठेवून आणि अधिक कार्यक्षम कामकाज सुनिश्चित करण्यासाठी आमची वचनबद्धता सिद्ध केली आहे. आमचे ध्येय आमच्या ग्राहकांना कमीत कमी वेळेत योग्य सेवा प्रदान करणे आहे आणि आमचे बुटीबोरी आणि हिंगणा केंद्र आम्हाला हे ध्येय साध्य करण्यास मदत करतील.

या संदर्भात ते म्हणाले, आम्हाला संपूर्ण भारतात आमची पोहोच आणि पकड मजबूत करायची आहे. म्हणूनच कंपनीने त्यांचे एमआरसी (मशीन रीबिल्ड सेंटर) आणि सीआरसी (कंपोनंट रीबिल्ड सेंटर) केंद्रे वाढवली आहेत. याद्वारे आम्ही भारताच्या पायाभूत सुविधांच्या जलद विकासातील आमची जबाबदारी पार पाडत आहोत. उपकरणांचे आयुष्य वाढवून, डाउनटाइम कमी करून आणि खाणकाम, बांधकाम, ऊर्जा आणि वाहतूक यासारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये शाश्वत विकास सुनिश्चित करून आम्ही देशाच्या आर्थिक प्रगतीत आणि औद्योगिक स्वावलंबनात योगदान देत आहोत. या सेवा सुविधेच्या विस्तारासह, आम्ही भारताच्या पायाभूत सुविधांच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देत राहू आणि यामुळे मध्य आणि पश्चिम भारतात आमची पोहोच आणि पकड मजबूत होईल.

१० एकरच्या बुटीबोरी एमआरसी सेंटरचे बांधकाम क्षेत्रफळ १,४०,०० चौरस फूट आहे. त्याचे हब वेअरहाऊस ३०,००० हून अधिक लाइन आयटम व्यवस्थापित करण्यास सक्षम आहे आणि दरमहा ४५,००० व्यवहार प्रक्रिया करेल अशी अपेक्षा आहे. हे गोदाम त्याच्या अत्याधुनिक डिजिटल वेअरहाऊस व्यवस्थापन प्रणाली, ऑप्टिमाइझ्ड स्टोरेज लेआउट आणि वितरित इन्व्हेंटरी धोरणासह २४-४८ तासांच्या आत सुटे भाग पोहोचवण्यास सक्षम आहे . यामुळे ग्राहकांच्या उपकरणांचा वापर वेळ वाढेल.

येथील स्टॉक यार्डमध्ये १०० मशीन्स ठेवण्यासाठी जागा आहे . दरवर्षी १५० मशीन्स आणि ७५० हायड्रॉलिक सिलेंडर्सची पुनर्बांधणी/दुरुस्ती करण्याची क्षमता . याव्यतिरिक्त, हे केंद्र दरवर्षी २४,००० हायड्रॉलिक होज असेंब्लीची कामे करण्यास सक्षम आहे. हिंगणा सीआरसी सेंटर ४ एकरवर पसरलेले आहे. त्याचे बांधकाम क्षेत्रफळ ७४,००० चौरस फूट आहे. यात एक घटक पुनर्बांधणी केंद्र आणि इंजिन आणि ट्रान्समिशन चाचणी बेंच आहेत. ते दरवर्षी ७५० इंजिन, ४०० ट्रान्समिशन पुनर्बांधणी/ओव्हरहॉल करण्यास सक्षम असेल. याव्यतिरिक्त, केंद्रात NABL मान्यताप्राप्त SOS लॅब आहे जी २,१०,००० वापरलेल्या तेलाच्या नमुन्यांची चाचणी करण्यास सक्षम असेल. यामुळे ग्राहकांच्या उपकरणांच्या स्थितीचा मागोवा ठेवणे सोपे होईल आणि वेळेवर दुरुस्ती आणि देखभालीमुळे समस्या टाळता येतील.

२५० हून अधिक कुशल कर्मचारी, उद्योगातील सर्वोत्तम पायाभूत सुविधा आणि एकात्मिक सेवा, सुटे भाग आणि पुनर्बांधणी क्षमतांसह बुटीबोरी आणि हिंगणा केंद्रे ग्राहकांना कमी वेळेत सेवा देऊ शकतील. यामुळे दुरुस्ती आणि सुटे भाग लवकर उपलब्ध होतील. मशीनचे आरोग्य व्यवस्थापन चांगले होईल. सर्व गरजा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्यास, ग्राहकांचा एकूण उपकरण देखभालीचा खर्च कमी होईल, मशीनचे आयुष्य वाढेल आणि प्रकल्प वेळेवर पूर्ण होतील.

### सावरगांव येथे गळी लागण्याची परंपरा कायम

## सव्वाशे (१२५) वर्षापेक्षा जास्त काळापासून चालत आहे परंपरा



**सावरगांव :** सावरगांव येथे गेल्या सव्वाशे वर्षापेक्षा जास्त वर्षापासून गळी लागण्याची परंपरा आहे. यावर्षी सुद्धा होळीच्या दुसऱ्या दिवशी धुळवडीला या परम्परेचे आयोजन उत्साहात करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही धुळवडीनंतर सायंकाळी पाच वाजता गळी लागण्याच्या परंपरेचे आयोजन करण्यात आले. नेहमीप्रमाणे भवानी मातेचे दर्शन व मेघनाथ यांच्या मूर्तीचा आशिर्वाद घेऊन रामदास वडे याला साधारणतः २५ फुट ऊंच खांबावर गळी लावण्यात आले. त्याला योग्य प्रकारे बांधण्यात आल्याची खात्री झाल्यावर गळी लागल्यानंतर अडीच फेरे सरळ व अडीच फेरे उलटे आलटून पालटून दिल्यानंतर त्याने आपल्या हातातील नारळ लोकांत भिरकाऊन दिले व यात्रेची सांगता झाली. यावेळी पंचक्रोशीतील हजारों नागरिक दरवर्षी हा थरार बघण्यासाठी उपस्थित होते. गळाच्या आयोजनासाठी माजी नागपूर जि.प. कृषी सभापती सतीश शिंदे, माजी सरपंच दिपक मोहिते, राजेन्द्र सीताराम बालपांडे यांनी परिश्रम घेतले.

# पैशांच्या वादातून तरुणाची हत्या

**नागपूर, १६ मार्च :** गुन्हेगारी प्रवृत्तीच्या तीन युवकांनी मंडपवाल्याकडे मजूर असलेल्या एका युवकाचा पैशांच्या वादातून खून केला. ही थरारक घटना धुळवळीच्या मध्यरात्री एमआयडीसी परिसरात घडली. रोहित राजेश तिवारी (२८) रा. वानखेडे लेआउट, वैशालीनगर असे मृत युवकाचे नाव आहे. पोलिसांनी रोहितचा मोठा भाऊ आदित्यच्या तक्रारीवरून मुख्य आरोपी आकाश भंडारी आणि त्याच्या साथीदारांवर गुन्हा नोंदविला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रोहित हा घराजवळील साई मंडप डेकोरेशन येथे मंडप बांधण्याचे आणि कॅटरिंगचे काम करीत होता. आरोपी आकाश भंडारी हा कुख्यात गुन्हेगार असून त्याच्यावर सामूहिक अत्याचाराचा गुन्हा दाखल आहे. तो वस्तीत धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करतो. गेल्या महाशिवरात्रीला आकाश भंडारीने रोहितच्या माध्यमातून मंडप डेकोरेशनचे सामान भाड्याने घेतले होते. मात्र, भाड्याचे १२ हजार रुपये दिले नव्हते.

रोहितचा मालक पैशांसाठी तगादा लावत होता. त्यामुळे रोहितने आकाशला पैसे मागितले. मात्र, तो पैसे द्यायला तयार नव्हता. त्यामुळे पैशांवरून दोघांत वादही झाला होता. गुरूवारी रात्री रोहित हा मित्र नीलेश कडबे याची भेट घेण्यासाठी त्याच्या घरी गेला होता. दोघेही घराबाहेर बसून बोलत होते. या दरम्यान आकाश साथीदारांसोबत तेथे आला. रोहितला शिविगाळ करून मारहाण करू लागला. या दरम्यान त्याने चाकू काढून रोहितच्या छातीत भोसकला. रोहित रक्तबंबाळ होऊन जागी कोसळताच आरोपी फरार झाले. नीलेशने घटनेची माहिती रोहितच्या कुटुंबीयांना दिली. त्याला उपचारार्थ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. शनिवारी उपचारादरम्यान रोहितचा मृत्यू झाला. पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदवून आकाश भंडारी आणि त्याच्या साथीदारांचा शोध सुरू केला आहे.

# आचार्यश्री आर्यनंदीजी गुरुदेवांनी आपल्या जीवनात तीर्थरक्षणासाठी साखर, तुपाचा त्याग केला होता : नितीन नखाते

### सकल जैन समाजाचे भव्य आयोजन

**नागपूर, १६ मार्च :** श्री पार्श्वप्रभू दिगंबर जैन सैतवाळ मंदिर संस्था इतवारी नागपूर व श्री सैतवाळ जैन संघटन मंडळ महावीरनगर नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने जैन धर्मांचे महान व सर्वोच्च संत तीर्थरक्षा शिरोमणी आचार्यश्री आर्यनंदीजी गुरुदेवांच्या व्या जन्म जयंती कार्यक्रमाचे भव्य आयोजन रविवारी इतवारी शहीद चौक भगवान पार्श्वनाथस्वामी मार्ग येथील श्री पार्श्वप्रभू दिगंबर जैन सैतवाळ मंदिराच्या बाहुबली भवन सभागृहात आयोजन केले होते. यापूर्वी इतवारी शहीद चौकातून भव्य प्रभातफेरी काढण्यात आली वंदेमातरम चौक, अहिंसा भवन, निकालस मंदिर रोड, दारोडकर चौक, सेंट्रल एव्हेन्यू, गांधी पुतळा, न्यू इतवारी रोड, टांगा स्टँड, शहीद चौक मार्गे भगवान पार्श्वनाथस्वामी मार्ग येथील श्री पार्श्वप्रभू दिगंबर जैन सैतवाळ मंदिरात पोहोचली. प्रभातफेरीत हमारी पाठशाला उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनींनी पारंपरिक वेशभूषेत लेझिम नृत्य शाळा संचालक राजेंद्र नखाते यांच्या मार्गदर्शनात सादर केले, ते आकर्षणाचे केंद्र होते. बग्गीत आचार्यश्री आर्यनंदीजी गुरूदेवांचा फोटो होता. सर्व महिला भजने सादर करीत पुढे सरकत होती. मंदिरात पोहोचल्यावर गुरुदेवांचे अष्टक, पूजन पं. अजित कहाते यांचे मार्गदर्शनात संपन्न झाले. ऋषभ आगरकर यांच्या संगीत निर्देशनात संगीतमय पूजन करण्यात आले. या पूजनात श्री पार्श्वप्रभू दिगंबर जैन सैतवाळ मंदिर, श्री सैतवाळ जैन संघटन मंडळ, युवा व महिला शाखा, अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्था, श्री चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिर बाहुबलीनगर, श्री आदिनाथ दिगंबर जैन सैतवाळ मंदिर अंबानगर, श्री दिगंबर जैन युवक मंडळ (सैतवाळ) व महिला शाखा, अखिल दिगंबर पुलक मंच परिवार नागपूरच्या सर्व शाखा, महावीर युथ क्लब, श्री जैन सहायता ट्रस्ट, सकल जैन समाजाच्या सर्व सदस्यांनी पूजनात सहभाग घेतला.

याप्रसंगी संबोधित करतांना अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्थेचे राष्ट्रीय महामंत्री नितीन नखाते म्हणाले आचार्यश्री आर्यनंदीजी गुरुदेवांनी तीर्थरक्षणासाठी पस्तीस हजार किलोमीटर आपल्या जीवनात पायदळ विहार केला. तीर्थरक्षणासाठी खूप मोठे कार्य केले आहे, त्यांच्या उपकारास आपण कधीही विसरू शकणार नाही. तीर्थ वाचणार तर जैन धर्म वाचणार. गुरुदेवांचे जीवन आम्हाला प्रेरणा देत आहे. गुरुदेवांच्या विचाराने स्वतःचे कल्याण तर होईल आणि समाजाचे कल्याण होईल. गुरुदेवांनी तीर्थरक्षणासाठी साखर व तुपाचा त्याग केला होता. महात्मा गांधी गांधींच्या साक्षरता अभियानाची गुरुदेव जुळले होते. मध्ये आचार्यश्री आर्यनंदीजी गुरुदेवांना स्व. सुंदरसाव शिवणकर यांच्या पुढाकाराने भव्य कार्यक्रमात चतुर्थ पट्टाचार्य उपाधी देऊन विभूषित करण्यात आले होते. डॉ. नरेंद्र भुसारी यांनी गुरुदेवांच्या जीवनातील आठवणी ताज्या केल्या. धर्मसभेचे संचालन मंदिराचे अध्यक्ष दिलीप राखे यांनी केले.



धर्मसभेला चंद्रकांत वेखंडे, सतीश जैन पेंढारी, प्रशांत भुसारी, राजेंद्र बंड, मनोज बंड, सूरज जैन पेंढारी, दिलीप शिवणकर, पवन झांझरी, राजेंद्र सोनटक्के, आनंदराव नखाते, सुधीर सिनगारे, मनीष पिंजरकर, विलास गिल्लरकर, ऋषभ आगरकर, जितेंद्र गडेकर, नरेश मचाले, प्रशांत मानेकर, दिनेश सावळकर, सुभाष मचाले, प्रशांत सवाने, श्रीकांत मानेकर, विशाल चाणेकर, अमोल भुसारी, नीरज पळसापूरे, राजेश गडेकर, डॉ. रवींद्र भुसारी, अविनाश शहाकार, दिलीप सावळकर, मनुकांत गडेकर, रमेश तुपकर, सुरेश वरुडकर, राजेश जैन, मनोज मांडवगडे, श्रीकांत तुपकर, विनोद गिल्लरकर, शैलेश काटोलकर, मधुकर नखाते, चंद्रकांत सावळकर, वैशाली नखाते, दिपाली राखे, उज्वला आगरकर, प्रीती महाजन, प्रतिभा सचिन नखाते, माया सावळकर, भारती उबाळे, सरिता सावळकर, अर्चना गडेकर, हेमलता जैन, सुनंदा मचाले, वंदना मखे, अर्चना नखाते, प्रणिता मानेकर आदी उपस्थित होते.

# नार्को दहशतवाद देशासाठी धोकादायक



**मुंबई, १६ मार्च :** आजच्या पिढीला अमली पदार्थ्यांच्या व्यसनापासून दूर ठेवणे हे गरजेचे आहे. अमली पदार्थ्यांच्या आड दडलेला नार्को दहशतवाद हा देशासाठी धोकादायक असल्याचे मत एनसीबी (नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो) मुंबई युनिट चे माजी प्रमुख अधिकारी आणि आयआरएस अधिकारी समीर वानखेडे यांनी व्यक्त केले. परदेशातून चोरट्या मार्गाने अमली पदार्थ आणून त्याची विक्री केली जाते. अशा तस्करावर संबंधित यंत्रणा कारवाई करतात, कारवाई करताना अधिकाऱ्यांना अडचणींना कसे सामोरे जावे लागते त्याची माहिती वानखेडे यांनी दिली.

दर्द से हम दर्द ट्रस्टच्या वतीने शनिवारी चर्चगेटच्या बहाई सेंटरमध्ये कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला विधी विषयाचा अभ्यास करणारे विद्यार्थी, नवोदित वकील हे मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्या कार्यक्रमाला आयआरएस अधिकारी समीर वानखेडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तरुण पिढी ही नशेच्या आहारी जात असल्याचे चित्र आहे. पोलीस आणि संबंधित यंत्रणा या नशेबाज आणि तस्कर याच्यावर कडक कारवाई करतात. भारतात चोरट्या मार्गाने येणारे अमली पदार्थ ही चिंतेची बाब आहे. समुद्र, हवाई मार्गे तस्कर हे अमली पदार्थाची तस्करी करतात. प्रत्येक वेळी तस्कर हे त्याची गुन्ह्याची पद्धत बदलत असतात. अशा कॅरिअरवर केंद्रीय यंत्रणा या कारवाई करतात.

वानखेडे यांनी एनडीपीएस कायद्या बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. एनडीपीएस कायद्यानुसार कोणती कलम लावली जातात. त्या कलमात काय शिक्षा आहे या बाबत देखील मार्गदर्शन केले. युरोपियन आणि आखाती देशातून येणारे कॅरिअर हे शरीरातून ड्रग कसे घेऊन येतात, ते ड्रग रुग्णालयात नेऊन कसे काढले जाते, पोटातून डॉक्टर ड्रग काढतात, कित्येकदा कॅरिअर हे सहकार्य करत नाही, अशावेळी काय अडचणी येतात याची माहिती देण्यात आली. तपास यंत्रणा या अमली पदार्थाचे व्यसन करणारा आणि अमली पदार्थाची तस्करी करणारा असा भेदभाव करत नाही. अमली पदार्थाचे व्यसन करणारा आणि तस्करी करणारा याच्यावर त्या त्या कलमाखाली कारवाई केली जाते. तसेच छोट्या वस्त्यांमध्ये व्यसन करणारे असो किंवा उच्चभ्रू सोसायटी मध्ये राहणारे असो त्याच्यावर कारवाई केलीच जाते. अमली पदार्थाचे व्यसन केल्याने आरोग्य धोक्यात येते. सध्या काही जण अमली पदार्थ व्यसनाबाबत गैर समज पसरवत आहेत. ते देखील थांबवणे गरजेचे असल्याचे मत वानखेडे यांनी व्यक्त केले. संस्थेच्या वतीने ॲड. सुनीता प्रकाश साळशिंगीकर- खंडाळे यांनी वानखेडे याचे स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला.

## राशीभविष्य

**मेष :** नोकरीत अधीनस्थ आणि वरिष्ठांशी चांगला समन्वय राहील. व्यवसायात नवीन सहयोगी मिळतील. आज आर्थिक बाजू मजबूत करण्यासाठी अतिरिक्त प्रयत्न करावे लागतील.

**वृषभ :** आज कौटुंबिक बाबतीत काही महत्त्वाचे निर्णय घेतले जातील. जे तुमच्या मनाला शांतता देईल. नियोजनबद्ध पद्धतीने अभ्यासात व्यस्त राहून विद्यार्थ्यांना फायदा होईल.

**मिथुन :** व्यावसायिक क्षेत्रात काम कार्यरत लोकांना अचानक लाभ होण्याची शक्यता आहे. राजकीय क्षेत्रात लोकांना महत्त्वाची पदे मिळू शकतात. कोणतेही अपूर्ण काम पूर्ण केल्याने मनातील आनंद वाढेल.

**कर्क :** आज तुम्हाला व्यवसायात असे यश मिळेल ज्याची तुम्ही कल्पनाही केली नसेल. बेरोजगारांना रोजगार मिळेल. तुम्हाला राजकीय मोहिमेची कमान मिळू शकते. त्यामुळे समाजात तुमचे वर्चस्व वाढेल.

**सिंह :** तुम्हाला एखादी चांगली बातमी मिळेल. घर घेण्याची इच्छा पूर्ण होऊ शकते. समाजात मान-सन्मान वाढेल. प्रतिष्ठित लोकांशी संपर्क साधला जाईल. आर्थिक बाबतीत आज विचारपूर्वक निर्णय घ्या.

**कन्या :** जमीन, इमारत, वाहन इत्यादी खरेदी करण्याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे. व्यवसायात वर्तन संतुलित ठेवा. अन्यथा आर्थिक नुकसान आणि बदनामी होऊ शकते.

**तूळ :** प्रेमसंबंधांमध्ये परिस्थिती फारशी चांगली राहणार नाही. आज आरोग्य सर्वसाधारणपणे चांगले राहील. शारीरिक ताकद आणि मनोबल वाढेल. आजारांपासून सावध राहा.

**वृश्चिक :** भांडवली गुंतवणूक वगैरे विचारपूर्वक करा. घाई टाळा. शेअर्स, लॉटरी, ब्रोकरेजमधून पैसे मिळण्याचे संकेत आहेत. शेतीच्या कामात आर्थिक मदत मिळू शकते.


**धनु :** आज अविवाहित लोकांना त्यांच्या आवडीचा जोडीदार मिळू शकतो. ज्यामुळे तुमची कोणतीही इच्छा पूर्ण होऊ शकते. मनोबल वाढवण्याचा प्रयत्न करा. वैवाहिक जीवनावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

**मकर :** तुम्हाला आधीपासून असलेल्या कोणत्याही आजारापासून आराम मिळेल. हवामानाशी संबंधित आजार झाल्यास त्वरित उपचार घ्या. ताप येणे, खोकला, अंगदुखी यांसारख्या समस्या उद्भवतील.

**कुंभ :** आज आरोग्याशी संबंधित कोणतीही गंभीर समस्या येण्याची शक्यता कमी आहे. तुम्हाला आधीपासून असलेल्या कोणत्याही आजारापासून आराम मिळेल.

**मीन :** रुग्णालयात दाखल झालेल्या लोकांना रुग्णालयातून डिस्चार्ज दिला जाईल. ऑपरेशन इत्यादी बाबतीत तुमचे ऑपरेशन यशस्वी होईल.

# शब्दकोडे क्रमांक २०६०




**आडवे शब्द :-**
१) आपले राष्ट्रीय गीत
५) स्त्री
६) अग्रलेख
१०) रक्तवाहिनी
११) तृण
१३) नवरदेव
१४) मादीच्या विरुद्ध
१६) निरुपयोगी
१८) मदन
२१) द्रव्य, धन
२२) विजार
२५) कडक व चिवट
२६) सारखा
२७) कमीशन, बट्टा
२८) प्राचीन
३०) पूर्ण बदल
३२) गाव
३४) गाढव
३५) एक चर्मवाद्य
३७) उपवासाला चालेणारा एक कंद
३८) मोठी वाटी
४०) शंकर
४१) च्या साठी
४३) वस्तरा
४५) खेकडा
४७) मवाळ धोरण
५०) जंगलाला लागलेली आग
५२) गंध
५४) राजा
५५) डाका
५७) थान
५९) खराब
६१) ममता, आपलेपणा
६३) नाश, प्रलय
६५) डोंगरातून आरपार गेलेला रस्ता
६७) एकूणएक, सर्व
६८) लाज
७०) ज्यास जहागीर मिळाली आहे असा
७५) साधारण
७६) पातळसर
७९) पाठविलेला
८१) साळी
८२) गज, वारण
८३) होडी
८४) न घाबरणारा

**उभे शब्द :-**
१) नमस्कार
२) रोग पसरविणारा किटक
३) निष्णात
४) सुसर
५) वार्ता
७) शुद्ध, पवित्र
८) प्रत्येक, भाव
९) उचित, योग्य
१२) खूण इशारा
१५) धपाटा
१७) मतलबापुरते नाते
१९) नूतन
२०) ताबडतोब
२१) कैफ, उन्माद
२३) मुसलमान
२४) धोका
२६) समतल
२७) लग्नासाठी जमलेली नात्यातील मंडळी
२९) माणूसघाणा, मत्सरी
३१) धडक
३३) मगज
३६) नष्ट, खाऊन संपविणे
३९) हवेतील थंडावा
४०) मिठाई तयार करणारा
४२) सिंह
४४) वाळवंट
४६) रातंबीचे साल
४८) पराग
४९) मुस्लीमांचा एक सण
५१) चौकशी
५३) सटवाई, दुष्ट स्त्री
५६) प्रत्येक दिवशी
५८) ** दमयंती
६०) उदबत्ती
६१) आंब्यातील द्रवपदार्थ
६२) माकड
६४) नवरा
६५) रेल्वेचा डबा
६६) मोठा भाऊ
६९) एकत्रित रडणे
७१) पराजय, माळ
७२) जिव्हा
७३) समईतील कापसाची गुंडाळी
७४) दुर्दशा
७५) अमृत
७७) आवाज, नाद, ध्वनी
७८) अस्वल
८०) दिवस, घाव

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# विविध प्रकारची तस्करी रोखण्याकरिता चुरणी येथे पोलीस ठाणे हवे!

**मारोती पाटणकर**

**चुरणी, (दि.16)**– मध्यप्रदेश सीमेलगत असलेला चुरणी, जारीदा हा भाग सागवान लाकडाच्या तस्करीकरिता कुख्यात आहे. तसेच वन्यजीवांची तस्करी व गोधनाची तस्करी मोठ्या प्रमाणात होते. चिखलदरा पासून हा भाग दूर असल्याने चिखलदरा पोलिसांना या भागावर लक्ष देणे शक्य होत नाही. त्यामुळे तस्करीचे प्रमाण वाढत आहे. या भागात तस्करी थांबवायची असेल वन जीवांचे संरक्षण करायचे असेल व या भागातील अवैध धंदे थांबवायचे असतील तर चुरणी येथे पोलीस



स्टेशन होणे गरजेचे आहे. येथे पोलीस स्टेशन झाल्यास या भागातील अवैध धंदे थांबतील, तस्करांवर व अवैध धंदे करणारे व्यावसायिकांवर वचक राहील. याबरोबरच या भागात गौण खनिजाची चोरी सुद्धा मोठ्या प्रमाणात होते. होत असलेली जंगल व नैसर्गिक साधनसंपत्तीची लूट थांबवायची असेल तर तर या भागात पोलीस स्टेशन होणे गरजेचे आहे.

"चिखलदरा तालुक्यातील चुरणी हे गाव मोठे आहे. या गावाला लागुन 50 ते 60 गावे आहे. सुरक्षेच्या दृष्टीने येथे पोलीस स्टेशन होणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**सहदेव बेलकर**
**-तालुका अध्यक्ष काँग्रेस कमिटी, चिखलदरा.**

"मेळघाटातील कायदा व सुव्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी, होत असलेले अवैध धंदे व गुन्हेगारीवर वचक मिळविण्यासाठी चुरणी येथे पोलीस स्टेशन होणे अत्यंत गरजेचे आहे. अनैसर्गिक बाबींवर वचक बसवण्यासाठी चिखलदरा पोलीस तोकडे पडत असल्याने आणखीन एक पोलीस स्टेशनची उभारणी गरजेची आहे.

**नरेंद्र टाले, नागरिक चुरणी.**

"चुरणी हे गाव चिखलदरा पोलीस स्टेशन पासून 70 किमी अंतरावर असुन कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने अंतर जास्त असल्याकारणाने प्रशासन काही वेळा कमी पडते. चिखलदरा तालुक्यातील 60 गावांना मध्यप्रदेश ची सीमा लागलेली असल्याने येथे गैरप्रकार नेहमीच घडत असतात. कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने चुरणी हे गाव मध्यवर्ती ठिकाणी असून या गावात पोलीस स्टेशन असल्यास कायदा व सुव्यवस्था राखण्यास निश्चित मदत होईल आणि अवैध धंद्याना चाप बसेल म्हणून चुरणी येथे पोलीस स्टेशन असणे गरजेचे आहे.

**आकाश अलोकार, सेतु संचालक, चुरणी.**

# डॉक्टरांच्या सल्ल्यानेच आयुर्वेदीक औषध घेणे योग्य!

## विदर्भ आयुर्वेदिक महाविद्यालयातील कार्यशाळेत तज्ञ डॉक्टरांचे मत

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 16)** – थोडं काही दुखलं की, डॉक्टरांचा सल्ला न घेता अनेकजणांना स्वतःच गोळ्या, औषधं खाण्याची सवय असते. सध्या सेल्फ मेडिकेशनचा ट्रेंड खूप सामान्य झाला आहे, पण असे करणे आरोग्यास किती धोकादायक असू शकते याची जाणीव सर्वसामान्यांना नसते. अशा औषधांचे सेवन केल्याने शरीरावर गंभीर असे दुष्परिणाम दिसून येतात, ज्यावर उपचार करण्यास बराच काळ लागतो. प्रामुख्याने आयुर्वेदीक औषधांबाबत असं काही नसते असा सर्वसामान्यांना भ्रम असतो. मात्र, काही विशिष्ट आयुर्वेदीक औषधी डॉक्टरांच्या सल्याशिवाय घेणे हे अपायकारक ठरू शकते. कारण आयुर्वेदीक औषधी निर्माण करतांना त्यावर विविध प्रक्रीया केली जाते. आजार, रुग्णाची शारीरिक व मानसिक प्रकृती, वय, बल, ऋतू, प्रमाण व औषधं घेण्याचा कालावधी इ. बाबींचा विचार करून डॉक्टर योग्य औषध रुग्णांना देत असतात, त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्यानेच आयुर्वेदीक औषध घेणे योग्य असे मार्गदर्शन विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयात करण्यात (दि.15) आले आहे.

आयुर्वेदीक औषधी बाबत जनजागृतीपर तज्ञ डॉक्टरांचा संवाद व एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन मार्गदर्शन विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयात करण्यात आले होते. आयुष मंत्रालय; भारत सरकार यांनी शासकीय आयुर्वेद महाविद्यालय नागपूर ला पेरीफेरल फार्मकोव्हिजिलस सेंटर म्हणून प्राधिकृत केले आहे.त्यांच्या कार्यकक्षेत येणाऱ्या आयुर्वेदीय औषधी च्या अयोग्य वापराने होणारे दुष्परिणाम तसेच आयुर्वेदीय औषधींच्या भ्रामक



जाहिरातींबद्दल जनजागरण करून त्यावर आळा कसा घालता येईल याबद्दल चे मार्गदर्शन करण्यात आले. प्रामुख्याने वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी व सर्वसामान्यांमध्ये आयुर्वेदीक औषधांची योग्य माहिती व जनजागृती करण्याकरीता आयोजीत या कार्यशाळेला शासकीय आयुर्वेद महाविद्यालय नागपूर येथील औषधी निर्माण विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. मनीष भोयर व सहसंशोधक डॉ. पुजा नागोसे या तज्ञ डॉक्टरांनी अभ्यासपुर्ण मार्गदर्शन केले.

यावेळी व्यासपीठावर विदर्भ आयुर्वेदिक महाविद्यालयाचे संचालक डॉ. रविंद्र वाघमारे, प्राचार्य डॉ.संजय चोपकर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. वैशाली वानखडे व कार्यशाळेचे मुख्य समन्वयक डॉ.क्रांतीकुमार आमले उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन, धन्वंतरी स्तवन तसेच त्यांच्या स्वागताने झाली. कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ. क्रांतीकुमार आमले व संचालन पदव्यूत्तर विद्यार्थिनी निकिता पांडे यांनी केले. या कार्यशाळेस प्राध्यापक वृंद, रुग्णालयीन कर्मचारी, पदव्यूत्तर व पदवी विद्यार्थी उपस्थित होते.

### सेल्फ मेडिकेशन महागात पडू शकते ?

सेल्फ मेडिकेशन म्हणजे कोणत्याही आजारासाठी डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय स्वत: औषध खरेदी करणे आणि त्याचे सेवन करणे. अलिकडच्या काळात हे खूप वाढले आहे, कारण नागरिक इंटरनेटद्वारे आपल्या रुग्णांसाठी औषध शोधतात आणि विकत घेतात. असे करणे आपल्या आरोग्यासाठी चांगले नाही. आपण ज्या रोगावर उपचार करत आहोत तोआणखी बिघडू शकतो किंवा औषधांचे दुष्परिणाम होऊ शकतात. डॉक्टरांचा सल्ला न घेता स्वतऱ्हून आयुर्वेदीक औषधी बाबत डॉ. मनिष भोयर व डॉ. पुजा नागोसे म्हणाले की, स्वत:हून औषध घेताना शरीर व आरोग्यावर गंभीर परिणामाचा धोका शक्य आहे. उदाहरणार्थ, ज्यामुळे त्वचेवर पुरळ उठणे, सूज येणे किंवा हृदयास धोका बसू शकतो. तुम्ही आधीच कोणतीही औषधे घेत असल्यास, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतीही नवीन औषध घेणे टाळा. यामुळे औषध प्रतिक्रिया होऊ शकते. भारत सरकारच्या या उपक्रमानुसार डॉक्टरांच्या सल्ल्या शिवाय आयुर्वेदीक औषधे घेण्याची ही सवय सर्वप्रथम सोडावी लागेल असे डॉ. पुजा नागोसे यांनी सांगीतले. मेडीकल, रस्त्यांवरील विक्रेत्यांकडून ते औषध विकत घेतले असले तरी एकदा डॉक्टरांचा सल्ला जरूर घ्या. औषधाच्या पाकिटाचे लेबल काळजीपूर्वक वाचा आणि माहिती मिळवा. तुम्ही औषध घेतले असेल आणि त्यानंतर तुम्हाला कोणतीही समस्या जाणवल्यास, ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधा.

# आंबेडकरी साहित्याचे अधिष्ठान हे धम्मावर आधारित

## आंबेडकरी परीवर्तनवादी कविसंमेलन संपन्न

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 16)** – आंबेडकरी साहित्याचे अधिष्ठान हे धम्मावर आधारित आहे,असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवी विनोद बुरबुरे यांनी कवि संमेलनाच्या अध्यक्षपदावरून प्रतिपादन केले.

अ. भा. आंबेडकरी साहित्य संस्कृती व संवर्धन महामंडळ अंतर्गत शिल्पकार फाउंडेशन, वज्जी संदेश, प्रा. सतेश्वर मोरे स्मृती प्रतिष्ठान व गाथा प्रकाशन अमरावतीच्या वतीने संबोधी



भीमटेकडी अमरावती येथे आयोजित दुसऱ्या आंबेडकरी काव्यसंगीतीत निमंत्रितांच्या कविसंमेलनाच्या अध्यक्ष स्थानावरून ते (दि.13) बोलत होते. याप्रसंगी विचार मंचावर सहभागी कवी म्हणून यशवंत खडसे, अनिल कांबळे, शेषराव धांदे,अशोक थोरात, लोकनाथ यशवंत,जनार्धन मोहिते, विजयकुमार गाडगे, हृदय चक्रधर, सूर्यकांत मुनघाटे, भाऊ भोजने, मधू बावलकर, दीपक ढोले, दिगंबर झाडे, महेंद्र ताजने, रजनी संबोधी, प्रकाश कांबळे, किरण पतंगे, छत्रपाल तामगाडगे, शशांक खंडारे, शालिक जिल्हेकर,आर. एस. तायडे, नकुल नाईक, अमृता मनवर, देवीलाल रौराळे, गौतम ढोके, शालिक वानखडे, डॉ. चंद्रशेखर बांबोर्डे, आकाश दोडके, अनुषा सोनसळे,लीलाधर गायकवाड, संजय घरडे,संजय मोखडे,मधुराणी बनसोड, जगदीश राऊत, संगीता राऊत,माया वासनिक, पुष्पा बोरकर,एम. बी. बागडे, मयूर गायकवाड,मधू हिरेकर, अरविंद पाटील,सुनंदा नागदीवे, प्रा.डॉ. सीमा मेश्राम यासह आदी मान्यवर कविंनी आपल्या कविता सादर केल्या. कवी संमेलनाचे संचालन चाफेश्वर गांगवे, कपिल दगडे व विलास थोरात यांनी केले .तत्पूर्वी कार्यक्रमाच्या सुरुवातीला कविसंमेलनाचे अध्यक्ष विनोद बुरबुर यांच्या हस्ते महामानव डॉ.बाबासाहेबआंबेडकर,तथागत गौतम बुद्ध तसेच स्मृतीशेष प्रा. सतेश्वर मोरे यांच्या प्रतिमेला हारार्पण, वंदन करुन त्रिशरण पंचशील घेण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेश गरुड,संघपाल सरदार, राहुल वासेकर,वर्षा गरुड,अश्विनी गडलिंग,रक्षणा सरदार,सागर लोहकरे,गुणराज भगत, प्रज्ञा सवई, संबोधी, सुहानी गडलिंग ,यांनी परिश्रम घेतले तर आभार धर्मशील गेडाम यांनी मानले.

# मिस्टर ग्रीन भारत स्पर्धेत डॉ. संदीप कंठाळे उपविजेते

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 16)** येथील प्रसिध्द दंतशल्य चिकित्सक डॉ. संदीप कंठाळे यांनी पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवरील सौंदर्य स्पर्धेत अमरावतीचा नावलौकीक वाढविला आहे.कोल्हापूर येथे झालेल्या या स्पर्धेत डॉ. कंठाळे उपविजेते ठरले (दि.12) आहेत.

गौरा मिस, मिसेस, मिस्टर ग्रीन भारत व भारत वस्त्र श्रृंगार 2025 तसेच गौरा यशश्री पुरस्कार 2025 (सिजन-7) ची अंतिम फेरी कोल्हापूर येथील हॉटेल हाईलॅण्ड क्लब येथे मोठ्या उत्साहात पार पडली. या सौंदर्य स्पर्धेत संपूर्ण भारतातून 1500 पेक्षा जास्त स्पर्धक सहभागी झाले होते. अंतिम फेरीत 35 स्पर्धकांनी धडक मारली. त्यांचे पाच दिवसांचे ग्रुमिंग वर्कशॉप गगनबावडा कोल्हापूर येथे घेण्यात आले. ज्यामध्ये स्पर्धकांना देहबोली, संभाषण कला, रॅम्प वॉक, कॅट वॉक अशा विविध स्पर्धेतून जावे लागले. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील ज्युरींनी मूल्यांकन केले. या स्पर्धेमध्ये मिस्टर ग्रीन चा किताब जम्मू येथील संदीप रैना यांनी पटकाविला, तर अमरावतीचे डॉ. संदीप कंठाळे हे उपविजेते ठरले. तर नागपूर येथील आदित्य राजे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. डॉ. संदीप कंठाळे यांनी यापूर्वीही त्यांनी अनेक स्पर्धा गाजविल्या आहेत. या स्पर्धेच्या आयोजक गौरी नाईक, जयंत पाटील, सिध्दार्थ नाईक यांनीही डॉ. कंठाळे यांच्या यशाबद्दल कौतुक केले असून यापुढेही अशा स्पर्धा राष्ट्रीय पातळीवर आयोजित केल्या जातील असे नमूद केले आहे.

# पाणी पूजन करून पाणी गुणवत्ता विषयक प्रात्यक्षिक प्रशिक्षण

## महाराष्ट्र ग्राम दर्पण अंतर्गत महादेव यावकर स्मृती भवन येथे कार्यशाळा

### अंजनगाव सुर्जी येथे कार्यक्रमाचे उदघाटन

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी (दि. 16)** – अमरावती येथील महाराष्ट्र ग्राम दर्पण अंतर्गत अंजनगाव सुर्जीतील महादेव यावकर स्मृती भवनात पाणी गुणवत्ता माहिती तसेच प्रात्यक्षिक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन 10 मार्च रोजी करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उदघाटन कनिष्ठ अभियंता उपविभाग काजल ठाकरे व मंजूषा मुरकाळे यांच्या हस्ते पाणी पूजन करून करण्यात आले. प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये संचालन प्रवीण प्रशिक्षक गिरीधर चावरे यांनी केले. तर पाणी शुद्धीकरणा



संबंधी प्रात्यक्षिक हरिचरण पहाडन, एफटीके किट प्रात्यक्षिक प्रणाली देशमुख यांनी दिले. प्रशिक्षणाला राजेश मानमोडे यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी सोनल बदरके, पूजा जाधव तसेच महाराष्ट्र ग्राम दर्पण यांच्या सर्व कर्मचारी यांचे अथक परिश्रम यांनी अथक परिश्रम घेतले. सदर प्रशिक्षणामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या पाणी गुणवत्ता विषयक अम्मलबजावणी बाबतच्या मार्गदर्शक सूचना, पाणी गुणवत्तेचे महत्व, पाणी गुणवत्ता विषयक ग्रामपंचायत व जलसुरंक्षक यांची जबाबदारी इत्यादी बाबींचा समावेश होता. या प्रशिक्षणामुळे शासनाचे पाणी गुणवत्ता विषयक धोरणाची माहिती मिळून ग्रामपंचायत स्तरावर अंमलबजावणी होईल. या उद्देशाने महाराष्ट्र ग्राम दर्पण, जलजीवन मिशन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, राज्य पाणी व स्वच्छता मिशन कक्ष अंतर्गत पाणी गुणवत्ता विषयक प्रात्यक्षिक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन अंजनगाव सुर्जी येथे करण्यात आले होते.

# राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत सरक जाधव, मानवटकर विजयी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 16)**– अग्रसेन भवन येथे पार पडलेल्या भारतीय अंधजन व पुनर्वसन संस्थेच्या राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत (दि.13) अहमदनगरच्या रामराव सरक यांनी प्रथम पुरस्कार प्राप्त केला. आकर्षक ट्रॉफी, 3000 रुपये रोख असे पुरस्काराचे स्वरूप होते तर द्वितीय पुरस्कार श्रीरामपूरचा सोमनाथ जाधव यांनी आकर्षक ट्रॉफी व 2500 रुपये, तृतीय पुरस्कार नागपूरचे कमलेश मानवटकर यांनी आकर्षक ट्रॉफी व दोन हजार रुपयांचे मानकरी ठरले. मंगेश बुंदे, गणेश तामकर, अमित भाकरे, आरती वायखुटे, राहुल गुहे, सुदर्शन पाखरे, वैशाली गोपनारायण, पवन बबलेवार, सुमित वानखडे यांना प्रत्येकी पाचशे रुपये रोख पारितोषिक व स्पर्धकांना प्रमाणपत्र प्रदान



करण्यात आले.

पंच म्हणून काम पाहणारे बुद्धिबळ तज्ञ निशाद व सुरभी सराफ या दांपत्याने स्वत:हून दहा खेळाडू निवडताना मेडल प्रदान केले. त्यामध्ये शिवम ठाकूर, सुधाकर जाधव, संस्कार दंडोळे, लावण्य गरुडेकर, अर्पित पटेल, प्रणय टेंडर, यश घाटे, बिट्टू जामुनकर, निखिल वाघमारे, समीर भोसले, रोहित भिलावेकर व पूजा राऊत यांचा समावेश आहे. स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ मुकेश श्रॉफ यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. घनश्याम, प्रा. प्रवीण जाजू, उषा करवा, प्रमोद जाधव, विवेक करवा, तुषार सोमानी, डॉ. गोविंद कासट, संस्थाध्यक्ष प्रा. डॉ. संजय काळे, महासचिव शाकीर नायक, निनाद व सुर्वे सराफ यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाचे संचलन, आभार संजय काळे व शाकीर नाईक यांनी केले. पुष्पा काळे यांचे सहकार्य लाभले.

# पीरियड मेळाव्यात आरोग्यविषयी मनमोकळेपणाने संवाद

## परतवाडामध्ये `उजास'च्या वतीने आयोजन | 55 शाळांना सहभाग

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा (दि. 16)** – मासिक पाळीशी संबंधित गैरसमजांना आव्हान देण्यासाठी व जनजागृती करण्यासाठी परतवाडा येथील सिद्धार्थ हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे पीरियड मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात मासिक पाळीच्या आरोग्याविषयी मोकळेपणाने संवाद साधण्यात आला.

अद्वैतेश बिर्ला यांच्या नेतृत्वाखालील आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टचा उपक्रम असलेल्या उजास च्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मासिक पाळीविषयी खोलवर रुजलेले कलंक आणि चुकीची माहिती दूर करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमात पुरुषांसह 1000 हून अधिक किशोरवयीन मुली, पालक आणि समाजातील सदस्यांना सहभागी करून घेण्यात आले. भारतातील अनेक ग्रामीण आणि निमशहरी भागात प्रगती झालेली असली तरी मासिक पाळीच्या निर्बंधांचा सामना करावा लागतो. त्यामुळे मुलींमध्ये शाळांमधील गैरहजेरीचे प्रमाण जास्त आहे.



मासिक पाळीच्या आरोग्य शिक्षणाचा अभाव, कलंक आणि सॅनिटरी उत्पादनांच्या अपुऱ्या उपलब्धतेमुळे दरवर्षी सुमारे 23 दशलक्ष मुली शाळा सोडतात, असे संशोधनातून दिसून आले आहे. या कार्यक्रमात शिक्षणाधिकाऱ्यांचा विभाग, पोलिस दीदी अधिकारी, अंगणवाडी सेविका आणि 55 शाळा मुख्याध्यापक व कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग घेतला. मासिक पाळीच्या आरोग्याच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी यात सर्वांगीण दृष्टिकोनावर भर देण्यात आला. संवादात्मक खेळ, क्रियाकलाप आणि चर्चेद्वारे, सहभागींनी कलंक-




मुक्त वातावरणास प्रोत्साहन देतानाच मासिक पाळीच्या स्वच्छता व्यवस्थापनासाठी सर्वोत्तम पद्धती शिकून घेतल्या. या उपक्रमामुळे महाविद्यालयीन विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये क्रॉस लर्निंगलाही प्रोत्साहन मिळाले, त्यातून मासिक पाळीबाबत आरोग्य जागृतीमध्ये बदलाचे प्रतिनिधी म्हणून त्यांची भूमिका मजबूत झाली. केवळ 2024 -25 मध्ये उजासने 141 शाळांमध्ये 676 मासिक पाळी आरोग्य सत्रे आयोजित केली असून, अमरावतीतील एकूण 28807 लाभार्थ्यांशी संपर्क साधला आहे.

### जनजागृतीची आत्यंतिक निकड - पूनम पाटकर

उजासच्या प्रमुख पूनम पाटकर यांनी जनजागृतीची आत्यंतिक निकड असल्याचे अधोरेखित केले. त्या म्हणाल्या, भारतातील जवळपास 71 टक्के किशोरवयीन मुली पहिली मासिक पाळी येईपर्यंत मासिक पाळीबद्दल अनभिज्ञ राहतात. त्यामुळे अनेकदा त्यांची तयारी झालेली नसते, त्यांना लाज वाटते आणि सामाजिक गैरसमजांमुळे त्यांच्यावर निर्बंध येतात. मासिक पाळीचे आरोग्य ही केवळ वैयक्तिक समस्या नाही - हा सार्वजनिक आरोग्याचा गंभीर मुद्दा आहे. पीरियड मेळा यासारख्या उपक्रमांतून खुल्या संवादांना चालना देणे, लज्जेचे चक्र मोडून काढणे आणि किशोरवयीन मुलींना आत्मविश्वासाने व स्वतंत्रपणे जगण्यास समर्थ बनविणे हे आमचे लक्ष्य आहे.

### गैरसमज दूर करण्याची तातडीची गरज - अद्वैतेश बिर्ला

या उपक्रमाविषयी बोलताना उजासच्या संस्थापिका अद्वैतेश बिर्ला यांनी मासिक पाळीविषयीचे गैरसमज दूर करण्याची तातडीची गरज असल्याचे अधोरेखित केले. त्या म्हणाल्या, मासिक पाळीबाबतच्या निर्बंधांमुळे मुली बंधनात पडतात व त्यामुळे त्यांची क्षमता मर्यादित होते. परिवर्तनाची सुरूवात उद्याचे चेंजमेकर असलेल्या तरुणांपासून होते. जेव्हा तरुण मने आजच्या कालबाह्य समजुतींना आव्हान देतात, तेव्हा भावी पिढ्या कलंकमुक्त होतील. कोणत्याही मुलीला तिच्या मासिक पाळीमुळे त्रास होणार नाही आणि अडथळ्यांशिवाय तिला तिच्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्याचे स्वातंत्र्य असेल. जागरूकता, मासिक पाळीशी संबंधित विनामूल्य उत्पादने उपलब्ध करून देणे आणि शाश्वतता या तीन स्तंभांवर उजास उभी आहे. पीरियड मेळावा हा या मूल्यांप्रति आमच्या कटिबद्धतेचे प्रतिबिंब आहे.

# युवा महोत्सवात विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी पटकाविले पारितोषिके

## कुलगुरूंच्या हस्ते सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 16)** – अमेठी विद्यापीठ, उत्तर प्रदेश (नोएडा), नवी दिल्ली येथे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सदर युवा महोत्सव स्पर्धेमध्ये देशभरातील 148 विद्यापीठांच्या कलावंत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कलावंत चमूने उत्कृष्ट सादरीकरण करुन तब्बल 04 पारितोषिके पटकाविली. चमूमध्ये पाश्चिमात्य वाद्य संगीत कलाप्रकारामध्ये प्रथमेश अडाळगे याला तृतीय पारितोषिक, फाईन आर्ट (पोस्टर मेकींग) कलाप्रकारामध्ये प्रगती सुधा



हिला तृतीय पारितोषिक, सुगम संगीत कलाप्रकारात मोहम्मद अबसार मोहम्मद साबीर याला तृतीय पारितोषिक व शास्त्रीय तालवाद्य कलाप्रकारामध्ये चेतन खापरे याला चतुर्थ पारितोषिकाने (दि.13) सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या अभूतपूर्व यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी त्यांचा सत्कार केला. कलावंत विद्यार्थ्यांनी अतिशय मेहनत घेवून आपल्या कला राष्ट्रीय स्तरावर सादर करुन प्राविण्य मिळविले आहे. त्यांच्या रुपाने विद्यापीठाचा नावलौकिक देशपातळीवर पोहचल असून, ही निश्चितच अभिमानास्पद कामगिरी आहे. भविष्यात आमचे कलावंत विद्यार्थी विविध कलाक्षेत्रात आणखी उत्तुंग भरारी घेतील, असा विश्वास कुलगुरूंनी व्यक्त केला. त्यांनी विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांना भावी यशासाठी शुभेच्छा दिल्यात. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी अभिनंदन केले. चमू व्यवस्थापक म्हणून डॉ. सावन देशमुख व प्रा. नेत्रा मानकर यांनी काम पाहिले.

# गरोदर राहण्यासाठी महिला येतात ‘ या ’ गावात !

समुद्रसपाटीपासून कैक हजार फूट उंचीवर असणाऱ्या आणि पर्यटकांसाठी कोणत्याही ऋतूमध्ये नवे रुप समोर आणणाऱ्या लडाखविषयी अनेकांना कायम अप्रूप वाटते. नैसर्गिक सौंदर्याबरोबरच निसर्गाचे रौद्र ते अगदी निर्मळ रुप दाखवणाऱ्या या भागाला आजवर असंख्य पर्यटकांनी भेट दिली; पण आजही लडाखमधील काही गावे मुख्य प्रवाहापासून दूर आपल्याच अनोख्या विश्वात रममाण आहेत. आधुनिक जगाशी त्यांचा थेट संबंध नाही. असे असूनही ही गावे आकर्षणाचा केंद्रबिंदू मात्र आहेत. जगभरातील प्रवासवेडी मंडळी आणि ट्रेकर्ससाठी महत्त्वाच्या अशा या लडाखमध्ये एक गाव असेही आहे. तिथे परदेशी महिलांचा अधिक वावर पहायला मिळतो. या महिला इथे एका खास कारणासाठी येतात. हे कारण असते ते म्हणजे गर्भधारणेचे.



लडाखच्या कारगिल क्षेत्रापासून साधारण ७० किलोमीटर अंतरावर असणाऱ्या एका गावाकडे या परदेशी महिलांचा सर्वाधिक ओघ असतो. हे गाव या क्षेत्रात आर्यन व्हॅली किंवा आर्य व्हॅली म्हणून ओळखले जाते. लडाखच्या पर्वतांनी वेढलेल्या या भागात युरोपीय महिलांचा सर्वाधिक वावर पाहायला मिळतो. विविध संदर्भांमध्ये आढळणाऱ्या उल्लेखानुसार सिकंदराच्या सैन्यातील जवानांप्रमाणे चांगली शरीरयष्टी, भक्कम बांधा आणि निरोगी देहबोली असणाऱ्या तरुणांकडून गर्भधारणेसाठी परदेशी महिला या गावाची वाट धरतात आणि गर्भधारणेनंतर आपल्या देशी परततात. सुरुवातीच्या काळात या कोणालाच या समुदायाविषयी फार माहिती नव्हती; पण इंटरनेटच्या उपलब्धतेमुळे या गावाची चर्चा संपूर्ण जगात झाली आणि परदेशी महिलांचे येथे येण्याचे प्रमाण वाढले. येथे याच कारणास्तव पर्यटनाला वाव मिळत असून स्थानिकांना आर्थिक मदत देऊ केली जाते असेही सांगण्यात येते.

**या खोऱ्याचे वैशिष्ट्य ?**

लडाखच्या आर्यन व्हॅलीमध्ये ब्रोक्पा समुदायाचे अस्तित्व असून ही मंडळी अलेक्झांडर द ग्रेट (जगज्ञेता सिकंदर) याच्या लष्कराचे वंशज म्हणवले जातात. इतकेच नव्हे, तर येथील स्थानिकांच्या मते ते जगातील ज्ञात असे सर्वात शुद्ध आर्यवंशीय आहेत. सिकंदर भारतातून पुढे जात होता, तेव्हा त्याच्या सैन्यातील काही तुकड्या इथेच थांबल्या आणि हा समुदाय म्हणजे त्यांचेच वंशज आहेत, असे म्हणतात.

**अंगकाठी, चेहरेपट्टीही वेगळी**

लडाखमधील या समुदायाची अंगकाठी आणि चेहरेपट्टी इतरांपेक्षा काहीशी वेगळी असून, त्यांची भाषा आणि संस्कृतीसुद्धा वेगळी आहे. या संस्कृतीमध्ये त्यांच्या सणवारांची लेखी नोंद ठेवण्यात आलेली नाही. ही सर्व माहिती मौखिक स्वरुपात पुढील पिढीकडे सुपूर्द केली जाते. ब्रोकस्केट ही येथील स्थानिकांची भाषा.

# माजी मुख्यमंत्री सामान्य प्रवाशांसारखी रेल्वेची वाट पाहतात तेव्हा..!



मुख्यमंत्री, नेते, पंतप्रधान, राष्ट्रपती, माजी मुख्यमंत्री आदींनी कुंभमेळ्यात शाही स्नानाचा सरकारी इतमामात आनंद लुटला. सुरक्षा व्यवस्थेत शाही स्नान केले. त्यांना गर्दीचा त्रास झाला नाही; परंतु त्यांच्यामुळे अनेकांना त्रास झाला. त्याला अपवाद ठरले एक माजी मुख्यमंत्री. त्यांचे नाव अर्जुन मुंडा. शाही स्नान झाल्यानंतर ते बडेजाव टाळून फलाटावरील एका बाकावर सामान्य प्रवाशासारखे बसून चक्क रेल्वेची वाट पहात होते...

देशभरातून लाखो, कोट्यवधी भाविकांनी कुंभमेळ्याला जाऊन दर्शन घेतले. गंगा नदीतील पवित्र कुंडात डुबकी घेऊन स्नान केले. पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांसह अनेक दिग्गज नेतेमंडळी, सेलिब्रिटी, आमदार-खासदारही कुंभमेळ्यात सहभागी होऊन धार्मिक पर्यटनाचा आनंद घेत होते. प्रयागराजमधील कुंडात डुबकी घेतलेल्या अनेक नेत्यांचे फोटो ‘सोशल मीडिया’वर व्हायरल झाले आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही कुंभमेळ्यात सपत्नीक स्नान केले. एकनाथ शिंदे हे सहकाऱ्यांसह गंगा स्नानाला आले होते.

**प्रवाशांच्या गर्दीत असमान्याचा सामान्य चेहरा**

कुंभेमळ्यासाठी प्रयागराजमध्ये मोठी गर्दी उसळली होती. रेल्वे स्थानक असो, विमानतळ असो किंवा बसस्थानक; सर्वत्र प्रवासीच प्रवासी दिसत होते. त्यातच प्रयागराज रेल्वे स्थानकावरील एका प्रवाशाचा फोटो व्हायरल झाला. माजी केंद्रीय मंत्री आणि माजी मुख्यमंत्री अर्जुन मुंडा एका रेल्वे स्टेशनवर ट्रेनची वाट पहात असल्याचे पहायला मिळाले. ते सर्वसामान्य प्रवाशांसह आपल्या पत्नीसमवेत एका कठड्यावर बसले होते. पत्नी मीरा यांच्यासह त्यांनी प्रयागराज येथील पवित्र कुंडात स्नान केले. येथे दर्शन घेतल्यानंतर आणि अध्यात्मिक डुबकी मारल्यानंतर ते परतीच्या प्रवासासाठी प्रयागराज रेल्वे स्थानकावर गाडीची वाट पाहत होते. या वेळी, अनेक प्रवासी त्यांच्याजवळून गेले; पण कोणालाही त्यांची ओळख लक्षात आली नाही. विशेष म्हणजे अंगावर शाल ओढून ते इकडे-तिकडे पहात होते. यावरून, त्यांच्या साधेपणाची चर्चा आणि कौतुक झाले.

**‘व्हीआयपी’ सुरक्षेशिवायचा साधेपणा**


मुंडा यांची ओळखच सर्वसामान्यांचा नेता अशी आहे. आपल्या मतदारसंघातही ते नागरिकांसोबत कुठेही सहज रममाण होतात. त्यामुळेच कुंभमेळ्याला पत्नीसोबत आल्यानंतर त्यांनी कुठलीही व्हीआयपी सुरक्षा घेतली नाही किंवा ‘व्हीआयपी’ असल्याचा आव आणला नाही.

# कॅलिडोस्कोप

# जगातील पहिला मानव कोण ?

विज्ञानानुसार जगातील पहिला मानव ‘होमो हॅबिलिस’ होता. त्याचे अवशेष आफ्रिकेत सापडले आहेत आणि त्याचे वय सुमारे २.८ ते १.४ दशलक्ष वर्षे जुने आहे.

होमो हॅबिलिस हा जगातील पहिला मानव मानला जातो, कारण दोन पायांवर चालण्यास सक्षम असणारा हा पहिला प्राणी होता. ‘होमो सेपियन्स’ हा आधुनिक मानवाचा पूर्वज मानला जातो. आज अस्तित्वात असलेल्या आपल्या सर्वांना ‘होमो सेपियन्स’ मानले जाते. त्याच्या बुद्धिमत्तेचा सर्वाधिक विकास झाला. ‘होमो सेपियन्स’चे अवशेषही आफ्रिकेत सापडले आहेत आणि त्याचे वय सुमारे तीन लाख वर्षे आहे.



‘होमो सेपियन्स’ हा आपला पूर्वज मानला जातो. कारण तो आपल्या सर्वांसारखा दिसणारा पहिला प्राणी होता. लोक एकमेकांना भेटतात आणि बोलतात, तेव्हा आपले विचार हस्तांतरित होतात. ‘होमो सेपियन्स’चा विकास अशाच प्रकारे झाला आहे.

**माणूस कसा विकसित झाला ?**

‘होमो सेपियन्स’ हे पाच वेगवेगळ्या प्रजातींमधून तयार झाले आणि या सर्वांच्या वैशिष्ट्यांची सांगड घातल्यानंतर एक बुद्धिमान माणूस विकसित झाला. लोक एकमेकांना भेटतील, विचारांची देवाणघेवाण होईल, तोपर्यंत त्यांचा विकास होत राहणार. डार्विनचे वैज्ञानिक स्पष्टीकरणदेखील असे आहे की मानवी इतिहास हा क्रमिक विकास आणि बदलांचा आहे.

**‘होमो निअँडरथॅलेन्सिस’ कोण होते ?**

‘होमो निअँडरथॅलेन्सिस’ला देखील मानवाचे पूर्वज मानले जाते. कारण ते ‘होमो सेपियन्स’सह अस्तित्वात होते. त्यांचे पुरावे युरोप आणि आशियामध्ये सापडले आहेत. त्यांचे वय सुमारे चार लाख ते ४० हजार वर्षे आहे.

# विमान ‘ टेकऑफ ’ आणि ‘ लँडिंग ’ करताना पायलटचे थरतात हातपाय !

विमान हे प्रवासाचे सर्वात जलद माध्यम आहे. भारतामध्ये विविध राज्यांमध्ये मिळून एकूण १३७ विमानतळ आहेत. यापैकी ३४ आंतरराष्ट्रीय विमानतळ, दहा सीमाशुल्क विमानतळ, ८१ देशांतर्गत विमानतळ आणि २३ संरक्षण हवाई क्षेत्रांमधील विमानतळांचा समावेश आहे. यातील काही एअरपोर्ट खूपच धोकादायक आहेत. या विमानतळांच्या परिसरातील भौगोलिक रचना अत्यंत धोकादायक आहे. यामुळे तेथे ‘टेक ऑफ’ आणि ‘लँडिंग’ करताना पायलटचे हात पाय थरथरतात.

* लेंगपुई विमानतळ

मिझोरममध्ये असलेले लेंगपुई विमानतळ भारतातील सर्वात धोकादायक विमानतळांपैकी एक आहे. या विमानतळाच्या धावपट्टीखाली सतत पाण्याचे प्रवाह वाहत असतात. त्यामुळे पावसाळ्यात परिस्थिती आणखी धोकादायक बनते. अशा वातावरणात येथे विमानांचे ‘टेकऑफ’ आणि ‘लँडिंग’ करणे वैमानिकांसाठी एखाद्या कठीण परीक्षेपेक्षा कमी नसते.



* लेह रिम्पोची विमानतळ


जम्मू-काश्मीरमधील लेह येथे असलेले रिम्पोची विमानतळ देशातील सर्वात उंच आहे. हे विमानतळ ३२५९ मीटर उंचीवर आहे. येथे ‘टेक ऑफ’ आणि ‘लँडिंग’ करणे हा पायलटसाठी अत्यंत धोकादायक अनुभव असतो. जास्त उंची आणि क्षणाक्षणाला बदलणारे वातावरण यामुळे येथे विमान नियंत्रित करणे खूप कठीण असते.

* कांगडा विमानतळ

हिमाचल प्रदेशमधील कांगडा येथे असलेले कांगडा अर्थात गग्गल विमानतळ २४९२ फूट उंचीवर आहे. याची धावपट्टी खूपच धोकादायक आहे. बदलते हवामान आणि उंचीमुळे वैमानिकांना येथे खूपच सतर्क रहावे लागते.

* मंगलोर विमानतळ

मंगलोर विमानतळ हे ‘टेबलटॉप’ विमानतळ म्हणून ओळखले जाते. २०१० मध्ये येथे एक भीषण विमान अपघात झाला. यावरूनच हा विमानतळाचे धोकादायक स्वरूप अधोरेखित झाले. ‘एअर इंडिया’चे एक विमान धावपट्टीवरून घसरले आणि टेकडीवरून पडल्यानंतर आग लागली. या धावपट्टीच्या आकारामुळे आणि आजूबाजूच्या भूप्रदेशामुळे ‘टेक ऑफ’ आणि ‘लँडिंग’ करणे अत्यंत धोकादायक आहे. भारतातील या धोकादायक विमानतळांवर फक्त अनुभवी वैमानिकांनाच उड्डाण करण्याची परवानगी दिली जाते. यासाठी वैमानिकांना विविध चाचण्या पार कराव्या लागतात. प्रशिक्षणार्थी वैमानिकांना येथे चुकूनही पाठवले जात नाही.



# वराने दुसरीच्या गळ्यात घातली माळ आणि पुढे...

लग्न म्हटले की आयुष्याचा नव्याने सुरू होणारा प्रवास असतो. या प्रवासात आपला जोडीदार योग्य असला तर तो सुखाने होते; पण ही निवड चुकली, तर आयुष्यभर पश्चाताप करण्याशिवाय काही पर्याय नसतो. सुदैवाने काहीजणांना लग्नाच्या आधीच जोडीदाराबद्दल ही कल्पना येते किंवा माहिती मिळते, तर काहींना दुर्दैवाने लग्नानंतरच हे गुपित कळते. उत्तर प्रदेशमधील बरेलीमध्ये याची प्रचिती देणारी एक घटना समोर आली आहे. प्रकरण इथपर्यंत पोहोचले, की नवरी मुलीने नवऱ्याच्या कानाखाली लगावत लग्न मोडले. उत्तर प्रदेशमधील बरेली येथे लग्नमंडपात नवरा मुलगा दारुच्या नशेत पोहोचला होता. या वेळी त्याने दारूच्या नशेत नवरी मुलीच्या मैत्रिणीच्या गळ्यात हार घातला. यानंतर संतापलेल्या २१ वर्षीय नवरीने, राधा देवीने मुलाच्या कानाखाली लगावली आणि लग्न मोडून मंडपातून निघून गेली; पण लग्नमंडपात फक्त एवढंच झालं नाही.

**हुंड्याचीही मागणी**

२६ वर्षीय नवरा मुलगा रवींद्र कुमार वरात घेऊन लग्नमंडपात उशिरा पोहोचला आणि तिथून सगळे काही सुरू झाले. नवरी मुलीच्या कुटुंबाने फिर्यादीत दिलेल्या माहितीनुसार नवऱ्या मुलाच्या कुटुंबाने अतिरिक्त हुंड्याची मागणी केली होती. मुलीच्या वडिलांनी सांगितले की आपण लग्नाआधीच्या विधींदरम्यान २.५ लाख रुपये दिले होते. यानंतर लग्नाच्या सकाळी दोन लाख दिले; पण यावरही नवऱ्या मुलाच्या कुटुंबाचे पोट भरत नव्हते.

**वरमाला घालण्याच्या वेळी मद्यपान**

रवींद्रकुमारला आपल्या मर्जीतील मुलीशी लग्न करायचे होते. तो आपल्या लग्नात दारुच्या नशेत पोहोचला आणि मुलीचे कुटुंब, नातेवाइकांशी गैरवर्तन करू लागला.

वरमाला घालण्याची वेळ आली, तेव्हा तो आपल्या मित्रांसह मद्यपान करत होता. वरमाला घालताना रवींद्रकुमारने चुकून नवरी मुलीच्या शेजारी उभ्या असलेल्या तिच्या मैत्रिणीच्या गळ्यात हार घातला. यामुळे नवरी मुलगी इतकी संतापली की तिने त्याच्या कानाखाली लावली आणि लग्न मोडून निघून गेली.

**मंगल कार्यालयात खुर्च्यांची फेकाफेक**

प्रकरण एवढ्यावरच थांबले नाही. यानंतर नवरा मुलगा आणि नवरी मुलीच्या कुटुंबीयांमध्ये हाणामारी सुरू झाली. दोन्ही बाजूंनी एकमेकांवर खुर्च्या फेकण्यात आल्या. नवरा मुलगा आणि वरातीला पुन्हा माघारी पाठवण्यात आले. पोलिसांनी नवरा मुलगा आणि त्याच्या मित्रांविरोधात नवरी मुलीच्या कुटुंबाचा अपमान केल्याबद्दल आणि शांतताभंग केल्याबद्दल गुन्हा दाखल केला आहे. हुंडा मागितल्याप्रकरणी नवऱ्या मुलाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मित्रांनीच नवऱ्या मुलाला दारू पाजली असे सांगितले जात आहे.



# पाण्याखालचं मिलिट्री संग्रहालय

सैन्याचे रणगाडे, तोफा, बंदुका अशा वस्तू समुद्राच्या तळाशी पहायला मिळाल्या तर... खूप गंमत येईल ना? जॉर्डनमध्ये असंच एक संग्रहालय तयार करण्यात आलं आहे. या संग्रहालयात सैन्याचे रणगाडे, हेलिकॉप्टर, बंदुका, बोटी पहायला मिळतात. विशेष म्हणजे हे संग्रहालय समुद्राच्या तळाशी आहे. त्यात तुम्हाला सैन्याची १९ उपकरणं पहायला मिळतील. अकाबा किनाऱ्यावरून हे संग्रहालय पहायला जाता येईल. लाल समुद्रात २८ मीटर म्हणजे ९२ फूट खोल ते उभारण्यात आलं आहे. फक्त सात दिवसात ते उभारण्यात आलं. इथे येणाऱ्या पर्यटकांना काही तरी धाडसी, वेगळं पाहिल्याचं समाधान मिळावं, समुद्री जीवनासोबतच सैन्याचं वैभव न्याहाळता यावं या उद्देशाने हे संग्रहालय उभारण्यात आलं. हे जगातलं पाण्याखालचं पहिलं मिलिट्री संग्रहालय आहे. पर्यटकांना तिथेपर्यंत पोहोचवण्यासाठी खास बोटी तयार करण्यात आल्या आहेत. खोल पाण्यात जायचं नसेल तर पर्यटक वरूनच हा नजारा बघू शकतात. यासाठी काचेच्या बोटी तयार आहेत. या बोटींमधून समुद्र तळ न्याहाळता येईल. असं हे अनोखं संग्रहालय जॉर्डनची शान वाढवणारं आहे.

# जुने ते सोने



सर्वसाधारणपणे कोणी जुने बूट खरेदी करत नाही. असे बूट, पादत्राणं टाकून दिली जातात. मात्र पादत्राणं तयार करणाऱ्या एका प्रसिद्ध कंपनीचे ४७ वर्षांपूर्वीचे बूट कोट्यवधी रुपयांना विकले गेले आहेत. या बुटांचा लिलाव करण्यात आला त्यावेळी भारतीय चलनात तीन कोटी रुपये एवढी किंमत मिळाली. काही काळापूर्वी ‘नायके’ या कंपनीची सर्वात दुर्मीळ बुटांची जोडी तीन कोटी रुपयांना विकली गेली. तेव्हा हा लिलाव चर्चेचा विषय ठरला होता. असं काय होतं या बुटांमध्ये, असा प्रश्न तुमच्या मनात उपस्थित झाला असेल. आजवर जुन्या बुटांना कधीच एवढी किंमत मिळाली नव्हती. याआधी महान बास्केटबॉलपटू मायकल जॉर्डनच्या बुटांवर १.३ कोटी रुपयांची बोली लागली होती. त्यानंतर नायके कंपनीच्या या बुटांसाठी एवढी बोली लावली गेली. हे बूट कंपनीने ४७ वर्षांपूर्वी तयार केले होते. ऑलिंपिक चाचणीच्या उद्देशाने त्यांची निर्मिती करण्यात आली होती. ‘मून शूज’ या नावाने ते ओळखले जायचे. न्यूयॉर्कमधल्या सोदबी ऑक्शन हाऊसमध्ये हा लिलाव संपन्न झाल्याचे आजही अनेकांना आठवत असेल. झाला. बिल बॉवर्नमॅन यांनी हे बूट डिझाइन केले होते. या लिलावात बुटांच्या १०० जोड्यांसाठी भारतीय चलनात ५.५६ कोटी रुपयांची बोली लागली होती.



# अनोखा संवाद

प्राणी-पक्षी एकमेकांशी संवाद साधतात. धोक्याच्या सूचना देतात. एकमेकांच्या मदतीसाठी धावूनही येतात. पण त्यांच्या अंड्यांचं काय? अंडीही एकमेकांशी संवाद साधतात का? या प्रश्नाचं उत्तर ‘हो’ असं द्यावं लागेल. अंडीही एकमेकांशी संवाद साधतात. स्पेनमधल्या विगो विद्यापीठातल्या एका संशोधनातून ही धक्कादायक बाब समोर आली. संशोधकांनी पिवळ्या पायांच्या चिमणीच्या ९० अंड्यांवर संशोधन केलं. त्यावेळी आईने धोक्याची सूचना दिल्यावर अंड्यांमध्ये कंपनं जाणवली. या कंपनांद्वारे अंडी इतर अंड्यांना सावध करतात. कंपनांमुळे शेजारचं अंडं सावध होतं. त्याला धोक्याची जाणीव होते. अंड्यांच्या आत असणारी पिल्लं धोक्याची सूचना मिळताच तीव्र हालचाली करू लागतात, आवाज काढू लागतात. या आवाजामुळे अंड्यांमध्ये कंपनं जाणवतात. कंपनांच्या माध्यमातून अंडी एकमेकांशी संवाद साधतात. या सूक्ष्म निरीक्षणावरुन पक्ष्यांची अंडी एकमेकांशी संवाद साधत असल्याची बाब अधोरेखित होत असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.

# विदर्भातील शेतकऱ्यांना दूध उत्पादन वाढविण्याची सुवर्णसंधी

## नितीन गडकरी यांचे प्रतिपादन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

कोल्हापूर, सांगली, सोलापूर, पुणे या एकेका जिल्ह्यांत ७० ते ८० लाख लिटर्स दूध उत्पादन होते. विदर्भातील भंडारा व गोंदिया हे दोन जिल्हा सोडले तर उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये दूधाचे उत्पादन फार कमी होते. पण आता मदर डेअरी प्रकल्पाच्या निमित्ताने विदर्भातील शेतकऱ्यांना दूध उत्पादन वाढविण्याची सुवर्णसंधी निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज (रविवार, दि. १६ मार्च) केले.

मराठवऱ्हाड दुग्ध उत्पादक संघटनेचा शुभारंभ तसेच धारा खाद्य तेल पॅकिंग केंद्राचे भूमिपूजन तसेच मदर डेअरीच्या बुटीबोरी स्थित मेगा मॅन्युफॅक्चरिंग प्लान्टच्या कामाचा शुभारंभ नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. तेलंगखेडी मार्गावरील मदर डेअरी प्लान्ट येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी एनडीडीबीचे अध्यक्ष डॉ. मीनेश शहा, मदर डेअरी फ्रूट्स अँड व्हेजिटेबलचे मनीष बंदलिश, नॅशनल डेअरी सर्व्हिसेसचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. सी.पी. देवानंद, मराठवऱ्हाड दूग्ध उत्पादक कंपनीच्या चेअरमन वर्षा चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

नितीन गडकरी म्हणाले, मराठवाडा आणि विदर्भासाठी सुवर्णाक्षराने लिहिला जावा असा आजचा दिवस आहे. २०१६ पासून मदर डेअरीसोबत मिळून राज्य सरकार धवल क्रांती आणण्याचे आणि दूध उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न करीत आहे. कारण विदर्भातील मुख्य पिकांची अवस्था वाईट आहे.

वर्धा, यवतमाळ, अकोला, अमरावती, वाशीम, बुलढाणा जिल्ह्यांना शेतकरी आत्महत्यांनी ग्रासले. दुसरीकडे गडचिरोलीला नक्षल चळवळीने ग्रासल्यामुळे तेथील विकासाला खीळ बसली होती. मात्र, मदर डेअरीसोबत राज्य सरकारने सामंजस्य करार केला आणि योजना तयार केली. त्यानंतर मदर डेअरीने सुरू केलेले काम दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरत आहे.

मराठवऱ्हाड दूग्ध उत्पादक संघटनेमुळे विदर्भातील महिला शेतकरी देखील आत्मनिर्भर होतील, असा विश्वास नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. त्याचवेळी त्यांनी विदर्भातील दूध उत्पादन वाढण्याची गरज असल्याचे म्हटले. विदर्भात हरियाणा, पंजाब, गुजरात, राजस्थानातून गायी आणल्या जात आहेत. अशाने स्थानिक शेतकऱ्यांना फायदा होणार नाही. मदर डेअरीशी जुळलेल्या ३५ हजार शेतकऱ्यांचे प्रबोधन करावे.

यांच्यापैकी प्रत्येकाने पाच चांगल्या गायी आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून तयार केल्या तर दूध उत्पादन वाढेल. स्थानिक लोकांनी जास्त दूध देणाऱ्या गायी तयार केल्या तर त्याचा विदर्भातील शेतकऱ्यांनाच फायदा होईल, असेही नितीन गडकरी म्हणाले.

मदर डेअरीने आता पशुवैद्यकीय तज्ज्ञांच्या मदतीने येथील स्थानिक गो-पालकांच्या गायींच्या चांगल्या वाणांसाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. मदर डेअरी मार्फत पशुवैद्यकीय तज्ज्ञ एम्ब्रिओ ट्रान्सफर तसेच इन विट्रो फटीर्लायझेशन (आयव्हीएफ) सारखे आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत तसेच दुग्ध उत्पादकांपर्यंत पोहोचतील अशा रीतीने प्रयत्न करावे. यामधून जवळपास प्रतिदिन १२ ते १५ लिटर दूध देणाऱ्या गाई तयार केल्या तर महाराष्ट्राला परराज्यातील गायी येथे आणण्याची गरज पडणार नाही, नितीन गडकरी यांनी यावेळी नमूद केले.

शेतकऱ्यांना चांगल्या दर्जाचे पशुखाद्य मिळावे यासाठी मदर डेअरीने पुढाकार घ्यावा, असे आवाहन नितीन गडकरी यांनी केले. विदर्भात कापसाची सरकी, तुर चुरी, तसेच मका मुबलक प्रमाणात आहे. यातून जिल्हानिहाय पशुधन विकसित करून ते किफायतशीर किमतीमध्ये दूध उत्पादकांना उपलब्ध करून देण्याची सूचना नितीन गडकरी यांनी मदर डेअरीला केली. नेपियर ग्रासच्या माध्यमातून वर्षभर हिरवा चारा या पशुधनाला उपलब्ध करून दिल्यास दूध उत्पादनात सुद्धा वाढ होईल, असेही ते म्हणाले.

### संत्रा बर्फीचे मार्केटिंग

मदर डेअरीच्या मार्फत नागपूर येथील सुप्रसिद्ध अशा संत्रा बर्फीचे देखील मार्केटिंग होणे आवश्यक आहे. ही बर्फी शुद्ध संत्र्याचा पल्पपासूनच तयार केली जाईल. त्यामुळे विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना देखील फायदा होईल, असा विश्वास नितीन गडकरी यांनी यावेळी व्यक्त केला. नितीन गडकरी यांनी गडचिरोली आणि वाशिम या आकांक्षी जिल्ह्यांमध्ये देखील विशेष लक्ष देण्याचे आवाहन मदर डेअरीला केले.

# सैनिकाच्या पत्नीची गळफास घेऊन आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १६ :

तुझं माझ्यावर पुर्वीसारखे प्रेम नाही. त्यामुळेच तू माझा नेहमी मानसिक व शारीरिक छळ करतोस. त्यामुळे मी आत्महत्या करीत आहे, अशी सुसाईड नोट लिहून एका सैनिकाच्या पत्नीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही दुर्दैवी घटना शनिवारी मौद्यात घडली. प्रज्ञा मोहन सदाशिव (२५,रा. मौदा, एनटीपीसी वसाहत) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोहन सदाशिव हा मूळचा अचलपूर तालुक्यातील रहिवाशी असून तो केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलात (सीआयएसएफ) सैनिक आहे. त्याचे मामाची मुलगी प्रज्ञा हिच्यावर प्रेम होते. दोघांना लग्न करायचे होते. त्यांनी कुटुंबियांशी चर्चा करुन दोघांनी २०१९ मध्ये प्रेमविवाह केला. दोघेही आसामला राहत होते. तो गेल्या सहा महिन्यापूर्वी त्याची आता मौदा येथील नॅशनल थर्मल पॉवर (एनटीपीसी) कंपनीत बदली झाली. तेव्हापासून दोघेही मौद्यात राहत होते. लग्नाला ६ वर्षे झाले तरी त्यांना मुलबाळ नव्हते. त्यामुळे मोहन नेहमी तणावात राहत होता.

दारुच्या नशेत तो पत्नीला मारहाण करीत होता. तसेच तिचा मानसिक व शारीरिक छळ करीत होता. प्रज्ञा ही नेहमी आईवडिलांकडे तक्रार करायची. परंतु, तिचे आईवडिल तिची समजूत घालायचे. गेल्या काही दिवसांपासून मोहन हा प्रज्ञाच्या चारित्र्यावर संशय घ्यायला लागला. तुझे कुणाशीतरी प्रेमसंबंध आहेत, असा आळ घेऊ लागला. ही बाब तिने आईला सांगितली. तिच्या कुटुंबियांनी मोहनची अनेकदा समजूत घालून वाद मिटवला. मात्र, मोहन दारु पिऊन पत्नीला मारहाण आणि शिवीगाळ करीत होता. चारित्र्यावर संशय घेऊन तिच्याशी भांडण करीत होता. त्यामुळे प्रज्ञा पतीच्या मानसिक व शारीरिक त्रासाला कंटाळली होती. पतीच्या त्रासाला कंटाळून प्रज्ञाने आत्महत्या करण्याचा टोकाचा निर्णय घेतला. शनिवारी मोहन ड्युटीवर गेल्यानंतर तिने एक चिठ्ठी लिहिली. त्यात पती मोहनच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करीत असल्याचा उल्लेख केला. त्यानंतर तिने मोहनला फोन केला. मी आता गळफास घेऊन आत्महत्या करीत आहे. तू पुर्वीसारखा राहीला नाही. तू माझ्यावर प्रेम करीत नाही. असे म्हटले. त्यावर मोहनने तिला थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र, तिने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

### आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा

मौदा पोलिसांनी या प्रकरणी पत्नीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा मोहनवर दाखल केला. पत्नीच्या अंत्यसंस्कारानंतर पती मोहनला मौदा पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याला अटक करण्यात येणार आहे, अशी माहिती मौदा पोलिसांनी दिली.

# बुलढाणा पोलिसांची रविकांत तुपकरांना नोटीस



■ महासागर प्रतिनिधी,
बुलढाणा, दि. १६ :

शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी जाहीर केलेल्या १९ मार्च रोजीच्या मुंबईतील नियोजित आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बुलढाणा पोलिसांनी रविकांत तुपकर यांना आज रविवारी, १६ मार्च रोजी नोटीस बजावली आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पाहता आंदोलन करू नये अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल असे या नोटीस मध्ये नमूद आहे. दरम्यान अशा नोटिसांची आपण तमा बाळगत नाही, काहीही झाले तरी शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी आंदोलन करणारच असा निर्धार रविकांत तुपकर यांनी यावेळी जाहीर केली आहे.

शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती, पिकविमा, सोयाबीनचा -कापसाचा भावफरक यासह सोयाबीन- कापूस, ऊस, कांदा, धान, दूध उत्पादकाना मदत व भाववाढ आदि मागण्यांसाठी शेतकरी, १९ मार्च रोजी रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात अरबी समुद्रात सातबारे बुडवून कर्जमुक्त झाल्याची घोषणा करणार आहेत तसेच सोयाबीन कापूस बुडवून विविध मागण्याकडे शासनाचे लक्ष वेधणार आहे. १८ मार्च रोजी सकाळी ९ वाजता बुलडाणा शहरातील क्रांतिकारी हेल्पलाइन सेंटर वरून रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात सर्व शेतकरी मुंबईकडे आगेकूच करणार आहेत.

दरम्यान या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बुलढाणा पोलिसांनी रविकांत तुपकर यांना कलम १६८ नुसार नोटीस बजावली आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न तसेच इतरांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने आंदोलन करू नये अशी तंबी देण्यात आली आहे. तरीही आंदोलन केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल असे नोटीसमध्ये नमूद आहे.

दुसरीकडे रविकांत तुपकर आपल्या आंदोलनावर ठाम आहेत. प्रसिद्धी माध्यमाशी बोलताना ते म्हणाले की, अशा नोटिसांनी आपल्या घरातील कपाट भरले आहे, या नोटीसला आम्ही घाबरत नाही असे रविकांत तुपकर यांनी सांगितले आहे. आंदोलन दडपण्याचा आणि शेतकरी चळवळ बंद पाडण्याचा हा शासनाचा आणि प्रशासनाचा डाव आहे, परंतु आम्ही डगमगणार नाही. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आम्ही आंदोलन करणारच अशी भूमिका रविकांत तुपकर यांनी जाहीर केली.

शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती, हक्काचा पिकविमा, सोयाबीन- कापूस भावफरक, नाफेड मध्ये अडकलेली शेतकऱ्यांची रक्कम, रखडलेले अनुदान, ऊसाला एकरकमी एफआरपी द्यावी यासह कांदा, दूध, धान व इतर उत्पादनाना अनुदान ज्यावेळेस इतर शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी आम्ही हे आंदोलन करीत आहोत. या आंदोलनात कुठेही हिंसा होणार नाही, कायदा हातात घेतला जाणार नाही आम्ही लोकशाही मार्गाने आंदोलन करणार आहोत, तरीही पोलिसांनी नोटीस देऊन आमचे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला आहे.

# औरंगजेब कबर इशाऱ्यानंतर मिलिंद एकबोटेंना जिल्हा बंदी

■ महासागर प्रतिनिधी,
छत्रपती संभाजीनगर, दि. १६ :



धर्मवीर संभाजी महाराज प्रतिष्ठानचे अध्यक्ष व माजी आमदार मिलिंद एकबोटे यांचे समर्थक कार्यकर्ते, हिंदू एकता मोर्चाचे कार्यकर्ते खुलताबाद येथील औरंगजेबाची कबर नष्ट करण्यासाठी येणार असल्याची माहिती असल्याने त्यांना व त्यांच्या समर्थकांना जिल्ह्यात प्रवेश बंदीचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी बजावले आहेत. ही बंदी १६ मार्च ते ५ एप्रिल २०२५ या कालावधीसाठी असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान खुलताबादमध्ये पोलिसांनी बंदोबस्तही वाढला आहे. औरंगजेबाची कबर सध्या भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या अखत्यारित आहे.

मिलिंद एकबोटे हे अत्यंत कट्टर हिंदुत्ववादी कार्यकर्ते असून या पूर्वी भीमा कोरेगाव दंगलीत सहभागी असल्याचा आणि इतर धर्मीयांच्या व समाजाच्या भावना दुखावण्याबाबतचे गुन्हे त्यांच्यावर दाखल आहेत. त्यांना मानणारा मोठा वर्ग राज्यभर आहे. यातील काही कार्यकर्ते संभाजी महाराजांना अभिवादन करण्यासाठी वढू - तुळापूर दरम्यान संभाजी महाराज श्रद्धांजली यात्रा काढतात.

या यात्रेत सहभागी होणारे काही जण कबर नष्ट करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद येथे येणार असल्याचा अहवाल छत्रपती संभाजीनगर ग्रामीणचे पोलीस अधीक्षकांनी दिला होता. त्या आधारे जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने अपर जिल्हाधिकारी विनोद खिरोळकर यांनी जिल्हा बंदीचे आदेश बजावले आहेत.

विश्व हिंदू परिषदेच्या वतीनेही कबर नष्ट करण्याचा इशारा नुकताच दिला असल्याने पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे. राज्य राखीव दलाचे काही जवान खुलताबादला तैनात करण्यात आले आहेत. छत्रपती संभाजीनगरचे पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, जिल्ह्यात येण्यास प्रतिबंध असल्याचे आदेश त्यांना बजावण्यात आले आहेत. राखीव दलाचे जवान आणि पोलीस यांचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

# किरकोळ वादातून दोन गटात हाणामारी

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. १६ :

किरकोळ वादातून दोन गटात हाणामारी झाल्याची घटना गुलटेकडीतील मीनाताई ठाकरे वसाहतीत घडली. याप्रकरणी परस्परविरोधी फिर्यादीनुसार खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून, दोघांना अटक करण्यात आली आहे. मारहाणीत तिघे जखमी झाले असून, पसार आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. याबाबत केशव अनिल शिवशरण (वय २०, रा. मीनाताई ठाकरे वसाहत, गुलटेकडी) याने स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, रोहित सिंग, दर्शन सुतार, संकेत यांच्यासह पाच ते सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी रोहित सिंग याला अटक करण्यात आली असून, आरोपींविरुद्ध यापूर्वी गुन्हे दाखल झाले असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. आरोपींनी केलेल्या मारहाणीत शिवशरण, राहुल ढोणे, अक्षय कांबळे हे जखमी झाले आहेत.

# लग्नाच्या वरातीतून मुलाचे अपहरण

## ६० लाखांच्या खंडणीची मागणी

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १६ :

लग्नाच्या वरातीत सगळे नाचण्यात दंग असताना अचानक एक मुलगा बेपत्ता होतो. सगळीकडेच शोधाशोध सुरू असतानाच त्याच्या वडिलांच्या हाती एक चिठ्ठी पडते. त्या चिठ्ठीमध्ये १४ वर्षीय मुलगा सुखरूप पाहिजे असेल तर ६० लाख रुपयांच्या खंडणीची मागणी करण्यात आली. पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास केल्या जात असून अद्याप अपहृत मुलाचा शोध लागलेला नाही. ही सिनेस्टाईल घटना वाशीम जिल्ह्याच्या बाभुळगाव येथे घडली.

बाभूळगाव येथे गावात १२ मार्चला लग्नापूर्वीचा नानमुख कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गावातून वरात काढण्यात आली. डीजेच्या तालावर वरातीत सहभागी मंडळी जल्लोष करत होती. त्यात १४ वर्षीय अनिकेत संतोष सादुडे हा मुलगा सहभागी झाला होता. सगळे जण नाचण्यात गुंग असताना काहीच वेळात तो मुलगा बेपत्ता झाल्याचे समोर आले. अनिकेत रात्रीच्या वेळी वरातीतून गायब झाल्यानंतर पहाटेच्या सुमारास त्याच्या घरासमोर वडिलांच्या नावे बंद लिफाफा आढळून आला. तो उघडून पाहिला असता, त्यात पाच पानांचे पत्र आढळून आले. ६० लाख रुपये आणि घरातील सोन्याचे दागिने ठराविक ठिकाणी आणून द्या आणि तुमच्या मुलाला घेऊन जा, असे खंडणीखोरांनी नमूद केले. पोलिसांशी संपर्क केल्यास बरे होणार नाही, अशी धमकीही देण्यात आली.

६० लाख रुपये आणि सोने-चांदीच्या दागिन्यांसाठी खंडणीखोरांनी त्याचे अपहरण केल्याचे उघड झाल्यावर सादुडे कुटुंबीयांनी वाशीम ग्रामीण पोलिसांत धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी तातडीने गुन्हा नोंदवून घेत तपास कार्य हाती घेतले.

पोलीस गेल्या चार दिवसांपासून तळ ठोकून आहेत. संशयित प्रत्येकाची कसून चौकशी केली जात आहे. पोलिसांकडून तपास केला जात आहे. गत चार दिवसांत अपहरण झालेल्या मुलाचा शोध घेतला जात आहे. या प्रकरणात अद्याप पोलिसांच्या हाती धागेदोरे लागलेले नाहीत.

# छत्रपतींना बदनाम करण्याचे काँग्रेसचे षडयंत्र : शिवेंद्रराजे भोसले

■ महासागर प्रतिनिधी,
सातारा, दि. १६ :



मागील काही दिवसांपासून छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून राज्यातील वातावरण चांगलेच तापलेले आहे. त्यातच आता काँग्रेसच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांना बदनाम करण्याचे षडयंत्र सुरू असते, असा आरोप छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजघराण्यातील असलेले भाजपचे मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी केला आहे. त्यांच्या या विधानामुळे नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

राजकारणासाठी समाजामध्ये तेढ निर्माण करतात आणि नंतर जातीयवादी पक्ष म्हणतात. पण, आपण हा खोटारडेपणा ओळखला पाहिजे. काँग्रेसच्या माध्यमातून छत्रपतींना बदनाम करण्याचे षडयंत्र सुरु असते. त्याचा आपण सर्वांनी अभ्यास करायला हवा, असे शिवेंद्रराजे म्हणाले.

आतापर्यंत पंतप्रधान नरेंद्र मोदी, भारतीय जनता पार्टीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाला, गडकिल्ल्यांना किंवा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जिथे जिथे पाऊल खुणा आहेत, त्यांना जितके महत्त्व दिले तेवढे काँग्रेसच्या राजवटीत कधीही झालेले नाही, हे आम्ही बघितलेले आहे, असा दावा शिवेंद्रराजे भोसले यांनी केला.

आम्ही सुद्धा काँग्रेसमध्ये होतो, माझे वडील सुद्धा काँग्रेसमध्ये होते. पण, कधीही काँग्रेसने छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्याला जेवढे लोकांपर्यंत आणायला हवे होते, तेवढे आणलेले नाही, असे त्यांनी म्हटले आहे. शिवेंद्रराजे भोसले यांच्या आरोपाला काँग्रेसकडून काय उत्तर दिले जाते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

दरम्यान, छावा चित्रपटामुळे मराठा समाज व हिंदू धर्मातील लोकांच्या औरंगजेबाच्या कबरीबाबत भावना तीव्र झालेल्या आहेत. त्यातच समाजवादी पार्टीचे आमदार अबू आझमी यांनी मुघल बादशहा औरंगजेबाचे गुणगान गायल्यापासून नवीन वादाला तोंड फुटले आहे.

त्यामुळे गत काही दिवसांपासून औरंगजेबाच्या कबरीवरून राज्याचे राजकारण चांगलेच तापले आहे. त्यानंतर विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाने औरंगजेबाची कबर पाडा, अन्यथा बाबरी मशिदीची पुनरावृत्ती करू, असा इशारा दिला आहे.

# चोरीच्या पैशातून खरेदी केली मोटारसायकल

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :

गुन्हे शाखेच्या सोनसाखळी विरोधी पथकाने लकडगंज ठाण्यात नोंद घरफोडीच्या प्रकरणाचा छडा लावून आरोपीला अटक केली. चौकशीत त्याने चोरीच्या पैशातून मोटारसायकल खरेदी केल्याची माहिती दिली. ओमप्रकाश उर्फ जऊ पूनव लहरे (२५) रा. मिनीमातानगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी आरोपीकडून मोटारसायकलसह ४५ हजारांचा मुद्देमालही जप्त केला आहे. महेशनगर परिसरात राहणारे फियार्दी आफताब मोहम्मद युसूप नागानी (४७) यांचे लकडगंज पोलिस ठाण्यासमोरच धमाल टिंबर नावाने दुकान आहे. गत ९ रोजीच्या दुपारी ते दुकान बंद करून घरी गेले होते. आरोपी ओमप्रकाशने दिवसाढवळ्या त्यांच्या दुकानाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. ड्राव्हरमध्ये ठेवलेला मोबाईल फोन आणि रोख ३० हजार रुपये चोरून नेले. ही बाब उघडकीस आल्यानंतर आफताब यांनी लकडगंज पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदविला होता.

या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखेचे सोनसाखळी विरोधी पथकही करीत होते. गोपनिय माहितीच्या आधारावर ओमप्रकाशला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याजवळ आफताब यांचा फोनही मिळाला. पैशांबाबत विचारले असता त्याने मोटारसायकल खरेदी केल्याची माहिती दिली. पोलिसांनी फोन आणि मोटारसायकल असा एकूण ४५ हजारांचा मुद्देमाल जप्त करून ओमप्रकाशला अटक केली. पुढील कार्यवाहीसाठी त्याला मुद्देमालासह लकडगंज पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले.

# तरुणास तलवारीसह केली अटक

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १६ :

पाचपावली पोलिसांनी गस्तीदरम्यान एका गुन्हेगारी प्रवृत्तीच्या तरुणास तलवारीसह फिरताना अटक केली. कुणाल सुधाकर डेकाटे (२७) रा. राणी दुर्गावती चौक असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. शनिवारी रात्री १ वाजताच्या सुमारास पाचपावली पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान मोचीपुरा परिसरात रेल्वे लाईनजवळ एका व्यक्ती हातात शस्त्र घेऊन फिरत असल्याची माहिती पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिस परिसरात पोहोचले असता कुणाल तलवार घेऊन फिरताना आढळला. पोलिसांना पाहताच त्याने रेल्वे रूळावरून पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. त्याच्याजवळील तलवार जप्त केली. तो कोणाला तरी मारण्याच्या उद्देशाने परिसरात तलवार घेऊन फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला.

# दुचाकीवरुन नियंत्रण सुटून दुचाकीस्वार जागीच ठार

■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. १६ :

दुचाकीने गावाकडे जात असलेल्या तरूणाच्या दुचाकीवर माकडाने उडी घेतली. त्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटून अपघात झाला. या अपघातात दुचाकीस्वार जागीच ठार झाला तर, मागे बसलेला आठ वर्षीय मुलगा गंभीर जखमी झाला. राळेगाव तालुक्यातील कोच्ची ते खैरी या मार्गावर घडलेल्या या घटनेत अनुप भारत कुमरे (२०), रा. कोच्ची हा तरूण जागीच ठार झाला, तर स्वराज विपूल ठाके (८), रा. कोच्ची हा बालक गंभीर जखमी झाला. अनुप आणि स्वराज हे दोघे दुचाकी (क्र. एमएच २९, एझेड २४४१) ने खैरीहून कोच्ची गावाकडे जात होते. खैरीपासून काही अंतरावर एका शेताजवळ चिंचेच्या झाडावर माकडे खेळत होती. याचवेळी एका माकडाने थेट धावत्या दुचाकीवर उडी मारली. त्यामुळे अनुपचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले व अपघात झाला. त्याच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने तो जागीच ठार झाला.

# कालव्यात वाहून गेलेल्या तरुणाचा मृतदेह सापडला

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगोली, दि. १६ :

वसमत तालुक्यातील मुडी शिवारातून कालव्यात वाहून गेलेल्या तरुणाचा मृतदेह रविवारी ता. १६ पिंपळाचौरे शिवारातील कालव्यात सापडला आहे. या प्रकरणी वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्याची प्रक्रिया सुरु होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वसमत तालुक्यातील चंदगव्हाण येथील अभय रामा सुर्यवंशी (१९) हा तरुण शुक्रवारी ता. १४ सायंकाळी मुडी शिवारात त्याच्या मित्राकडे धुलिवंदनासाठी गेला होता. त्या ठिकाणी रंगखेळून झाल्यानंतर तो मित्रासोबत मुडी शिवारातील कालव्यामध्ये अंघोळीसाठी गेला. यावेळी तो कालव्याच्या पाण्यात उतरला. मात्र कालव्याच्या पाण्याच्या प्रवाहात तो सापडला. त्याला पोहणे येत नसल्याने तो पाण्याच्या प्रवाहासोबत वाहून जाऊ लागला. त्याने मदतीसाठी आरडा ओरड केली मात्र मित्रांची मदत मिळेपर्यंत तो बऱ्याच अंतरावर गेला.

या घटनेची माहिती मिळाल्यानंतर वसमत ग्रामीण पोलिस व चंदगव्हाण येथील गावकऱ्यांनी कालव्याच्या पाण्यात त्याचा शोध सुरु केला. मागील दोन दिवसांपासून गावकऱ्यांनी शोध मोहिम हाती घेतली. त्यानंतर आज सकाळी साडेसात वाजता पिंपळाचौरे शिवारात कालव्यामधील पाण्यात त्याचा मृतदेह आढळून आला.

याबाबत माहिती मिळाल्यानंतर वसमत ग्रामीण पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक गजानन बोराटे, जमादार विजय उपरे, नामदेव बेंगाळ, रामा लोखंडे यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिस व गावकऱ्यांनी मयत अभय याचा मृतदेह पाण्याबाहेर काढून उत्तरीय तपासणीसाठी वसमतच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल केला आहे. याप्रकरणी वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यात मृत्यूची नोंद घेण्यात आली.